# तृतीय वर्ष कला

## सत्र - V (CBCS)

## अभ्यासपत्रिका – VI

## आधुनिक महाराष्ट्रातील राजकीय प्रक्रिया

# आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण

## विषय कोड : 97087

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक** : **दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**संपादक** : **डॉ. बाबासाहेब त्र्यंबक मोताळे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान
महाविद्यालय, म्हसदी ता. साक्री, जि. धुळे

**लेखक** : **प्रा. निलेश पाटील**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग, गोगटे-जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

: **डॉ. बाबासाहेब त्र्यंबक मोताळे**
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
स्व. अण्णासाहेब आर.डी. देवरे कला व विज्ञान
महाविद्यालय, म्हसबि ता. साक्री, जि. धुळे

: **डॉ. स्वप्नील बोधने**
सहायक प्राध्यापक
राज्यशास्त्र विभाग प्रतिष्ठान महाविद्यालय पैठण, औरंगाबाद

**सप्टेंबर २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **१** | **ऐतिहासिक पार्श्वभूमी** | १ |
| | महाराष्ट्र संकल्पना -: उद्गम आणि विकास | २ |
| | राष्ट्रवादी आणि समाजसुधारणा चळवळ | ८ |
| | संयुक्त महाराष्ट्र चळवळ | १८ |
| **२** | **उप प्रादेशिकवाद - प्रादेशिक असमतोल व विकास** | २७ |
| | महाराष्ट्राची विभागवार रचना कोकण, मराठवाडा, विदर्भ | २८ |
| | दांडेकर समिती अहवाल | ३८ |
| | वैधानिक विकास मंडळे | ४० |
| **३** | **महाराष्ट्रातील राजकीय संस्था** | ४५ |
| | राज्य विधिमंडळ: रचना आणि कार्य | ४६ |
| | मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ: भूमिका | ५९ |
| | उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालये | ६८ |
| **४** | **महाराष्ट्रातील जात आणि राजकारण** | ८१ |
| | प्रबळ जातीचे राजकारण | ८४ |
| | दलित राजकारण | ८६ |
| | इतर मागास जातींचे राजकारण:(ओ.बी. सी) | ८९ |

**तृतीय वर्ष कला**

**सत्र - V (CBCS)**

**अभ्यासपत्रिका – VI**

**आधुनिक महाराष्ट्रातिल राजकीय प्रक्रिया**

# आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण

**अभ्यासक्रम**

**Module 1: Historical Background**
1.1 Evolution of the idea of Maharashtra
1.2 Nationalist Movement and Social Reform Movement
1.3 Sanyukta Maharashtra Movement

**Module 2: Sub-regionalism, Regional Disparity and Development**
2.1 Konkan, Marathwada &Vidarbha
2.2 Dandekar Committee Report
2.3 Statutory Development Boards

**Module 3: Political Institutions in Maharashtra**
3.1 State Legislature: Composition and Functions
3.2 Chief Minister and Council of Ministers: Role
3.3 High Court and Subordinate Courts

**Module 4: Caste and Politics in Maharashtra**
4.1 Dominant Caste Politics
4.2 Dalit Politics
4.3 OBC Politics

One theory question paper of 80 marks at the end of the semester, consisting 4 compulsory questions of 20 marks each with internal options for each question – i.e. Q. 1a or Q. 1b.

Project reports – (20 marks) - will be collected and assessed at college level by respective subject teachers, on or before a fixed date, well before the beginning of semester end theory exam. The date will be decided by the Subject teachers in respective colleges. Topics for projects should be based on the semester syllabus.

**List of topics for projects**

(This is not a comprehensive list and teachers are free to design projects based on the syllabus)

1. Reviews of books related to politics of Maharashtra.
2. Interviews of politicians and administrators.
3. Reviews of biographies and autobiographies of influential leaders.
4. Review of social welfare schemes
5. Study of sub regions – Konkan, Marathwada, Vidarbha, Western Maharashtra
6. Legislative process

# १

# ऐतिहासिक पार्श्वभूमी

**घटक रचना**

१.१ उद्दिष्टे

१.२ प्रस्तावना

१.३ महाराष्ट्र संकल्पना -: उद्गम आणि विकास

१.४ राष्ट्रवादी आणि समाजसुधारणा चळवळ

१.५ संयुक्त महाराष्ट्र चळवळ

१.६ सारांश

१.७ विद्यापीठीय प्रश्न

१.८ संदर्भग्रंथ

## १.१ उद्दिष्टे

अलिकडच्या काळात राष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाबरोबरच राज्यांच्या राजकारणाच्या अभ्यासालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु हा अभ्यास करताना त्या त्या राज्याची ऐतिहासिक सामाजिक आर्थिक सांस्कृतिक राजकीय पार्श्वभूमी समजून घेणे आवश्यक ठरते. महाराष्ट्राच्या राजकारणाच्या अभ्यासाला देखील ही बाब लागू ठरते. प्रस्तुत प्रकरणाची उद्दीष्टे म्हणजे -

१) महाराष्ट्र संकल्पनेचा उद्गम आणि विकासाचा आढावा घेणे.

२) महाराष्ट्रातील राष्ट्रवादी व समाजसुधारणा चळवळीचा अभ्यास करणे.

३) महाराष्ट्र राज्यनिर्मिती कशी झाली. त्यातील टप्पे कोणते ? याचा अभ्यास करणे.

## १.२ प्रस्तावना

सद्यास्थितीत राष्ट्रीय राजकारणाबरोबरच राज्याच्या राजकारणाच्या अभ्यासालाही महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु हा अभ्यास करताना त्या-त्या राज्याची भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमी समजून घ्यावी लागते. महाराष्ट्राचे शासन आणि राजकारणाचा अभ्यास करण्यापूर्वी महाराष्ट्राची सर्व दृष्टीकोनातून ओळख करून घेणे आवश्यक आहे.

आपण ज्याला महाराष्ट्र म्हणतो त्या महाराष्ट्राला इसवी. सनापूर्वीपासूनचा इतिहास लाभलेला आहे. हा इतिहास महाराष्ट्र शब्दांची ऊप्तती, तिचा अर्थ याचा अभ्यास आपण महाराष्ट्र संकल्पनेत करणार आहोत.

ब्रिटीश भारतात आल्यानंतर त्यांनी भारतीयांचे नानाविध प्रकारे शोषण केले त्यातून ब्रिटिशांविषयी भारतीयांच्या मनात असंतोष निर्माण झाला. भारतीयांमध्ये शब्दवादाची भावना जागृत झाली. त्यात महाराष्ट्रही पिछाडीवर नव्हता. महाराष्ट्रातील अनेक विचारवंत नेत्यांनी राष्ट्रवादी चळवळीस हातभार लावला. तसेच ब्रिटीशांच्या आगमनानंतरभारतात पाश्चात्य शिक्षणाची मुळे रुजली गेली. परिणामी भारतीय समाजातील अनेक अनिष्ट रुढी, परंपरा, स्त्री दास्य, अस्पृश्यता या विरुद्ध आवाज उठविण्यासाठी कर्ते समाजसुधारक पुढे आले. या सर्वांचा अभ्यास राष्ट्रवादी व समाजसुधारणा चळवळीतून करणार आहोत.

संयुक्त महाराषट्र चळवळ ही देखील महाराष्ट्राच्या राजकारणातील एक ठळक घटना आहे. परंतु आज जे संयुक्त महाराष्ट राज्य अस्तित्वात आहे ते सहजासहजी निर्माण झालेले नाही. ते मिळविण्यासाठी मराठी भाषिकांना फार मोठा संघर्ष करावा लागला आहे. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा अभ्यास आपण संयुक्त महाराष्ट्र चळवळीत करणार आहोत.

थोडक्यात, या प्रकरणात आपण खालील मुद्दयांचा अभ्यास करणार आहोत.

१) महाराष्ट्र संकल्पना उद्गम आणि विकास

२) राष्ट्रवादी आणि समाजसुधारणा चळवळ

३) संयुक्त महाराष्ट्र चळवळ

## १.३ महाराष्ट्र संकल्पना -:उद्गम आणि विकास

१ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज अस्तित्वात आले असे असले तरी महाराष्ट्र ही संकल्पना अनेक शतकांपासून अस्तित्वात आहे. या संकल्पनेच्या स्वरुपात काळाच्या ओघात अनेक बदल घडून आलेले दिसतात.

वास्तविक पाहता 'महाराष्ट्र' हा शब्द एक प्रदेश आणि एक लोकसमूहाचा निर्देश करतो. महाराष्ट्रात राहणाऱ्या लोकांना महाराष्ट्रीय /महाराष्ट्रीक किंवा मराठे असे म्हटले जाते.

महात्मा फुले यांच्या मतानुसार महाराष्ट्रात जेवढे लोक आहेत. त्या सर्वांना मराठे असे म्हटले जाते.

२०व्या शतकात मराठी भाषिकांनी आपली ओळख महाराष्ट्रीय म्हणून इतर वांशिक गटातील लोकांना करुन द्यायला सुरुवात केली आणि तेही त्याला महाराष्ट्रीय म्हणून ओळखू लागले.

### १.३.१ महाराष्ट्र संकल्पना -: उद्गम आणि विकास

महाराष्ट्र या शब्दाचा प्रयोग प्राचीन काळापासून केला जातो. महाराष्ट्र याचा अर्थ म्हणजे मोठे राष्ट्र किंवा महान राष्ट्र असा होतो. प्राकृत भाषेतदेखील महाराष्ट्री हा शब्द प्रचलित होता. त्यावरुन महाराष्ट्र हा शब्द तयार झाला असावा.

काही इतिहासकारांच्या मतानुसार इ.स. च्या ६०० वर्षा पूर्वी आर्य लोक दक्षिणेत आले. दक्षिणेत त्यांच्या अनेक वसाहती होत्या (गोपुराष्ट्र, पांडुराष्ट्र) तशीच महाराष्ट्र नावाची

वसाहत होती. आर्यांच्या काळात महाराष्ट्राला दंडकारण्य अथवा दक्षिणापथ असे म्हटले जात असे.

सम्राट अशोकाच्या शिलालेखात ‘राष्ट्रीय’ असा लोकसमुदायाचा उल्लेख आढळतो. त्यावरुन महाराष्ट्रीक असा शब्द तयार झाला व त्यापासून ‘महाराष्ट्र’ हे नाव रुढ झाले असावे.

सातवाहनांच्या काळातील शिलालेखात महारषि असे नाव आढळते. अनके संस्कृत ग्रंथात महाराष्ट्र हा शब्द बऱ्याचदा उल्लेखलेला आहे. थोडक्यात, मरहठठ या शब्दापासून महाराष्ट्र या शब्दाची उत्पत्ति झाली असावी.

महाराष्ट्र या संकल्पनेचा उद्गम आणि विकास पाहताना आपल्याला प्राचीन काळापासून ते आजतागायत घटनांचा आढावा घ्यावा लागतो.

## १) प्राचीन कालखंड

महाराष्ट्रासंबंधीची अनेक गीते इंग्रजी राजवटीत व संयुक्त महाराष्ट्र

चळवळीच्या काळात लिहिली गेली. या उलट मराठी भाषेबद्दल अभिमान व्यक्त करणारी कविता १२ वे ते १७ व्या शतकापर्यंतच्या काळात संतांनी लिहिली.

महाराष्ट्र या प्रदेशवाचक शब्दाचा उल्लेख इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून होतो आहे. मध्य प्रदेशातील सागर जिह्यातील दारण या गावात सापडलेल्या लेखात असा पहिला उल्लेख आढळतो.

महानुभाव पंथांचे संस्थापक श्री चक्रधर स्वामी हे आपल्या शिष्याना नेहमी महाराष्ट्री असावे असे सांगत असे. लीळाचरित्र हा महानुभाव पंथांचा आदयग्रंथ मानला जातो. त्यातील ऋद्धिपूर माहाक्यात महाराष्ट्राचे वर्णन करताना त्यांनी महाराष्ट्रभूमीच्या सीमा सांगितल्या आहे. त्यानंतरच्या काळात महाराष्ट्रातून महानुभव पंथ लोप पावला परिणाम मराठी भाषिकांना महानुभावांच्या मराठी भाषा व महाराष्ट्राबद्दलच्या अभिमानाचे विस्मरण झाले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळातदत्तो वामन पोतदार, माडखोलकर, अत्रे या मराठी साहित्यिकांनी त्यांचे स्मरण करुन दिले.

## २) महाराष्ट्री ते मराठीः

महाराष्ट्राला प्राचीन काळात दक्षिणापथ म्हणत असे. पुराणांमध्ये या प्रदेशाला दक्षिणापथ दंडकारण्य असे म्हटले आहे. या शब्दांनी एकाच प्रदेशाचा नामनिर्देश होतो. इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांच्या मतानुसार, “पूर्व व पश्चिमेस वसाहती स्थापन केल्यानंतर आर्यांचे लक्ष दक्षिणेकडे गेले आणि त्यांनी दंडकारण्यात प्रवेश केला. त्यानंतर महाराणी नावाची प्राकृत भाषेचा तेथे जन्म झाला. दंडकारण्यात ज्या आर्यांनी वसाहती केल्या त्यांनी आपल्या वसाहतींना महाराष्ट्र देश आपल्याला महाराष्ट्रीय व आपल्या भाषेला महाराष्ट्री भाषा असे म्हटले.”

महाराष्ट्री प्राकृत भाषेचे व्याकरण व ररुचि काव्यायनाने रचले. त्यानंतर पतंजली ने आपल्या ग्रंथात विदर्भ अपरांत म्हणजेच उत्तर कोकण इ. चा उल्लेख केला. सातवाहनांच्या साम्राज्याच्या अस्तानंतर शके ४५० च्या सुमारास मराठी भाषा बोलली जाऊ लागली. हळू-हळू मराठी भाषा विकास पावली. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी मध्ये मराठीचे महत्त्व विशद केले.

संयुक्त महाराष्ट्र मागणीचा पाठपुरावा १९३३ च्या नागपूर साहित्य समेलनापासून करणारे सांगलीचे शंकर शेंडे यांच्या मते महाराष्ट्र संस्कृतीचा आणि महाराष्ट्री भाषेचा जन्म शकपूर्व सहासात हजार वर्षापूर्वी अवंत म्हणजेच मालव देशात म्हणजेच मावल्यात झाला असावा. महाराष्ट्र नावाचा उल्लेख तिसऱ्या शतकात महाराष्ट्री भाषेचा उल्लेख शकपूर्व पाचव्या शतकात आणि महाराष्ट्र शब्दाचा उल्लेख तिसऱ्या शतकात सापडतो.

बदामीच्या चालुक्यांपैकी दुसरा पुलकेशी हा तीन महाराणूकांचा स्वामी असल्याचा उल्लेख पेहोळे येथील शिलालेखात आढळला आहे. वि. का. राजवाडे यांच्या मते ही तीन महाराष्ट्रके म्हणजे वरदृष्ट (सध्याचा वऱ्हाड प्रांत), कहरष्ट (कऱ्हाड) या दोघांमधील राष्ट्राचा मध्य देश म्हणजे महरष्ट.

महरष्ट - नाशिक ते वाई पर्यतचा प्रदेश

वरहष्ट - खानदेश ते अमरावती दरम्यानचा भाग करहष्ट - वाई ते कोल्हापूरपर्यंतचा भाग.

वरहष्ट देश म्हणजे उत्तरेकडी राष्ट्रांचा देश, कहरष्ट म्हणजे दक्षिणेकडील राष्ट्रांचा प्रदेश तर महरष्ट्र देश म्हणजे या दोन्हीमधील राष्ट्रांचा प्रदेश होय.

महरष्ट्र उर्फ महाराष्ट्रीक लोक नर्मदा नदीच्या उत्तरेकडील प्रदेशातून स्थलांतर करुन दक्षिणारण्यात आले. ज्या भूमीवर राजा राज्य करतो त्या भूमीला राष्ट्र म्हणत आणि राष्ट्राबद्दल आस्था वाटणाऱयांना राष्ट्रीक म्हणत. राजवाडे यांनी राष्ट्रीक व महाराष्ट्रीकांत भेद केला आहे.

महाराष्ट्रीकांचा नागलोकांशी रोटीबेटी संबंध जुळले आणि हळूहळू म्हरष्ट्रे, म्हराठे, मराठे, असे ज्यांना म्हणतात त्यांचे महाराष्ट्र हे नवीन राष्ट्र निर्माण झाले. मराठे लोक तीन वंशांचे मिळून बनले आहेत.ते म्हणजे महाराष्ट्रीकांचा सूर्यवंश, महाराष्ट्र क्षत्रियांचा सोमवंश आणि नागांचा नागवंश त्यांची भाषा म्हणजे मराठी होय. काही विचारवंतांच्या मतानुसार, महान राष्ट्र हे महाराष्ट्र होय. मल्ल राष्ट्रांपासून महाराष्ट्र झाले आहे.

पु.रा. बेहेरे यांच्या मते, जेथ पर्यंत महार आहे तेथपर्यंत महाराष्ट्र ही महाराष्ट्राची मर्यादा ऐतिहासिक आहे. म्हणूनच महारांचे राष्ट्राची मर्यादा ऐतिहासिक आहे. म्हणूनच महारांचे राष्ट्र ते महाराष्ट्र होय.

### ३) आठव्या शतकाचा उत्तरार्धः

इ. स. १६४० मध्ये व्येकटाध्वरी यांनि विश्वगुण दर्शन चंपू नावाचे संस्कृत काव्य लिहिले. त्यात कृ. शानु व विश्वावसु या दोन गंधर्वाचे महाराष्ट्रीयांविषयी संभाषणवाद आहे. कुशानुने महाराष्ट्रीयांमधे दोष दाखवले आहे तर विश्वावसुने त्यांचे गुणगाण केले

आहे. संत एकनाथांचा नातू मुक्तेश्वराने रचलेल्या महाभारतात महाराष्ट्रीय ढाल तलवार ही तेजस्वी शस्त्रे धारण करतात. मरेपर्यंत मागे न हटणारे कधीही खंडिले न जाणारे लढवय्ये महाराष्ट्रीय जे युद्ध करतात त्याला महाराष्ट्रयुद्ध म्हणतात. उद्योतन सुरीने महाराष्ट्रीयांचे वर्णन करताना ते बळकट ठेंगणे, सावळे, काटक, अभिमानी, भांडखोर मरहठ्ये म्हटले आहे.

**४) महाराष्ट्रधर्मः**

संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात महाराष्ट्रधर्म महाराष्ट्राची अस्मिता, मराठीपणा हे शब्द सर्रास वापरले गेले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा देणाऱ्या अनेकांना आपण महाराष्ट्रधर्म पाळत आहोत, असे वाटत असे.

वास्तविक पाहता 'महाराष्ट्रधर्म हा शब्दप्रयोग समर्थ रामदासांनी शिवछत्रपतींना लिहिलेल्या पत्रात तसेच दासबोधात सर्वप्रथम वापरली. तसेच मल्हार रामराव चिटणी यांनी १८१८ मध्.s लिहलेल्या शिवदिग्वीजय या बखरीत महाराष्ट्रधर्माचा उल्लेख केला.

महाराष्ट्र धर्माचा साधा सरळ अर्थ म्हणजे वर्णाश्रमधर्म होय. न्यायमूर्ती रानडे आणि राजाराम शास्त्री भागवत यांनी १९ व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रधर्म म्हणजे सनातन धर्माच्या विरुद्ध क्रांती करणारा भागवत धर्म असा अर्थ सांगितला. वि.का. राजवाडे यांनी संपादित केलेल्या माहिकावतीच्या तर्फे माहीमच्या बखरीत महाराष्ट्र धर्माचा अर्थ सांगितला आहे. केशवाचार्य आणि नायकोजीराव यांनी उत्तर कोकणातील ऐतिहासिक वर्णनावर घडामोडीवर भाष करताना महाराष्ट्र धर्म हा शब्द वापरला. महाराष्ट्र धर्म म्हणजे देशधर्म, कुळधर्म, वंशधर्म, देवधर्म यांचे पालन करणे.

ब्राम्हणांनी आपला धर्म पाळावा तर मराठ्यांनी त्यांचा क्षात्रधर्म पाळावा. असे या बखरीत सांगितले आहे.

**५) वि.का राजवाडे आणि महाराष्ट्रधर्मः**

महाराष्ट्रधर्माची स्थापना करण्याची कल्पना ही शिवचरित्राची गुरुकिल्ली असल्याचे राजवाडे यांचे म्हणणे होते. तसेच राजवाडे स्वराज्यस्थापना हे महाराष्ट्रधर्मातील मुख्य अंग मानतात. महाराष्ट्रधर्म म्हणजे हिंदू धर्म नव्हे असे सांगून त्यांनी महाराष्ट्रधर्माची व्यापक व्याख्या स्पष्ट केली.

त्यांच्या मते, महाराष्ट्रधर्म म्हणजे महाराष्ट्रेतर प्रांतातील हिंदुधर्म धर्मस्थापना गोब्राह्मणप्रतिपालक स्वराज्यस्थापना एकीकरण धुरीकरण होय. राजवाडे यांनी महाराष्ट्रेतर प्रांतातील हिंदूधर्मास सहिष्णू तर महाराष्ट्रातील हिंदूधर्मास जायेष्णू म्हटले.

राजवाड्यांनी समर्थ रामदासांच्या लिखाणाचे पुरावे सादर केले आहे. महाराष्ट्रधर्म म्हणजे स्वराज्य, स्वराज्यांचा शत्रू मग तो हिंदू असो अगर मुसलमान. त्याचा निपात आणि सर्व मराठ्यांची एकता होय.

### ६) विनोबा आणि महाराष्ट्रधर्मः

आचार्य विनोबा भावे यांनी जानेवारी १९२३मध्ये महाराष्ट्रधर्माचे मासिक सुरु केले. १९२३ च्या झेंडा सत्यागृहात सहभागी होण्यासाठी ते नागपूरला गेले असता पोलिसांना त्यांना अटक केली. तुरुंगातून सुटुन झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रधर्म मासिकाचे रुपांतर साप्ताहिकात करून १८ जून , १९२४ रोजी त्याचा पहिला अंक प्रकाशित केला.

त्यात त्यांनी असे म्हटले की, "महाराष्ट्रधर्म हा प्रथमदर्शनी जरी वामनासारखा दिसत असला तरी वस्तुत तो दोन्ही पावलात विराट विश्व व्यापून टाकणाऱ्या त्रिविक्रमासारखा आहे. या त्रिविक्रमाचे एक पाऊल महाराष्ट्रीय. दुसरी राष्ट्रीय तिसरे अतिराष्ट्रीय आहे. यशोदेचा बाळकृष्ण एका अर्थाने विश्वरुपाच्या मुख्यात असला तरी दुसऱ्या अर्थाने त्याच्याही मुखात विश्वरुप येते व हा अनुभव जसा यशोदेच्या दृष्टीला आला त्याचप्रमाणे महाराष्ट्रधर्म हा आंकुचित अर्थाने संबंध भारतीय धर्माला पोटात घालून दहा अंगुळे वर उख्यासारखा आहे. असेच ऐतिहासिक प्रजेच्या विचारी दृष्टीस दिसून येईल

विनोबांनी आपण मराठे बोलणार असे सांगून मराठे बोलणे म्हणजे काय हे सांगितले आहे. "मराठे बोलणे म्हणजे साधे सरळ, उघडउघड बोलणे, थोडक्यात मराठे बोलणे म्हणजे खरे बोलणे.

विनोबांनी महाराष्ट्रधर्माची कल्पना प्रथमच उघडपणे प्रादेशिक वा प्रांत पातळीवर मांडली. महाराष्ट्र धर्म हा जसा राष्ट्र या कल्पनेशी निगडित आहे तसाच तो जग या कल्पनेशी निगडित आहे. कारण महाराष्ट्र हा जसा भारताचा एक घटक आहे तसा भारत (व म्हणून महाराष्ट्र) सर्व जगाशी संबंधित आहे. परंतु या संकल्पनेचा विस्तार करायचा झाल्यास भारताचा अभिमान बाळगताना महाराष्ट्राचा अभिमान कसा बाळगता येईल. याचा विचार करावा लागतो. किंवा महाराष्ट्राचे हित वा इतर प्रांतांचे हित किंवा भारताचे हित यापैकी एकाचे हित निवडायचे असेल तर त्यावरील उपायांचा विचार करावा लागतो. थोडक्यात, महाराष्ट्र धर्माचा विचार राष्ट्रीय पातळीवरुन प्रांतपातळीवर आणल्यास महाराष्ट्राचा विचार करताना इतर राज्यांचा मुद्दा व राष्ट्रीय पातळीवरील निर्णय जागतिक स्वरुपात विचारात घ्यावे लागतात. म्हणजेच भारत धर्म व विश्वधर्माच्या संदर्भातही महाराष्ट्रधर्माची वैशिष्टये मांडावी लागतील. अशा परिस्थितीत भारतातील प्रत्येक जण राज्यधर्म (महाराष्ट्रधर्म), राष्ट्रधर्म (भारतधर्म), विश्वधर्माचा स्वीकार करेल. या तीन धर्माचे पालन करताना त्यात अंतर्विरोध निर्माण होणार नाही.

### ७) आचार्य स. ज. भागवत व महाराष्ट्रधर्मः

आधुनिक संदर्भात महाराष्ट्रधर्माला नवा अर्थ देण्याचा प्रयत्न आचार्य भागवतांनी १९३६ मधील आजचा महाराष्ट्रधर्म या निबंधात केला. त्यात त्यांनी असे म्हटले की, महाराष्ट्रधर्म ही अदभूत शक्ती आहे. पण ती ऐतिहासिक असल्याने तिच्या ऐतिहासिक

मर्यादा टाळून आपल्याला त्यातील समान तत्त्वे अवश्य घेता येईल. तसेच आजचा प्रश्न केवळ हिंदू लोकांच्या रक्षणाचा नसून, हिंदूस्थानातील सर्व हिंदी प्रजेच्या रक्षणाचा आहे. त्यामुळे आजच्या महाराष्ट्रधर्मात मुसलमांनाचा द्वेष येऊ शकत नाही. त्याशिवाय राष्ट्रधर्मापेक्षा मोठा तो महाराष्ट्रधर्म असा दुसरा अर्थ त्यांनी सांगितला. तसेच महाराष्ट्रधर्मात बुद्धिवंतानी आपले ज्ञान निर्बुद्धांना द्यावे. श्रीमंतानी आपल्या संपत्तीचा विनियोग गरिबांच्या कल्याणासाठी करावा. अशा महाराष्ट्रधर्माची दिक्षा महाराष्ट्रीयन लोकांनी भारतातील लोकांना द्यावी. निदान हिंदुस्थानने स्वीकारलेल्या राजधर्मापेक्षामहाराष्ट्रधर्माचे स्वरुप संकुचिक असू नये. भागवतांच्या या विचाराचे मुख्य वैशिष्टये म्हणजे भागवतांनी महाराष्ट्रधर्माचा हा आदर्शवादी वार भारतीय वा हिंदी संधराज्याच्या पार्श्वभूमीवर केला.

### ८) संयुक्त महाराष्ट्र चळवळ झाली महाराष्ट्रधर्मः

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची मागणी न्याय्य असूनही द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना १९५६ मध्ये करण्यात आली. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीने अधिकच जोर पकडला. न्या. फझल अली आयोगाने महाराष्ट्र हे वेगळे राज्य निर्माण करण्यास नकार दिला. त्यामुळे मुंबईतील मराठी भाविकांच्या मनात काँग्रेसश्रेष्ठीविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण झाली. ही ज्वाला साहित्यीकांनी आपल्या साहित्यातून मांडण्यास सुरुवात केली.

आचार्य अत्रे यांनी महाराष्ट्रधर्म महाराष्ट्राची अस्मिता, मराठीपणा किंवा मराठी बाणा या मिथकांना उजाळा दिला. तसेच महाराष्ट्रधर्म आपल्याला प्रिय असल्याचे सांगितले. आपल्या अनेक साहित्यातून त्यांनी महाराष्ट्रधर्माविषयी लेखन केले. अत्र्यांची भाषणे. लेख, यातून संयुक्त महाराष्ट चळवळीचा प्रचार-प्रसार झाला. संयुक्त महाराष्ट्र चळवळीला अधिकच जोर आला. शेवटी १ मे १९६० रेजी प्रदीर्घ लढयानंतर मराठी भाविकांचे संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

थोक्यात महाराष्ट्राची संकल्पना ही हळूहळू विकास पावली आहे. काळानुसार ती आणि तिच्या अर्थात बदल घडून आले आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) महाराष्ट्र या संकल्पनेचा उदय आणि विकास स्पष्ट करा.

## १.४ राष्ट्रवादी आणि समाजसुधारणा चळवळ

महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळ ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. राष्ट्रवादी चळवळीचा कालखंड म्हणजे महाराष्ट्रातील वेगवान घडामोडींचा घटनाप्रधान आणि

व्यक्तिप्रधान असा कालखंड समजला जातो. या राष्ट्रवादी चळवळीतूनच महाराष्ट्रातील अनेक बुद्धिवादी नेते आणि विचारवंतांचा जन्म झाला आहे. वास्तविक पाहता भारतात राष्ट्रवादी चळवळीची सुरुवात सर्वात प्रथम महाराष्ट्रातच झाली होती.

सशस्त्र चळवळी आणि इंग्रजी शिक्षणाचा दृश्य आविष्कार हा राष्ट्रवादाच्या उदयात दिसून येतो. त्यातूनच महाराष्ट्रतील राष्ट्रवादाचे तत्त्वज्ञान आकाराला आला आहे. तसेच राजकीय संस्थांचा उदय आणि विकासदेखील याच कालखंडात घडून आला आहे.

महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळीचे प्रमुखे तीन टप्पे पडतात ते खालील प्रमाणे

१) पाश्चात्यीकरण आणि आर्थिक राष्ट्रवाद

२) संघटित राष्ट्रवाद

३) राष्ट्रीय सभा ते कॉंग्रेस पक्ष (१८८५ ते १९४७)

### १) पाश्चात्यीकरण आणि आर्थिक राष्ट्रवाद

१९ व्या शतकांत महाराष्ट्राचा संबंध पाश्चात्य शिक्षण प्रणालीशी आला. महाराष्ट्रातील बुद्धिवादी वर्गावर या शिक्षणाचा फार मोठा ठसा उमटला. पाश्चात्य राजकीय मूल्ये (स्वातंत्र्य, समता, न्याय) व उदारमतवादी चौकटीचा या वर्गावर फारच प्रभाव पडला. १८५३ पासून ब्रिटीशांनी भारतात इंग्रजी शिक्षण देण्यास सुरुवात केली. पाश्चात्य देशांच्या विचारवंतांचे आधुनिक विचार महाराष्ट्रातील बुद्धिवंतांना प्रभावित करून गेले आणि राष्ट्रवादाला चालना मिळाली. परिणामी ब्रिटिश सरकार भारतीयांची पिळवणूक कशी करत आहे हे लक्षात येताच या बुद्धिवादी वर्गाने ब्रिटाशांविरुद्ध आवाज उठवण्यास सुरुवात केली.

भास्कर पांडूरंग तर्खडकर हे विचारवंत ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचे सर्वात पहिले टिकाकार होते. त्यांन १८३९ मध्ये शासनाच्या राजपत्रामध्ये (बॉम्बे गॅझेट) ब्रिटिश सरकारविरोधी अनेक पत्रके प्रकाशित केली आणि त्यातून ब्रिटिश सरकारवर कोरडे ओढले. शासनाच्या जाहिर कायद्याविरुद्ध टिका करताना त्यांनी असे म्हटले की, “स्थानिक लोकांच्या शिक्षणासाठी सरकारमार्फत जो निधी दिला जातो तो शिक्षणासाठी न वापरता ख्रिश्चन धर्माच्या प्रचार - प्रसारासाठी वापरला जातो. तसेच ब्रिटिश सरकारच्या वतीने ज्या सोयी सुविधा केल्या जात आहे. त्याचा केवळ त्यांच्या फायदा साधण्यासाठी केला जात आहे. नागरिकांच्या सोयीसाठी नाही याचा सर्व खर्च भारताच्या तिजोरीतून केला जात आहे. म्हणूनच ब्रिटिश राजवट ही भारताला मिळालेला एक शाप आहे.

रामकृष्ण विश्वनाथ, गोपाळ हरि देशमुख म्हणजेच लोकहितवादी न्या. महादेव गोविंद रानडे, दादाभाई नौरोजी हे देखील त्या कालखंडातील महत्त्वाचे राष्ट्रवादी विचारवंत समजले जातात.

रामकृष्ण विश्वनाथ यांनी ब्रिटिशांच्या वसाहतवादी व साम्रज्यवादी धोरणावर कडक शब्दात टीका केली आहे. त्यांनी असे म्हटले आहे की, ‘ब्रिटीशांच्या तयार मालाची

बाजारपेठ म्हणजेच भारत हे राष्ट्र होय. ब्रिटिशांनी भारतात येऊन इथले स्वदेशी कारखाने बंद पाडले आणि ईस्ट इंडिया कंपनीने मीठ व अफूची तस्करी करून भारतात भ्रष्टाचाराची लागण पसरविण्यास मदत केली आहे.

गोपाळ हरी देशमुख म्हणजेच लोकहितवादी यांनी ब्रिटिश शासनाला. १८४८ ते १८५९ च्या दरम्यान सुमारे १०८ पत्रे लिहिले या पत्रांना शतपत्रे असे म्हटले जाते. या शतपत्रांतून त्यांनी आर्थिक राष्ट्रवादाचा विचार मांडला आहे. 'लक्ष्मी चालली विलायतेला' या नावाचे पत्रक लिहून त्यांनी भारताच्या आर्थिक दुःस्थितीचे विदारक दृश्य लोकांसमोर मांडले. त्यातून ब्रिटिश भारतीयांची आर्थिक शोषण कसे करीत आहे. हे दाखून दिले. त्यानंतरच्या काळात ते स्वदेशी व राष्ट्रीय बहिष्काराच्या चळवळीत सक्रिय झाले.

दादाभाई नौरोजी यांनी आपला आर्थिक नि:स्सारणाचा सिद्धांत (Economic Drain Theory) मांडून ब्रिटिशांनी भारतीयांचे चालवलेल्या आर्थिक शोषणाविरुद्ध आवाज उठवला. तसेच न्या. रानडे यांनी १८५७ नंतर थंडगार गोळा होऊन पडलेल्या महाराष्ट्राला स्वकर्तृत्वाने चैतन्य प्राप्त करून दिले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दुरावस्थेला सरकारी महसुली धोरणे जबाबदार आहेत. असा निष्कर्ष त्यांनी लोकांपुढे मांडला. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक आर्थिक प्रबोधनाचे कार्य केले.

## २) संघटित राष्ट्रवाद

१९ व्या शतकात महाराष्ट्रात विविध क्षेत्रात सामाजिक प्रबोधन घडून आले. समाजसुधारकांच्या चळवळीमुळे अनेक राष्ट्रवादी संघटना निर्माण झाल्या. त्यातील दोन प्रमुख संघटना म्हणजेच

१) बॉम्बे असोसिएशन

२) सार्वजनिक सभा

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होण्यापूर्वी या दोन संघटना महाराष्ट्रात कार्यरत होत्या.

### १) बॉम्बे असोसिएशन

महाराष्ट्राच्या संस्थात्मक इतिहासात या संस्थेच्या कार्याविषयी इतिहासकारांनी असे म्हटले आहे की, हिंदी राजकारणाचा पाया घालण्याचे कार्य या संस्थेने केले आहे. जगन्नाथ शंकरशेठ, दादाभाई नौरोजी यांनी २६ ऑगस्ट १८५२ रोजी मुंबई शहरात या संस्थेची स्थापना केली. या संस्थेच्या स्थापनेत बोमनजी दोरमसजी, भाऊ दाजी लाड, नौरोजी फर्दुनजी, जमशेटजी जिजिभाई, वि.ना. मंडलिक या नेत्यांचा समावेश होता. या नेत्यांनी या संस्थेच्या कार्याला बळकटी आणली.

सुरूवातीच्या काळात संस्थेच्या अध्यक्षपदी जगन्नाथ शंकरशेठ तर सचिवपदी भाऊ दाजी लाड यांची नियुक्ती करण्यात आली. या संस्थेचा प्रमुख उद्देश म्हणजे भारतीय लोकांच्या अडीअडचणी राज्यकर्त्यांच्या कानावर घालून त्याचे निराकरण करणे. १८५३ मध्ये कंपनीच्या धोरणांवर टीका करणारे त्यातील दोषांवर आघात करणारे व भारतीयांच्या अधिकारांची मागणी करणारे निवेदन संस्थेने ब्रिटीश संसदेकडे पाठविले होते. यामुळे ब्रिटीश उदारमतवादी नेत्यांना भारतातील परिस्थितीची जाणीव झाली. दादाभाई नौरोजी कर्दुनजी यांनी या संस्थेच्या कार्यात मोलाचा सहभाग घेतला. १८६९ मध्ये डॉ. रा. गो भांडारकर आणि न्या. रानडे हे दोन नेते या संस्थेत सहभागी झाले आणि त्यांनी ब्रिटिश सरकारविरोधात कार्य सुरु केले १८७२ मध्ये अंतर्गत गटबाजीमुळे ही संघटना विस्कळीत झाली.

### २) सार्वजनिक सभाः

पूना सार्वजनिक सभा ही मुंबई प्रांतात सनदशीररीत्या चळवळ करणारी पहिली संघटना होती. या संघटनेची स्थापना एप्रिल १८७० रोजी गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांनी केली. या सभेच्या स्थापनेत सदाशिव गोवंडे, शीवराम साठी, सीताराम चिपळूणकर यांचा सहभाग होता.

१८७० मध्ये जमिनीच्या करवसुली प्रकरणात या सभेने सरकारविरुद्ध लढा दिला. मिठाच्या जाचक कराविरुद्ध सभेने जनमत संघटित करण्याचा प्रयत्न केला. १८७५ ते १९७७ दरम्यान महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला.. दुष्काळाच्या काळात परिस्थितीची पाहणी करून सरकारला निवेदन दिले. तसेच दुष्काळग्रस्त भागात फार मोठया प्रमाणात मदतकार्य केले. १८७१ च्या सुमारास रानडे यांनी सभेच्या कार्यात हातभार लावला. जोशी आणि रानडे यांच्या नेतृत्वामुळे ही अत्यंत लोकप्रिय संघटना बनली.

१८७८ पासून सभेच्या प्रचारकार्यासाठी इंग्रजी मराठी त्रैमासिक चालवले जात असे. जुलै १८७८ मध्ये द क्वटिली जर्नल ऑफ पूना सार्वजनिक सभा सुरू करण्यात आले. पुणे सार्वजनिक सभेच्या माध्यमातून जोशी यांनी देशभर स्वदेशीचा विचार पसरविण्याचा प्रयत्न केला. स्वदेशीच्या प्रचारार्थ प्रचारपुस्तिका छापल्या देशी हातमाग व स्वदेशी दुकांनांना उत्तेजन देण्यासाठी देशी व्यापारोत्तेजक संस्था स्थापन केली.

१८७९ मध्ये आद्यक्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांनी दख्खन प्रांतात ब्रिटीशांविरुद्ध कारवाई सुरु केली. प्रचंड मोठया प्रमाणात लुटमारी केली. याचा परिणाम म्हणजे मुंबई प्रांताचे गव्हर्नर सर रिचर्ड टेम्पल यांनी फडके हे सभेच कार्यकर्ते असल्याच्या संशयावरुन सभेची मान्यता रद्द केली. त्यामुळे ही संघटना बंद पडली तरीही रानडे व जोशी यांनी या संघटनेचे कार्य गुप्त सुरु ठेवले. पुढे या संघटनेला टिळकांसारखे महान नेतृत्व लाभले.

अशा रीतीने नव्या तरुण पिढीला सार्वजनिक कार्याचे बाळकडू पाजणारी राजकीय कार्याची दिशा दाखवणारी आणि महाराष्ट्रातील जनतेला त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणारी प्रभावी संघटना म्हणून या संघटनेकडे पाहिले जाते.

### ३) राष्ट्रीय सभा ते काँग्रेस पक्ष

भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना ही स्वातंत्र्यलढयातील निर्णायक घटना मानली जाते. ब्रिटीश सनदी अधिकारी सर ॲलन अक्टोव्हियन ह्यूम यांच्या पुढाकाराने सन १८८५ मध्ये मुंबई राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. देशव्यापी संघटन असलेली ही भारतातील पहिलीच संघटना होय. सर व्योमेशचंद्र बॅनर्जी हे राष्ट्रीय सभेचे पहिले अध्यक्ष होय. या सभेचे रुपांतर पुढे काँग्रेस पक्षात झाला.

काँग्रेस पक्ष आणि महाराष्ट्राच्या राष्ट्रवादी चळवळीत काँग्रेसचा सहभाग यांचा आढावा पुढील दोन टप्प्यात घ्यावा लागतो.

१) काँग्रेस पक्ष १८८५-१९२०) मवाळ जहाल युग.

२) काँग्रेस पक्ष (१९२० ते १९४७) गांधीयुग

#### १) काँग्रेस पक्ष (१८८५ ते १९२०)

१८८५ ते १९२० या कालखंडादरम्यान काँग्रेसची तत्त्वे महाराष्ट्रत रुजली गेली. काँग्रेसचे बरेचसे नेते आणि विचारवंत महाराष्ट्रातील मुंबई आणि पुणे प्रांतातील होते. वास्तविक पाहता या कालखंडाचे दोन उपकालखंड पडतात. ते म्हणजेच मवाळ युग व जहाल युग.

दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, गोपाळकृष्ण गोखले यांनी काँग्रेस पक्षात महत्त्वाची भूमिका बजावली. या नेत्यांना मवाळवादी नेते म्हटले जाते. भारताला क्रांती आंदोलन करून स्वातंत्र्य मिळणार नाही तर अर्ज, विनंत्या करुन सनदशीर मार्गाने स्वातंत्र्य मिळेल. अशी मवाळ नेत्यांची धारणा होती. जहालवादी नेत्यांना त्यांची ही भूमिका मान्य नव्हती. परिणामी १९०७ च्या सुरत काँग्रेस अधिवेशनात काँग्रेस पक्ष विभागला गेला. जहाल व मवाळ असे दोन गट काँग्रेसमध्ये निर्माण झाले.

लोकमान्य टिळक हे जहालमतवादी नेते होते. पुण्याचा प्लेग कमिशनर रॅण्ड यांची जेव्हा चाफेकर बंधुंनी हत्या केली तेव्हा त्यांनी आपल्या 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्रातून त्यांची स्तुती केली आणि राष्ट्रवादी चळवळीला प्रेरणा दिली. राष्ट्रवादी चळवळीला जोर यावा. लोकांमध्ये जनजागृती घडविण्यासाठी व ब्रिटीश सरकारविरोधात लढा देण्याच्या हेतूने त्यांनी पुण्यात गणेशोत्सव व शिवजयंतीसारखे उत्सव सुरु केले.

तसेच ब्रिटीश न्यायालयात अत्यंत परखड शब्दात स्वराज्य हा माझा जन्म सिद्ध अधिकार आहे आणि तो मी मिळवणारच असे ठणकावून सांगितले यामुळे महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळीला एक नवे प्रोत्साहन मिळाले.

१९०८ मध्ये ब्रिटीश सरकारने टिळकांविरुद्ध कायदेशीर कारवाई करून त्यांना शिक्षा केली आणि त्यांची रवानगी ब्रह्मदेशातील मंडालेच्या तुरुंगात केली याच काळात त्यांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला.

१९१६ मध्ये टिळकांनी ॲनी बेझंट यांच्यासह महाराष्ट्र होमरुल लीगची स्थापना केली. १ ऑगस्ट १९२० रोजी टिळकांचे निधन झाले. काँग्रेसच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासातील एक पर्व संपले व महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळ मागे पडली.

**२) काँग्रेस पक्ष (१९२० ते १९४७) -:**

टिळकांच्या मृत्यूनंतर काँग्रेसचे नेतृत्त्व महात्मा गांधींकडे आले आणि राष्ट्रवादी चळवळीला नवजीवन मिळाले. परंतु महाराष्ट्रातील टिळकवादी नेत्यांना गांधीचे नेतृत्व मान्य नव्हते.

१९२० च्या नागपूर काँग्रेस अधिवेशनात गांधींनी असहकार चळवळीचा पुरस्कार केला. परंतु महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या कित्येक नेत्यांना ही चळवळ करणे योग्य वाटत नव्हते. त्याचबरोबर काही लोकांचा चळवळीला पाठिंबा होता.

काकासाहेब खाडीलकर, शिवरामपंत परांजपे, गंगाधरराव देशपांडे या नेत्यांना गांधीचे असहकार आंदोलन म्हणजेच टिळकांच्या स्वदेशी चळवळीचा पुढचा टप्पा वाटला परिणामी त्यांनी गांधीच्या चळवळीला पाठिंबा दिला. याउलट काही टिळकवादी नेत्यांनी असहकार चळवळीविरुद्ध बंड पुकारले.

१९२२ मध्ये उत्तरप्रदेशातील चौरीचौरा येथे घडलेल्या घटनेमुळे गांधीजींनी असहकार चळवळ मागे घेतली. फेब्रुवारी १९२२ ला चित्तरंजन दास, मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्षाची स्थापना केली. १९२३ च्या निवडणुकीत स्वराज्य पक्षाला विजय मिळाला. परंतु या पक्षांच्या नेत्यांमध्ये वाद निर्माण झाले. याचे मुख्य कारण म्हणजे मोतीलाल नेहरु आणि दास हे गांधीवादी नेते होते तर एन.सी. केळकर हे टिळकवादी नेते होते. त्यामुळे केळकर स्वराज्य पक्षातून बाहेर पडले आणि त्यांनी १९२६मध्ये महाराष्ट्रात प्रतिसहकार पक्षाची स्थापना केली. काँग्रेसवर टीका करण्यासाठी या पक्षाने हिंदु महासभा या संघटनेची मदत घेतली. १९३७ च्या निवडणुकीत डेमोक्रॅटिक स्वराज्य पार्टी असे नाव धारण करून भाग घेतला. परंतु या निवडणुकीत केळकरांच्या पक्षाला विजय मिळाला नाही.

महात्मा गांधी आणि काँग्रेसला पाठिंबा देणारे महाराष्ट्रातील महान नेते म्हणजे शंकरराव देव होय. त्यांनी काँग्रेस पक्ष ब्राम्हणेतर समाजाला १९३० पासून सदस्यत्व मिळवून देण्यास सुरुवात केली. यामुळे काँग्रेस पक्षाची लोकप्रियता बहुजन समाजात पसरली.

यानंतर १९३२ च्या दरम्यान काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करण्याचा विचार पुढे आला. त्याचे नाव म्हणजे काँग्रेस समाजवादी पक्ष होय. (CSP-Congress Socialist Party) या पक्षाचे नेते अच्युतराव पटवर्धन, सुसूफ मेहरअली हे होते. १८४७ मधून CSP काँग्रेसमधून बाहेर पडला व त्यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. १९४८ याच कालखंडादरम्यान ब्राम्हणेतर चळवळीचा अस्त झाला आणि हिंदुत्ववादी संघटनांचा उदय झाला. या संघटना म्हणजे हिंदु महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ होय. या संघटनातील कार्यकर्ते पूर्णपणे गांधी आणि कॉग्रेसविरोधातील होते. महाराष्ट्रातील ब्राम्हण जातीतील लोकांचा या संघटनेत सर्वात जास्त भरणा होता. या दोन्ही संघटना केवळ ब्राह्मण्यवादाचा पुरस्कर्त्या असल्याने ब्राम्हणेतर लोकांना त्या आकर्षित करू शकल्या नाही. या दोन्ही संघटनांमुळे महाराष्ट्रात ब्राम्हण - ब्राम्हणेतर वाद अधिकच वाढत गेला. त्यांच्यात एकी निर्माण होणे अशक्य झाले असे असले तरी या दोन्ही संघटनांनी महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळीत मोलाची कामगिरी बजावली. हे मान्य करावे लागेल.

### १.४.१ समाजसुधारणा चळवळ

सन १८१८ मध्ये झालेल्या पेशव्यांच्या पराभवानंतर ब्रिटिश सत्ता भारतात स्थिर झाली. भारतीयांचा पाश्चात्य लोक, त्यांचे आचारविचार अशा गोष्टींशी नव्याने परिचय होऊ लागला. याचा परिणाम भारतातील समाजजीवनावर होण्यास सुरुवात झाली. त्यामुळे धार्मिक व सामाजिक सुधारणा चळवळींचा उदय झाला.

ब्रिटिशांनी भारतात शिक्षणप्रसार करण्यास सुरुवात केली. या शिक्षण प्रसारामुळे स्वत:चा विचार असणारा असा नवशिक्षित तरुणांचा वर्ग तयार झाला. या तरुणांना भारतीय समाजातील अनिष्ट रुढी चालिरितीमध्ये बदल घडविण्याची गरज वाटू लागली. समाजाच्या प्रगतीला मारक अशा अनिष्ट परंपरावर टीका करण्याचे काम समाजसुधारकांनी सुरु केले. त्यांनी आपल्या लेखनातून विचार-कृतीतून समाज प्रगतीस पोषक असे परिवर्तन घडवून आणण्याचे प्रयत्न सुरु कले.

महाराष्ट्र समाजसुधारणा चळवळीचा विचार करीत असताना आपण दोन मुद्दयांचा उहापोह करणार आहोत.

१) जातिअंतासंबंधी चळवळ

२) स्त्री विषयक समाजसुधारणा चळवळ

## १) जातिअंतासंबंधी चळवळ

प्राचीन काळापासूनच भारतीय समाज चार वर्णामध्ये विभागलेला आहे हे चार वर्ण म्हणजेच ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र यापैकी वरील तीन वर्णातील लोकांनी समाजतील चौथ्या वर्णातील म्हणजेच शुद्र वर्णातील लोकांवर अन्याय - अत्याचार केले आहे. महाराष्ट्रातील जातिसंस्थेचा विचार करताना या वर्णातील लोकांचा दलित किंवा अस्पृश्य असा उल्लेख केला जातो. अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या या समाजास समाजामध्ये कोणतेही मानाचे स्थान नव्हते. सार्वजनिक पाणवठ्यावर त्यांना पाणी भरण्यास बंदी होती. तसेच हिंदूंची देवालये, धार्मिक स्थाने, सार्वजनिक ठिकाणे इ. ठिकाणी येण्यास त्यांना बंदी होती. अत्यंत हीनदिन अशी वागणूक या समाजाला मिळत होती. त्यांना पशुपेक्षा हीन जिणे जगावे लागत होते. हा जातीभेद नष्ट झाला पाहिजे. म्हणून अनेक कर्ते समाजसुधारक पुढे आले. त्यातील काही महत्त्वाच्या समाजसुधारकांच्या कार्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### १) महात्मा फुले

महाराष्ट्रातील अस्पृश्य लोकांच्या वेदना जाणून घेऊन त्यावर फुंकर घालण्याचे कार्य करणारा पहिला कर्ता सुधारक म्हणजे महात्मा ज्योतिबा फुले. समाजातील विषमता नष्ट व्हावी म्हणून त्यांनी समाजाचा रोष पत्करुन कार्य केले. अस्पृश्याच्या उद्धारांसाठी सुरु झालेली ही महाराष्ट्रातील आद्य चळवळ मानावी लागेल. अस्पृश्य वर्गाची उन्नती करण्यासाठी फुले यांनी २४ ऑक्टोबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. अस्पृश्य लोकांना शिक्षण देणे, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे त्यांच्यात जनजागृती करण्याचे कार्य सत्यशोधक समाजाने केले. फुले यांनी अस्पृश्य मुलांसाठी शाळा सुरु केल्या दलितांवर पसरलेली दैववादाची निराशेचे औदासिन्याचे धुके दूर करून त्यांना आत्मोद्धाराचा मार्गदाखविला.

### २) राजर्षी शाहू महाराज

म. फुले यांच्यानंतर कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी दलितांसाठी अनेक कार्ये केले. त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण मिळावे म्हणून शाळा, महाविद्यालये, वसतिगृहांची स्थापना केली. विद्यार्थ्यांसाठी कमवा आणि शिका ही योजना राबवली. तसेच महारवतने नष्ट केली. दलितांना नोकऱ्यामध्ये प्रथम आरक्षण शाहू महाराजांनी दिले. तसेच त्यांना व्यवसाय काढण्यासाठी मदत केली. छत्रपती शाहू महाराजांनी १९११ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची पुनर्स्थापना केली. त्यानी केलेल्या या कार्यामुळे त्यांना लोकांचा राजा असा मान मिळाला.

### ३) महर्षि विठ्ठल रामजी शिंदेः

महाराष्ट्रातील जातिअंताच्या चळवळीचा विचार करीत असताना महर्षी वि.रा. शिंदे यांचे कार्य विसरुन चालणार नाही. १९०६ मध्ये शिंदे यांनी दलितांच्या उद्धारासाठी डिप्रेस्ड क्लासेस मिशन ची स्थापना केली. तसेच या संस्थेच्या

माध्यमातून अस्पृश्यांना शिक्षण देण्याची कार्य केले. या संस्थेच्या व्यासपीठावरून प्रथमच शाळा, विहिरी मंदिरे सर्वांना खुली असावीत. असी मागणी करण्यात आली. सर्व भारतीय नागरकांचा हक्क समान आहे अशी घोषणा मिशनकडून करण्यात आली.

**४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारण आणि दलितोद्धाराच्या कार्यासाठी जे वातावरण निर्माण झाले होते त्याला नवी दिशा देण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांनी दलित समाजामध्ये स्वत्वाची भावना जागृत केली. १९२४ मध्ये त्यांनी बहिष्कृत हितकारिणी सभा स्थापन केली. १९२८ साली समाज समता संघाची स्थापना केली. दलितांना सार्वजनिक पाणवठे, विहिरी, तळे, मंदिरे खुली व्हावी म्हणून आंदोलन उभे केले. यासंदर्भात १९३० मध्ये मंदिरप्रवेशासाठी केलेला नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रह प्रसिद्ध आहे. मनुष्याच्या वर्णव्यवस्थेमुळे दलितांवर अन्याय होतो म्हणून त्यांनी मनुस्मृती या हिंदू ग्रंथांचे दहन केले. १९२७ साली महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. सर्वसामान्यांच्या प्रबोधनासाठी ‘मूकनायक’, बहिष्कृत भारत, जनता ही वृत्तपत्रे चालवली. केवळ सामाजिक हक्कांसाठी आपला लढा मर्यादित न ठेवता राजकीय हक्कांची मागणी त्यांनी केली. १९४२ मध्ये आंबेडकरांनी शेडूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली पुढे त्याचे रुपांतर रिपब्लीकन पक्षात करण्यात आले.

**५) इतर समाजसुधारकांचे कार्यः**

वरील समाजसुधारकांव्यतिरिक्त महाराष्ट्रातील साने गुरुजी, सावरकर, संत गाडगेबाबा यांनी समाजातील जातीयता नष्ट व्हावी म्हणून प्रयत्न केले. सावरकरांनी रत्नागिरीत पतित पावन मंदिर स्थापन केले तर साने गुरुजींनी पंढरपूरच्या विठ्ठलाचे दर्शन दलितांना मिळावे म्हणून उपोषण केले व पंढरपुरचे मंदिर सर्वांसाठी खुले केले. १९व्या शतकात अस्पृश्यांसाठी शिक्षणाचे दरवाजे बंद झाले होते ते २० व्या शतकात खुले झाले.

**२) स्त्री समाजसुधारण चळवळ**

अस्पृश्य समाजातील लोकांप्रमाणे भारतीय समाजातील स्त्रियांची स्थितीदेखील अत्यंत करुणाजनक होती. समाजात स्त्रीला कोणतेच स्वातंत्र्य नव्हते. सर्व ठिकाणी ती बंधनात अडकलेली होती. त्याचप्रमाणे समाजात बालविवाह सतीप्रथा, देवदासी पद्धती, केशवपन, हुंडा पद्धती, बाल विवाह यासारख्या अनेक अनिष्ट रूढी परंपराचालिरिती अस्तित्वात होत्या. या सर्व दास्यातून स्त्रियांची मुक्तता करण्यासाठी अनेक समाजसुधारक पुढे आले. त्यांच्या कार्याचा आढावा खालील प्रमाणे घेता येईल.

**१) महात्मा ज्योतिबा फुलेः**

महात्मा फुले यांनी स्त्रीशिक्षणाचे अग्रदूत म्हटले जाते. हिंदू समाजातील शुद्र व स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्याचे कार्य महात्मा फुले यांनी केले.स्त्रियांची होणारी सामाजिक उपेक्षा थांबविण्यासाठी शिक्षण महत्त्वाचे आहे. याची जाणीव

झाल्यानंतर स्त्रियांसाठी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात त्यांनी शाळा सुरु केली. १८६३ मध्ये फुले यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. १८५४ मध्ये मुलींसाठी पहिली रात्रशाळा सुरु केली. महात्मा फुले विवाहाला करार मानत. अनिष्ट रुढी अपमानास्पद विधी, हुंडा पद्धती यांना विरोध करून स्त्री पुरुष समानतेवर आधारित सत्यशोधक विवाहपद्धती सुरु केली. आप्तमित्रांच्या साक्षीने हे विवाह होऊ लागले. त्याचप्रमाणे फुले यांनी विधवा पुर्नविवाहाचा पुरस्कार केला. सती प्रथेविरुद्ध आवाज उठवला.

### २) ताराबाई शिंदेः

महात्मा फुले यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन ताराबाई शिंदे यांनी स्त्री उद्धाराचे कार्य केले., १८८२ मध्ये त्यांनी स्त्री पुरुष तुलना हा ग्रंथ लिहिला. हे पहिले स्त्रीवादी पुस्तक मानले जाते. पुरुषवर्गाचे वर्चस्व संपविल्यानंतर समाजाची निकोप वाढ होईल असा विचार त्यांनी मांडला. एकतर्फी पतिव्रताची कल्पना बालविधवांवरील सक्ती, अंधश्रद्धा यांचात्यांनी आपल्या लेखनाद्वारे निषेध केला.

### ३) महर्षि धोंडो केशव कर्वेः

स्त्री सुधारणांच्या संदर्भात महर्षी कर्वे यांचे योगदान लक्षणीय आहे. विधवा पुनर्विवाहाच्या व स्त्री शिक्षणासंदर्भात त्यांनी कार्य केले. १८७३ मध्ये राधाबाईशी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या निधनानंतर त्यांनी विधवा गोपुबाईशी विवाह करून आदर्श घेतला. १८९५ मध्ये विधवागृह स्थापून त्यांच्या शिक्षणाची सोय केली. याशिवाय त्यांनी विधवा विवाहोत्तेजक मंडळी (१८९३), महिला विद्यालय, १९०७, निष्काम कर्मनठ (१९१०), महिला विद्यापीठ १९१६ यांचे नामकरण पुढे एस.एन.डी.टी.विद्यापीठ असे करण्यात आले. त्याचप्रमाण ग्रामीण शिक्षण प्रसारासाठी ग्राम प्राथमिक शिक्षण मंडळ स्थापन केले. त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणू आचार्य अत्रे यांनी त्यांना भारतातील एका क्रांतिकारकांचे साक्षीदार व महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाचे शिल्पकार असे म्हटले आहे.

### ४) समाज स्वास्थ्यकार र. धो. कर्वेः

र. धो. कर्वे हे महर्षी कर्व्यांचे पुत्र होय.आपले संपूर्ण आयुष्य त्यांनी सामाजिक हितासाठी खर्च केले. त्यांनी संततिनियमनाचा पुरस्कार केला. त्यासाठी त्यांनी समाजस्वास्थ्य हे मासिक सुरु केले. कुटुंबनियोजनाच्या चळवळीचे श्रेय त्यांना दिले जाते.

### ५) पंडिता रमाबाईः

महाराष्ट्रातील स्त्रीसुधारणाविषयक कार्यात पंडिता रमाबाईच्या कार्याला महाराष्ट्रात तोड नाही बालविवाह विधवा पुनर्विवाहाला विरोध अशा समाजविघातक चालींच्या निवारणासाठी त्यांनी आर्य महिला समाजाची

स्थापना केली विधवांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी मुंबई शहरात त्यांनी शारदा सदन सुरु केले. त्याचप्रमाणे पतितस्त्रियांसाठी कृपासदन तर अनाथ बालकांसाठी सदानंद सदन सुरु केले. विधवा पुनर्विवाह सतीप्रथा, बालविवाह या अनिष्ट चालीरितींना विरोध केला, तसेच विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार करुन शारदा सदनातील गोदूबाई या विधवेचा विवाह महर्षी कर्वे यांच्याशी लावून दिला. त्यांनी केलेल्या कार्याबद्दल सरकारने १८१९ मध्ये कैसर ई हिंद हे सुवर्णपदक बहाल केले.

या व्यतिरिक्त स्त्री सुधारणांसाठी अनेक समाजसुधारकपुढे आले. जगन्नाथ शंकरशेठ, बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ गणेश आगरकर, न्या. म.गो. रानडे, विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी स्त्रीयांसाठी मोलाचे कार्य केले. विष्णूशास्त्री पंडितांनी बालविवाह, पुनर्विवाह, जरठ -कुमारी विवाह इ. प्रश्नांसंदर्भात इंदुप्रकाश वृत्तपत्रात लेखन केले.

१८५८ मध्ये विधवा विवाहोत्तेजक मंडळ स्थापन केले. न्यायमूर्ती रानडे यांनी देखील स्त्रीयांसाठी बहुमुल्य असे कार्य केले.

थोडक्यात, वरील विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रात राष्ट्रवादी आणि समाजसुधारणा चळवळीने फारमोठे योगदान दिले आहे. राष्ट्रवादाचा व समाजसुधारणांचा पाया घालण्याचे कार्य करण्यासाठी अनेक कर्ते विचारवंत, सुधारक पुढे झाले आणि त्यांनी महाराष्ट्राला आधुनिक दिशा दाखविण्याचे कार्य केले.

**आपली प्रगती तपासा**

१) महाराष्ट्रातील राष्ट्रवादी चळवळ स्पष्ट करा.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

२) महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीचा आढावा घ्या.

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## १.५ संयुक्त महाराष्ट्र चळवळ

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारतभर विविध राज्ये अस्तित्वात आली. ही राज्ये भाषा, प्रशासकीय सोय, लोकमानस या त्रिसूत्रीच्या आधारे अस्तित्वात आली होती. महाराष्ट्र ही त्याला अपवाद नाही. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही स्वातंत्र्योत्तर भारताच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना आहे. मराठी भाषिकांची मुख्य इच्छा आणि ध्येय म्हणजे भाषावर प्रांतरचना करून मराठी भाषिकांचे वेगळे राज्य स्थापन करणे या इच्छेतूनच संयुक्त

महाराष्ट्र चळवळीचा उदय झाला. परंतु महाराष्ट्र राज्य सहजासहजी अस्तित्वात आले नाही. त्यासाठी कार्यकर्त्यांना आणि मराठी भाषिकांना अखंड प्रयत्न करावे लागले. शेवटी १ मे १९६० रोजी महाराष्ट्राची निर्मिती भारतीय संघराज्यातील १५ वे घटकराज्ये म्हणून झाली.

### १.५.१ संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उगम आणि विकास

ब्रिटिश काळात बॉम्बे प्रांतात महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, सिंध, मुंबई शहर असे अनेक भाग होते. या सर्वांचे मिळून मुंबई प्रांत बनला होता. १९३७ मध्ये ब्रिटिशांनी सिंध प्रांताला मुंबई प्रांतापासून वेगळे केल्याने सिंधी भाषिक पाकिस्तानात निघून गेले. त्यानंतर मुंबई प्रांतात केवळ मराठी, गुजराती, कन्नडी भाषिकांचा भरणा होता.

भारतामध्ये भाषावार प्रांतरचना करण्यासाठी ब्रिटिश काळापासूनच लोकांची इच्छा प्रकट झाली होती. १८९७ मध्ये श्री महेश प्रसाद नारायण यांनी बिहारी लोकांचे बिहार नावाचे वेगळे राज्य स्थापन करण्याची मागणी केल्या नंतर ओरिया भाषिकांनी वेगळ्या ओरिसाची मागणी केली.

विठ्ठल वामन ताम्हणकर या साहित्यिकांनी आपल्या महाराष्ट्राचे तीन भाग या पुस्तकात ब्रिटिशांकडे केंद्रीय प्रांत व बेरार, हैदराबाद, मुंबई प्रांत यातील मराठी भाषिकांचे भाषिकांना एकत्र करुन नवे राज्य स्थापन करण्याची मागणी केली.

१९१७ च्या कलकत्ता अधिवेशनात श्री. पट्टाभ्भी सीतारमय्या या तेलगू भाषिक नेत्यांनी आंध्र प्रांत स्वतंत्र करण्याचा ठराव मांडला. त्याला महात्मा गांधीनी विरोध केला. १९२१ च्या नागपूर काँग्रेस अधिवेशनात महात्मा गांधीनी भाषावार प्रांतरचनेचा ठराव मांडला. काँग्रेसची फेर उभारणी भाषेच्या तत्त्वावर केली गेली. त्यामुळे कॉग्रेस पक्ष प्रांतीक भाषांच्या मदतीने राज्याराज्यत पोहोचला. या नंतर काँग्रेसने बॉम्बे प्रांतातील सर्व मराठी भाषिक प्रांतामध्ये आपल्या शाखा स्थापन केल्या. जसे बी.पी. सी.सी. बॉम्बे प्रदेश काँग्रेस, कमिटी एन.पी.सी.सी. बॉम्बे प्रदेश काँग्रेस कमिटी, एनपी.सी.सी नागपूर प्रदेश काँग्रेस कमिटी.

प्रामुख्याने संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या उदयाचे काही टप्पे आहेत ते खालील प्रमाणे.

**१) संयुक्त महाराष्ट्राची संकल्पनाः**

आचार्य विनोबा भावे यांनी जानेवारी १९२३ मध्ये महाराष्ट्रधर्म नावाचे मासिक सुरु केले. या मासिकात त्यांनी संयुक्त महाराष्ट्र हा शब्दप्रयोग सर्वप्रथम केला. त्यात त्यांनी असे सुचवले की, मराठी भाषिकांना एकत्रित करून संयुक्त महाराष्ट्र स्थापन केला जावा, अशी मागणी केली.

१९३७ च्या मराठी साहित्य समेल्लनात महामहोपाध्याय दत्तो वामन पोद्दार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा पुनरुच्चार केला. याच दरम्यान केंद्रीय प्रांत (नागपूर व विदर्भ) आणि बेरार प्रांतांच्या विधानसभांनी महाविदर्भ नावाच्या राज्याची मागणी केली. ज्यामध्ये केंद्रीय प्रांत व बेरारमधील मराठी भाषिकांचा समावेश असेल.

१२ मे १९४६ रोजी बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेल्लनात संमेलनाध्यक्ष श्री. गं. त्र्यं. माडखोलकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सर्व मराठी भाषिकांना एकत्र येण्याची विनंती केली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे सूतोवाच केले. संयुक्त महाराष्ट्रात मुंबई, मध्य प्रांत वऱ्हाड, मराठवाडा, गोमंतक या प्रांतातील मराठी भाषिक प्रदेश सामील करण्याची मागणी करण्यात आली. त्यानंतर संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. तिचे अध्यक्ष म्हणून शंकरराव देव यांची निवड करण्यात आली.

**२) अकोला करार १९४७-:**

संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव यांनी अकोल्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र, मुंबई व विदर्भ प्रांतातील नेत्यांची संयुक्त महाराष्ट्र स्थापन्यासंबंधी एकबैठक घेतली. या बैठकित अकोला करार पारित करण्यात आला. त्यानुसार संयुक्त महाराष्ट्र हा वेगळा प्रांत निर्माण करण्यात यावा. अशी मागणी केली. त्या प्रांतात पश्चिम महाराष्ट्र आणि महाविदर्भ असे दोन उपप्रांत असावेत. असे सुचविण्यात आले. या दोन्ही उपप्रांतांची स्वतंत्र विधिमंडळे आणि मंत्रिमंडळ असावीत. परंतु संयुक्त महाराष्ट्राच्या मागण्या अमान्य झाल्यास सर्व मराठी भाषिक नेत्यांनी महाविदर्भ राज्याच्या मागणीला पाठिंबा देण्यात यावा, असे ठरले.

**३) दार आयोग**

भारतातील सर्व प्रमुख नेत्यांनी भाषावार प्रांतरचना करण्यास प्रखर विरोध केला. देश स्वतंत्र होताच केंद्रसरकारने आंध्रप्रदेश कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ या प्रांतांच्या भाषावार पुर्नरचनेचा विचार करण्यासाठी ताबडतोब एक आयोग नेमावा आणि आयोगाच्या अहवालाचा विचार करून संविधानसभेने कृती करावी. असा प्रस्ताव पारित करण्यात आला. त्यानुसार १७ जून १९४८ रोजी केंद्र सरकारने भाषावार प्रांतरचना आयोग नेमला. या आयोगाच्या अध्यक्ष अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस. के. दार होते. त्यांच्यामुळे हा आयोग दार आयोग म्हणून ओळखला जातो. बिहार संविधानसभेचे सदस्य जगत्नारायण लाल आणि निवृत्त आय.सी.एस अधिकारी पन्नालाल हे दोघे या आयोगाचे सदस्य होते.

१० डिसेंबर १९४८ रोजी दार आयोगाचा अहवाल प्रकाशित होताच भाषावार प्रांतरचनेच्या पुरस्कर्त्यांनी त्यावर टीकेची झोड उठवली. प्रांतांची पुनर्रचना केवळ भाषेच्या आधारे करणे राष्ट्रहिताच्या दृष्टीने अनुचित व धोक्याचे ठरेल. असे आयोगाचे मत असल्याने भाषावार प्रांतांची निर्मिती करु नये असा सल्ला दार आयोगाने दिला.

**४) ज.व.प. समिती / जेव्हीपी समितीः**

दार समितीचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर १५ डिसेंबर रोजी जयपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात काकासाहेब गाडगीळांनी या अहवालावर टीका केली. या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री पट्टाभी सीतारामय्या हे होते. आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ आणि महाराष्ट्र या प्रांतातील भाषावार प्रांतरचनेचे समर्थक असलेल्या काँग्रेस नेत्यांची नाराजी लक्षात घेऊन काँग्रसने पट्टाभी सीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखाली

जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल यांची एक त्रिसदस्यीय समिती नेमली. तिन्ही नेत्यांच्या नावातील सुरुवातीच्या अक्षरावरुन ही समिती जवप समिती म्हणून ओळखली जाते. या समितीचा अहवाल १ एप्रिल १९४९ रोजी सादर करण्यात आला. या समितीने असे सुचविले की, भाषेमुळे लोकांमध्ये एकता निर्माण होत असली तरी बऱ्याचदा भाषेमुळे लोकांमध्ये फूटदेखील पडू शकते. सद्यपरिस्थितीत भाषावार प्रांतरचनेचा प्रश्नापेक्षा इतर प्रश्नाकडे शासनाने लक्ष द्यावे. लोकभावना लक्षात घेऊन आंध्रप्रदेश राज्याची भाषावार प्रांतरचना करावी. असे या समितीने सुचविले

**५) नागपूर करार १९५३ -:**

सर्व मराठी भाषिक नेत्यांनी नागपूर येथे सप्टेंबर १९५३ मध्ये एक करार पारित केला. तो नागपूर करार म्हणून प्रसिद्ध आहे. या करारात असे स्पष्ट करण्यात आले की, सध्याच्या मुंबई, मध्यप्रदेश हैदराबाद या राज्यातील सलग मराठी भाषिक प्रदेशांचे मिळून एक राज्य बनविण्यात यावे. मुंबई ही त्यांची राजधानी असेल. जेव्हा संयुक्त महाराष्ट्र स्थापन केला जाईल तेव्हा विदर्भ मराठवाड्यालाही संयुक्त महाराष्ट्रात सामील करून घेता येईल. परंतु ही मागणी एन.पी.सी.सी. ला मंजूर नव्हता. एन.पी.सी.च्या अणे बियाणी शंका गटाला स्वतचे नागविदर्भ नावाचे राज्य हवे होते. ही बाब बी.पी.सीसीला मंजूर नव्हती त्यांमुळे महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्यासंबंधी मतभेद निर्माण झाले.

**६) राज्यपुनर्रचना आयोग / न्या. फझल अली आयोग**

१ नोव्हेंबर, १९५३ रोजी आंध्रप्रदेश राज्याची स्थापना भाषेच्या आधारावर केली गेली. यामुळे इतर राज्यांमध्ये भाषावार प्रांतरचना करण्यासंबंधीच्या चळवळींनी जोर पकडला. जिथे तिथे व्यापक स्वरुपात भाषावार दंगे सुरू झाले. यामुळे भारत सरकारने १९५३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश सय्यद फझल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्यपुर्नरचना आयोग नेमला. पंडित हृदयनाथ कुंझरु आणि भारतीय राजदूत कवलम माधव पन्तिकर ऊर्फ के एम. पाण्णिकर हे या आयोगाचे सदस्य होते.

**७) न्या फझल अली आयोगाचा अहवाल**

१९५५ अली न्या. फझल अली आयोगाने आपला अहवाल सादर केला. या अहवालात असा निर्णय घेण्यात आला होता की एका मोठया द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना केली जाईल. ज्यात सर्व मराठी भाषिकांचा समावेश असेल. विदर्भाचे वेगळे राज्य करावे. द्विभाषिक मुंबई राज्यात बेळगाव कारवारचा समावेश केला जाणार नाही.

**८) फझल अली आयोगाच्या अहवालाची प्रतिक्रियाः**

आयोगाच्या शिफारशी प्रसिद्ध झाल्यानंतर ठिकठिकाणी आयोगाच्या अहवालाच्या विरोधात निषेध नोंदवला गेला. एम.पी.सी.सी ते द्विभाषिक मुंबई राज्य पूर्णपणे नामंजूर केले. १९५५ मध्ये एमपी.सीसी. ने एका प्रस्तावास असे मत व्यक्त केले की जर संयुक्त महाराष्ट्र स्थापन करणे सरकारला कठीण जात असले तर मोठया द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करावी. ज्यात नागविदर्भ पासून सर्व मराठी भाषिक प्रांतांचा व

गुजराती भाषिक प्रांतांचा समावेश करावा. या प्रस्तावात असेही म्हटले होत की, गुजरातला वाटल्यास ५ वर्षानंतर त्यांनी संयुक्त महाराष्ट्र सोडून निघून जावे.

हा प्रस्ताव जी.पी.सीला (गुजरात प्रदेश कॉंग्रेस कमिटी) ला मान्य नव्हता. कारण मोठया द्विभाषिकेत मुंबई राज्यात गुजराती भाषिक अल्पसंख्याक ठरणार होते.

**९) महाराष्ट्रातील दंगेः**

फझलअली आयोगाच्या अहवालानंतर पंतप्रधान नेहरु यांनी भारतीय संसदेत मुंबईला केंद्रशासित प्रदेश बनवण्याची घोषणा केली. नेहरुंचा हा प्रस्ताव बॉम्बे प्रांतातील नेत्यांना मंजूर नव्हता. त्यामुळे सी.डी. देशमुख यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. देशमुख यांनी असे म्हटले की, नेहरूंचा प्रस्ताव घटनाबाह्य असून नेहरु हुकूमशहा बनण्याचा प्रयत्न करीत आहेत. नेहरुंच्या या प्रस्तावामुळे महाराष्ट्रात ठिकठिकाणी दंगे घडले. आंदोलकांनी हिंसक आंदोलन सुरु केले. परिणामी पोलिसांना लाठीमार गोळीबार करावा लागला. या दंग्यामध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे १०६ कार्यकर्ते शहीद झाले.

**१०) संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापनाः**

जेव्हा बॉम्बे प्रांतात संयुक्त महाराष्ट्र परिषद चळवळ कार्यरत होती. तेव्हा मराठी भाषिकांना संयुक्त महाराष्ट्राऐवजी द्विभाषिक मुंबई राज्य मिळाले. परिणामी लोकांचा भ्रमनिरास झाला. आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेवरुन लोकांचा विश्वास उडाला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी काँग्रेसेतर राजकीय पक्षांनी ८ फेब्रुवारी १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीची एसएमएस स्थापना केली. संयुक्त महाराष्ट्र समिती या विरोधी पक्षाच्या आघाडीत ११ घटक पक्ष होते. प्रजा समाजवादी पक्ष व भारतीय मार्क्सवादी पक्ष हे दोन संयुक्त महाराष्ट्र समितीतील दोन प्रमुख पक्ष होते. या समितीचे मुख्यालय पुणे येथे होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या स्थापनेनंतर दि. १० फेब्रु. १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र परिषद बरखास्त करण्यात आली.

**११) मोठया द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापनाः**

फझल अली आयोगाच्या शिफारशीनुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी मोठया द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना केली गेली. या मध्ये सर्व मराठी भाषिक प्रांत व गुजराती भाषिक प्रांतांचा समावेश केला गेला. तरीही संयुक्त महाराष्ट्र चळवळ मागे पडली नाही.

**१२) यशवंतराव चव्हाण यांचा उदय**

१६ ऑक्टोबर १९५७ रोजी काँग्रेस विधानसभेचे नेते यशवंतराव चव्हाण यांना मोठया द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून घोषीत केले. पूर्वमुख्यमंत्री मोरारजी देसाई यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला मुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्यानंतर चव्हाण यांनी असे म्हटले की राज्याची भाषावार प्रांतरचना करून मोठया द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना करून सरकारने योग्य ते पाऊल उचलेले आहे याचे कारण म्हणजे

महाराष्ट्रातील निष्ठेपेक्षा काँग्रेस पक्ष आणि पक्षाचे नेते यांच्यावरील निष्ठा त्यांना जास्त महत्त्वाची वाटत होती.

### १३) १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणूकाः

मोठया द्विभाषिक मुंबई राज्याच्या स्थापनेनंतर भारतात १९५७ मध्ये दुसऱ्या लोकसभा निवडणुका घेण्यात आल्या. संयुक्त महाराष्ट्र समितीने या निवडणुका काँग्रेस विरोधात लढविल्या. या निवडणुकांचा प्रचार बॉम्बेप्रांतात अत्यंत हिंसक रीतीने केला गेला. काँग्रेस पक्ष व काँग्रेसेतर पक्षांमध्ये दंगे निर्माण झाले. काँग्रेसची कोणतीही सभा शांततेत पार पाडली गेली नाही. अनेक हिंसक प्रकार या निवडणूकीत झाले. मराठी भाषिकांचा स्वाभिमान जागृत करण्यासाठी संयुक्त महाराष्ट्र समितीने ठिकठिकाणी १०५ हुतात्माची चित्रे लावली. जेणेकरून मराठी भाषिकांच्या भावना उफाळून येतील व कांग्रेसविरोधी प्रचाराला जोर येईल.

या निवडणुकीमध्ये काँग्रेसचा फार मोठा पराभव झाला. त्यानंतर द्विभाषिक मुंबई राज्यात विधानसभा निवडणुका लढविल्या गेल्या या सर्वामध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीला भरघोस मते मिळाली. तसेच १९५७ मध्ये बीएमसी च्या निवडणुका लढविल्या गेल्या. काँग्रेस पक्ष अपयशी ठरला. केंद्रामध्ये मात्र काँग्रेस यशस्वी ठरला आणि नेहरु दुसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून रूजू झाले.

या सर्व निवडणुकांतील पराभवाचा परिणाम म्हणून मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी द्विभाषिक मुंबई राज्यावर काँग्रेस ने फेरविचार करावा, असे मत व्यक्त केले. त्यांनी काँग्रेसला असा इशारा दिला की, जर संयुक्त महाराष्ट्राची स्थापना केली गेली नाही तर पुढच्या निवडणूकीत काँग्रेसला हार पत्कारावी लागेल.

### १४) संयुक्त महाराष्ट्राची स्थापनाः

३० नोव्हेंबर १९५७ रोजी पंतप्रधान नेहरु प्रतापगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे अनावरण करण्यासाठी आले असता संयुक्त महाराष्ट्र समितीच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे काळे झेंडे दाखवून स्वागत केले. त्यामुळे नेहरुंना द्विभाषिक मुंबई राज्यावर फेरविचार करण्यासंबंधी मुख्यमंत्री चव्हाण यांनी दिलेली सूचना पटली.

१९५९ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्ष बनल्या. त्यांनी महाराष्ट्राच्या दौरा करुन येथील जनमताचा अभ्यास केला. द्विभाषिक राज्य फार काळ टिकू शकत नाही. हे लक्षात येऊन त्यानी एक समिती नेमली. डिसेंबर १९५९ मध्ये या समितीने आपला अहवाल काँग्रेस वर्किंग कमिटीला सादर केला. त्यामध्ये वर्किंग कमिटीने फेरविचार करुन द्विभाषिक राज्याचे विसर्जन करावे. असा निर्णय दिला. मराठी भाषीकांचे संयुक्त महाराष्ट्र व गुजरात भाषिकांचे गुजरात नावाचे राज्य स्थापन करावे असा मांडणयात आला.

एप्रिल १९६० मध्ये भारतीय संसदेने बॉम्बे पुनर्रचना विधेयक पारित केले. त्यानुसार १ मे १८६० रोजी बॉम्बे प्रांताचे विभाजन करण्यात आले. त्यातून महाराष्ट्र व गुजरात

या दोन राज्यांची निर्मिती करण्यात आली. अशा प्रकारे मराठी भाषिकांचे स्वत:चे महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापने नंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळ संपुष्टात आली.

### १.५.२ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अडथळेः

संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर संयुक्त महाराष्ट्र समिती लोकांमध्ये अत्यंत लोकप्रिय झाली. परंतु जेव्हा महाराष्ट्र चळवळ कार्यरत होती तेव्हा या चळवळीसमोर अनेक अडथळे निर्माण झाले होते. ते खालील प्रमाणे.

**१) एकतेचा अभाव**

जेव्हा आंध्रप्रदेश राज्याची भाषावार पुर्नरचना करण्यासंबंधीचे आंदोलन सुरु होते तेव्हा आंध्र व तामिळनाडूतील तेलगु भाषिक लोकांमध्ये एकवाक्यता दिसून येत होती. परंतु जेव्हा मराठी भाषिकांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी केली तेव्हा त्यांच्यात एकतेचा अभाव जाणवत होता.

विदर्भातील नेत्यांना स्वतंत्र नागविदर्भ नावाचे वेगळे राज्य हवे होते. तसेच बी.पी.सीसीला बॉम्बे संयुक्त महाराष्ट्र स्थापन होणे मंजूर नव्हते. याचा फायदा केंद्रातील काँग्रेसश्रेष्ठींनी उचलला. फझल अली आयोगावरही काँग्रेसश्रेष्ठींचा प्रभाव होता.

**२) काँग्रेस श्रेष्ठीः**

केंद्रातील काँग्रेस श्रेष्ठी आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीतील काँग्रेस नेते यांच्यात गांधीजी च्या काळापासून एक प्रकारचा मानसिक दुरावा निर्माण झाला होता. टिळकवादी नेत्यांना गांधींचे नेतृत्व मान्य नव्हते. काँग्रेसश्रेष्ठी आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीत शत्रूत्वाची भावना निर्माण झाली होती. जेव्हा महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर नेत्यांनीशेकापची स्थापना केली. तेव्हा काँग्रेसश्रेष्ठींना बाम्हणेत्तर नेत्याचे हे कृत्य काँग्रेसविरोधी वाटले.

काँग्रेस श्रेष्ठीनी जेव्हा द्वभाषिक मुंबई राज्याचा निर्णय घेतला तेव्हा त्यांनी अशी सोय केली होती की, द्विभाषिक मुंबई राज्यात मराठी भाषिक बहुसंख्यांक असले तरीदेखील त्यांना राज्यातील शासनात आणि राजकारणात दुय्यम स्थान असेल. मराठी भाषिक जनता काँग्रेसश्रेष्ठीची ही राजनैतीक कटुता ओळखून होते. म्हणूनच १९५७ च्या लोकसभा निव्रणुकीत काँग्रेसला महाराष्ट्रात विशेषत मुंबई व पश्चिम महाराष्ट प्रांतात हार पत्करावी लागली. त्यानंतर १९६० मध्ये काँग्रेसश्रेष्ठींना संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

**३) मुंबई शहराचे महत्त्व**

ब्रिटिश काळापासूनच मुंबई शहर हे आर्थिकदृष्टया महत्त्वाचे शहर होते. मुंबई शहरावर गुजराती भाषिकांचे वर्चस्व होते. मुंबईतील सर्व व्यापार व उद्योग जगत गुजराती भाषिकांच्या नियंत्रणाखाली होता. याउलट मराठी भाषिक महाराष्ट्रीयन लोक या

उद्योगजगतात कामगार म्हणू काम करीत असे. म्हणून जेव्हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे वारे वाहू लागले तेव्हा गुजराती भाषिकांनी या चळवळीला विरोध केला. त्यामुळे संयुक्त चळवळीला धोका निर्माण झाला.

**४) वेगळ्या स्वतंत्र नाग-विदर्भ राज्याची मागणीः**

ब्रिटिश काळातील भारताची सर्वात सुपीक प्रदेश म्हणजे केंद्रीय प्रांत (नाग विदर्भ) आणि बेरार नागपूर शहर केंद्रीय प्रांताची राजधानी होते. नागपूरचे नेते अणे- बियाणी शंका हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विरोधात होते. संविधान परिषदेकडे त्यांनी स्वतंत्र महाविदर्भ राज्याची मागणी केली. त्यात त्यांनी असे म्हटले होते की, मध्यप्रदेशातील जिल्हे हैदराबादमधील मराठी भाषिक प्रांत उत्तर महाराष्ट्रातील काही जिह्यांचा समावेश असेल. त्यानंतर फझल अली आयोगानेही महाविदर्भ राज्याची मागणी मंजूर केली. ही मागणी म्हणजे संयुक्त महाराष्ट्राला फार मोठा धोका होता.

**५) हैदराबादमधील दख्खनी संस्कृतीः**

हैदराबाद राज्यांची स्वत:ची विशिष्ट अशी दख्खनी संस्कृती होती. पंतप्रधान नेहरुंनी ती जोपासण्याची इच्छा होती. त्यासाठी हैदराबाद राज्य (एकसंघ) राहावे असे त्यांना वाटत होते. असे असले तरीही मराठवाडयातील मराठी भाषिकांना संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्याची इच्छा होती. हैदराबादी संस्कृतीचे वेगळेपण जोपासण्याची इच्छा संयुक्त महाराष्ट्र स्थापनेतील अडथळा बनली नाही.

**६) जात आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ**

सुरुवातीच्या काळात डॉ. आंबेडकरांना संयुक्त महाराष्ट्राची स्थापना होणे गैर वाटत होते. त्यांचा मते संयुक्त महाराष्ट्र स्थापन झाला तर अशा राज्यात मराठा जातीसमूह आपले प्रभूत्व गाजविल आणि इतर जातींना अशा राज्यात महत्त्व दिले जाणार नाही. त्यामुले संयुक्त महाराष्ट्रात दलित समाजाच्या हितसंबंधांना बाधा निर्माण होईल. तसेच संयुक्त महाराष्ट्र दलित समाजाच्या हितसंबंधांना बाधा निर्माण होईल. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे सर्व वरिष्ठ नेते मराठा जातीचे होते. त्यामुळे साहाजिकच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत जातिभेद झाले.

**७) मोरारजी देसाई आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ**

जेव्हा बॉम्बे प्रांतात संयुक्त महाराष्ट्र चळवळ सुरु होती तेव्हा बॉम्बे प्रांताचे मुख्यमंत्री गुजराती भाषिक मोरारजी देसाई हे होते. त्यांनी द्विभाषिक मुंबई राज्याची मागणी मंजूर केली. नेहरुंनी मुंबईला केंद्रशासित प्रदेश म्हणून घोषित करण्याचे जाहिर केले तेव्हा ठिकठिकाणी दंगे उसळले. तेव्हा देसाई यांनी पोलिसाना आंदोलनकर्त्यांना लाठीमार करण्याचे आदेश दिले. या लाठीमार गोळीबारात १०५ कार्यकर्ते शहीद झाले. याचा प्रक्षोभ म्हणून लोकांनी देसाईना विरोध केला. त्यानंतर कॉंग्रेस पार्टी हायकमांडने यशवंतराव चव्हाण यांची नियुक्ती मुख्यमंत्री पदावर केली.

**८) चळवळीतील अकार्यक्षम नेतृत्व**

संयुक्त महाराष्ट्र परिषदेचे अध्यक्ष शंकरराव देव हे अत्यंत अकार्यक्षम नेते होते. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्राऐवजी द्विभाषिक मुंबई राज्य स्थापन झाले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबा दिला असला तरी त्यांच्यावर काँग्रेसश्रेष्ठीचा प्रभाव होता. तसेच संयुक्त महाराष्ट्र समितीला प्रमुख घटक असलेल्या प्रजासमाजवादी पक्ष व भारतीय मार्क्सवादी पक्षात अनेक मतमतांतरे होती. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र चळवळीला कोणाचेही खंबीर नेतृत्व लाभले नाही. अकार्यक्षम नेतृत्वामुळे संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यासाठी मराठी भाषिकांना बराच काळ प्रतीक्षा करावी लागली. प्रदीर्घ अशा लढ्या नंतर त्यांनी संयुक्त महाराष्ट्र नावाचे राज्य अस्तित्वात झाले.

अशा रीतीने संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा आढावा वरील विवेचनावरुन घेता येईल.

**आपली प्रगती तपासा**

१) संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या उदयाचे टप्प स्पष्ट करा.

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

२) संयुक्त महाराष्ट्र चळवळीत कोणते अडथळे होते ?

________________________________________

________________________________________

________________________________________

________________________________________

## १.६ सारांश

महाराष्ट्र या संकल्पनेला वेगळा इतिहास असून महाराष्ट्र या संकल्पनेचा विकास काळानुसार होत आलेला आहे. तसेच तिचा अर्थ देखील काळाच्या ओघात बदलत आला आहे.

भारताच्या स्वातंत्र्यचळवळीत महाराष्ट्रातील राष्ट्रवादी नेतृत्वाने फार अमूल्य असे योगदान दिले आहे. तसेच समाजसुधारकांच्या कार्यामुळे भारतात आधुनिकतेचा पाया रोवला गेला. समाजातील अनेक रुढी, परंपरा नष्ट होऊन सामाजिक सक्षमीकरण घडून आले. समाजातील विषमतेची दरी बऱ्याच अंशी कमी झाली.

त्याचप्रमाणे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र स्थापन व्हावा यासाठी अनेकांचे योगदान फलदायी ठरले. अनेकांच्या बलिदानातून व परिश्रमातून १ मे १९६० रोजी मराठी भाषिक राज्य महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. आणि मराठी भाषिकांची अनेक वर्षापासूनची इच्छा पूर्ण झाली.

## १.७ विद्यापीठीय प्रश्न

१. महाराष्ट्र या संकल्पनेचा उद्गम आणि विकासाचा आढावा घ्या.

२. राष्ट्रवादी चळवळीचे स्वरुप आणि भूमिका स्पष्ट करा.

३. महाराष्ट्रातील समाजसुधारणा चळवळीच्या विकासाचा आढावा घ्या.

४. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची थोडक्यात चर्चा करा.

## १.८ संदर्भग्रंथ

१. फडके य. दी २००७ विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड, सातवा, मुंबई मौज प्रकाशन.

२. राऊळ गणेश महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास पुणे डायमंड.

३. जैन अशोक (१९९८), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण मुंबई सेठ.

४. बंग, के. आर (२०१३) महाराष्ट्र शासन आणि राजकारण औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.

❄❄❄❄❄❄❄

# २

# उप प्रादेशिकवाद - प्रादेशिक असमतोल व विकास

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ महाराष्ट्राची विभागवार रचना: कोकण, मराठवाडा, विदर्भ

२.३ दांडेकर समिती अहवाल

२.४ वैधानिक विकास मंडळे

२.५ विद्यापीठीय प्रश्न

२.६ संदर्भग्रंथ

## २.० उद्दिष्टे

१. उप प्रादेशिकवाद म्हणजे काय? हे समजावून घेऊन महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचा अभ्यास करणे.

२. प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.

## २.१ प्रास्ताविक

भारताने संघराज्य शासनपद्धतीचा स्वीकार करुन राष्ट्रीय ऐक्य आणि प्रादेशिक अस्मिता यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे असे असले तरी भारतात आज प्रादेशिकवादाच्या समस्येने डोके वर काढले आहे. आपण ज्या प्रदेशात राहतो त्या प्रदेशाबद्दल प्रेम, अस्मिता असणे, जिव्हाळा वाटणे हा मानवी स्वभाव आहे. परंतु जेव्हा ही प्रादेशिक अस्मिता इतर प्रदेशांचा तिरस्कार करते आपल्या प्रदेशाचे हिता नंतर राष्ट्रीय हिताला प्राधान्य ही भावना निर्माण होते तेव्हा तिला प्रादेशिकवाद असे म्हणतात. राष्ट्रीय पातळी प्रमाणेच राज्यपातळीवरदेखील राज्यांतर्गत विभागीय संघर्ष निर्माण होत असतात. त्याला उप प्रादेशिक वाद असे म्हणतात. राज्यांतर्गत असंतुष्ट विभागातील लोक वेगळ्या राज्याची मागणी करतात उदा. महाराष्ट्रातील स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी.

महाराष्ट्र राज्यात पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, कोकण असे चार प्रमुख प्रांत आहेत. या प्रांतामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक विषमता आढळते. तसेच या प्रांताचा विकास सारखा झालेला नाही. पश्चिम महाराष्ट्र व मुंबई शहराच्या तुलनेत विदर्भ आणि मराठवाडा हे प्रांत मागासलेले आहेत. आर्थिक दृष्टया मागासलेले जिल्हे आजही विदर्भ मराठवाड्यात पाहावयास मिळतात. यामुळे या प्रांतामध्ये विकासाचा प्रादेशिक असमतोल

पहावयास मिळतो. यामुळे महाराष्ट्रात उप प्रादेशिकवादाची निर्मिती झाली आहे. विदर्भाला महाराष्ट्रातून वेगळे निघून स्वत:चे नवे राज्य स्थापन करावयाचे आहे.

या प्रकरणात आपण खालील मुद्यांचा अभ्यास करणार आहोत.

१) महाराष्ट्राची विभागवार रचना : कोकण, मराठवाडा, विदर्भ

२) दांडेकर समिती अहवाल

३) वैधानिक विकास मंडळ

## २.२ महाराष्ट्राची विभागवार रचना: कोकण, मराठवाडा, विदर्भ

१९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना होण्यापूर्वी मराठी भाषिक प्रांत मुंबई राज्य, मध्यप्रदेश आणि निझामाच्या हैद्राबाद राज्यात विभागलेला होता. मुंबई राज्यात मुंबई शहर, पश्चिम महाराष्ट्र, कोकण या प्रांताचा समावेश होता. मध्यप्रदेशात वऱ्हाड व नागपूर तर मराठवाडा विभागाचा समावेस हैद्राबाद राज्यात करण्यात आला होता. परंतु या प्रांतातील काही मराठी भाषिक लोकांना स्वत:चे संयुक्त महाराष्ट्र नावाचे वेगळे राज्य हवे होते. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनानंतर १ मे १९६० रोजी मराठी भाषिकांचे महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

वास्तविक पाहता महाराष्ट्राचे चार विभाग पडतात.

१) कोकण

२) पश्चिम महाराष्ट्र

३) मराठवाडा

४) विदर्भ

परंतु प्रशासनाच्या सोयीकरता राज्याची प्रादेशिक प्रशासकीय विभागात विभागणी करण्यात आली आहे. सुरुवातीला मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद असे चार प्रशासकीय विभाग होते. त्यानंतर पुणे व नागपूर विभागांची विभागणी करून अनुक्रमे नाशिक व अमरावती या प्रशासकीय विभागांची स्थापना करण्यात आली.

महाराष्ट्र राज्याचे प्रशासकीय विभाग व त्यातील जिह्याची माहिती खालील प्रमाणे -

१) मुंबई विभाग - मुंबई शहर ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, पालघर (ठाणे जिल्यातून विभाजित)

२) पुणे विभाग - पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापुर

३) नाशिक विभाग - नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार.

४) औरंगाबाद - औरंगाबाद, जालना, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातुर, परभणी, हिंगोली.

५) नागपूर विभाग - नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, वर्धा, गडचिरोली.

६) अमरावती विभाग - अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ

या पैकी मुंबई विभागाचा समावेश कोकणात केला जातो. पुणे विभाग पश्चिम महाराष्ट्रात येतो. मराठवाडा प्रांतात औरंगाबाद तर नागपूर, अमरावती विभागाचा समावेश विदर्भ प्रांतात येतो.

या ठिकाणी आपण कोकण, मराठवाडा आणि विदर्भ या प्रांतांची वैशिष्टये आणि समस्या अभ्यासणार आहोत.

### २.२.१ कोकण विभाग

ठाणे, रायगड (पूर्वीचा कुलाबा) रत्नागिरी, पालघर या पाच जिह्यांचा समावेश कोकण विभागात होतो. वास्तविक पाहता मुंबई शहर देखील कोकणातच येते. परंतु महानगराचे असाधारण वैशिष्टये लक्षात घेऊन त्याविषयी स्वतंत्र विचार करावा लागतो. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे कोकण प्रांत महाराष्ट्रातील प्रमुख घटक मानला जातो. या विभागाचा समावेश मुंबई प्रशासकीय विभागात केला जातो. याचे कारण म्हणजे कोकण मुंबईच्या जवळ आहे. कोकण विभाग मुंबई व पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत अत्यंत अविकसित आहे. कोकणातील अर्थव्यवस्था उदरनिर्वाही स्वरुपाची आहे. कारण कोकणातून अनेक व्यक्ती उदरनिर्वाहासाठी इतरत्र स्थलांतर करतात.

कोकण विभागाची वैशिष्टये खालील प्रमाणे.

**१) भौगोलिक वैशिष्टये :**

सह्याद्री पर्वतरांगा ते दक्षिणेला गोवा राज्य अशी ७२० कि.मी. लांबीच्या चिंचोळ्या किनारपट्टीला कोकण म्हणतात. कोकण प्रांताचे तीन भाग पडतात ते म्हणजेच उत्तर कोकण ठाणे जिल्हा व मुंबई मध्य कोकण – रायगड दक्षिण कोकण - रत्नागिरी, सिंधुदुर्ग कोकणातील जमिन डोंगराळ व खडकाळ स्वरुपाची आहे. पर्जन्यमानाचे प्रमाण कोकणात सर्वाधिक असले तरी उतार असलेल्या भूपृष्ठ रचनेमुळे पाणी अरबी समुहात पाहून जाते. या विभागातील प्रमुख नद्या म्हणजे सूर्या, वैतरणा, दमणगंगा, उल्हास, कुर्ली, कुडलिका, काळ, सावित्री, वसिष्ठि, शारण, तेरेखोल इ. होय. या नद्यांच्या मुखाशी समुहाचे पाणी आत आल्यामुळे खाडयांची निर्मिती झाली आहे. वसई, धरमतर, महाड, चिपळूण, जयगड, राजापूर, विजयदुर्ग या महत्त्वाच्या खाडयां आहे. नद्यांची लांबी कमी, पावसाळ्यात पाणी भरपूर परंतु उन्हाळ्यात त्या कोरडयां असल्यामुळे जमिनीची धूप वाढते. आक्रमण आणि त्यातून जमिनीचे सारीकरण, जमिनीचे खचणे ही नैसर्गिक संकटे कौकणात नेहमीच ओढावतात. जांभ्या मुद्रेचे प्रमाण सर्वाधिक आहे.

**२) आर्थिक विकास**

प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे कोकणचा आर्थिक विकास अत्यंत कमीप्रमाणात झाला आहे. जमिनी रेताड व हलक्या प्रतीची असल्यामुळे कृषी विकासास वाव मिळत नाही. उपलब्ध भौगोलिक परिस्थितीमुळे भातशेती केली जाते. डोंगराळ क्षेत्रात फळ बागायती शेती केली जाते. परंतु वाहतूक दळणवळाच्या साधनांची करमतरता असल्याने फळ शेती किफायतशीर ठरत नाही. फळबागायतीशेतीत प्रामुख्याने आंबा, काजू, कोकम हे फळे निघतात. स्थानिकांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन विक्री

व्यवहारात बाहेरचे आडत व्यापारी स्वत:चा स्वार्थ साधून घेतात. त्यामुळे आंबा, काजू, विक्रीतून लोकांच्या हातात फारसे उत्पादन पडत नाही.

कोकणातील शेती ही पावसावर अवलंबून असल्याने कृषी उत्पादनास विक्री योग्य वाढावा अत्यल्प आहे. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने विचार करता ठाणे व रायगड जिल्ह्याचा औद्योगिक विकास इतर जिह्यांच्या मानाने चांगला झालेला आहे. शासनाने कोकण विकास निगम स्थापन केले आहे. पाताळगंगा, पनवेल, चिपळूण, महाड येथे मोठया प्रमाणात औद्योगिक कारखाने निर्माण करण्यात आलेले आहेत. मागोठणे येथे भारत सरकारने पेट्रोकेमिकल्स आणि रसापती येथे रासायनिक खतांचा प्रकल्प उभारले आहेत.

किनारपट्टीस लगत असलेल्या कोकण भागात मत्स्यव्यवसाय आणि मत्स्योद्योगाला भरपूर वाव आहे. अनेक मच्छीमार पारंपारीक पद्धतीने मासेमारी करतात. महाराष्ट्र सरकारने देखील या व्यवसायाला उत्तेजन देण्यासाठी काही योजना सुरु केल्या आहे. कोकणच्या आर्थिक विकासास या व्यवसायाने चांगलाच हातभार लावला आहे.

### ३. वाहतूक व दळणवळणाची साधनेः

कोकण विभाग वाहतुकीच्या व दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत मागासलेला आहे. वाहतुकीच्या विश्वासार्ह साधनांच्या अभावी औद्योगिक विकास खुंटतो. पावसाळ्यात तर किनाऱ्यावर असलेल्या वस्त्या व खेडयांचा संपर्क जगापासून तुटतो. कोकण रेल्वे मार्ग पूर्ण झाल्यामुळे वरील परिस्थितीत बदल घडून आला आहे. महाराष्ट्र शासनाने कोकण रेल्वेमार्गासाठी काही प्रमाणात अर्थसहाय्य केले आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने बसवाहतुकीची सोय उपलब्ध करुन दिली आहे. जलवाहतूक हे कोकणाचे पारंपारिक वाहतूक माध्यम होय. कोकण किनारपट्टी वरील ४९ बंदरापैकी एकाही बंदरात बारमाही वाहतुक उपलब्ध नसते. त्यामुळे ६ ते ८ महिने जलवाहतूक उपलब्ध नसते.

### ४. परावलंबी अर्थव्यवस्थाः

कोकणच्या अर्थव्यवस्थेचे वर्णन 'मनिऑर्ड अर्थव्यवस्था' असे केले जाते. मुंबई शहरात कोकणातील लोक अत्यंत मोठया संख्येने उदरनिर्वाहसाठी स्थलांतर करतात. रत्नागिरी जिल्हयातून सर्वाधिक कोकण वासी रोजीरोटीसाठी मुंबईत स्थलांतर करतात. मुंबईतील कामगार वर्ग माहिनाकाठी आपल्या कोकमातील गावी मनिऑर्डर पाठवत असतो. त्यावरच तेथील कुटुंब जगत असते. यालाच मनिऑर्डर अर्थव्यवस्था म्हटले जाते. घरचे लोक या मनिऑर्डरची चातकाप्रमाणे वाट पाहत असतात.

### ५. शिक्षण

ब्रिटिशांचा काळात कोकण विभाग मुंबईचा एक भाग असल्याने मुंबईप्रमाणेच कोकणात शिक्षणाची सुरुवात १९व्या शतकापासूनच झाली. पूर्वी उच्चशिक्षणाची सोय कोकणात उपलब्ध नसल्याने तेथील युवावर्ग शिक्षणासाठी स्थलांतर करती असे. १९७१ साली दापोली येथे बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली

तसेच रायगड जिह्यातील लोणेरे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ सुरू करण्यात आले आहे. कोकणातील सर्व महाविद्यालये मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहे. साक्षरतेच्या दृष्टीने कोकण विभाग सद्या प्रगतिपथावर आहे. सिंधुदुर्ग हा महाराष्ट्रातील सर्वात साक्षर जिल्हा समजला जातो. साक्षरतेचा परिणाम म्हणजे सर्वसामान्य जनतेतील राजकीय जनजागृतीत वाढ झाली आहे.

**६) सामाजिक रचनाः**

कोकणची सामाजिक रचना पश्चिम महाराष्ट्राप्रमाणेच आहे. मराठा कुणबी जातिसमुहाची संख्या ३८ -३९टक्के आहे. त्याचप्रमाणे आगरी कोळी, भंडारी जातींच्या लोकांची संख्या जास्त आहे. ठाणे जिह्यात आदिवासी जमातींची संख्या सर्वाधिक आहे. त्यातही वारली, ठाकूर या आदिवासी जमातीचा भरणा अधिक आहे.

**७) पर्यटन**

पर्यटन क्षेत्राचा विचार करता कोकणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. अथांग समुद्रकिनारा, सुंदर निसर्ग सौदर्यामुळे कोकणाला पर्यटनाचा समृद्ध वारसा लाभला आहे. रायगड जिह्यातील रेवदंडा, चौल, मुरुड-जंजिरा अलिबाग या ठिकाणी महत्त्वाचे किल्ले आहे. तसेच रत्नागिरी, सिंधुदुर्गाचाही पर्यटनामुळे विकास झाला आहे. महाराष्ट्र शासनाने पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी विविध उपाययोजना राबविल्या आहेत.

**८) सांस्कृतिक रचनाः**

मुंबईतील नवे विचार प्रवाहाचे वारे कोकणात लगेच वाहतात. याचे कारण म्हणजे मुंबईतील कामगार वर्ग दरवर्षी गौरी-गणपती, दिवाळीच्या सणाला आपापल्या खेडयांत जातात. खेडयांशी असलेला सांस्कृतिक संबंध जपण्याचा ते प्रयत्न करतात. मुंबईत आपली अस्मिता टिकविण्यासाठी भजनी मंडळाद्वारे सतत धडपड सुरु असते. ही भजनी मंडळे म्हणजे त्या त्या खेडयांची आठवण जपणारी व सांस्कृतिक बंध दृढ करणारी साधने आहेत.

मराठवाडा आणि कोकण विभाग यांच्यात मागासलेपणाबाबत स्पर्धा असली तरी या दोन विभागात कोकण वरचढ आहे. याचे कारण म्हणजे साक्षरतेचे प्रमाण कोकणात सर्वाधिक आहे. तसेच कोकण मुंबई शहराजवळ असल्याने आधुनिकतेचा पाया कोकणात बऱ्याच अंशी घातला गेला आहे. उपजीविकेचे माहेरघर म्हणून कोकण मुंबईकडे पाहते.

असे असले तरी प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती वाहतूक आणि दळणवळणाच्या साधनांची कमतरता लोकसंख्येचे स्थलांतर आणि कार्यक्षम नेतृत्वाचा अभाव यामुळे राज्याचा राजकीय प्रक्रियेत या विभागचे स्थान दुय्यम आहे.

## २.२.२ मराठवाडा विभाग

मराठवाडा हा राज्यातील सर्वाधिक अप्रगत विभाग आहे. या भागाच्या मागासलेपणाची प्रमुख कारणे म्हणजे प्रतिकूल भौगोलिक परिस्थिती आणि निझामी राजवटीची परंपरा होय. वास्तविक पाहता मराठवाडा हा महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी आहे. पण अन्य भागांच्या तुलनेत तो अविकसित आहे. भौगोलिकदृष्टया केंद्रस्थानीय विपुल जलसंपत्ती प्राचीन इतिहास या बाबींचा विकासाला उपयोग झालेला नाही. निजामी राजवटीत मराठवाडयाकडे दुर्लक्ष करण्यात आले. परंतु सद्य परिस्थितीत या विभागाच्या विकासाकडे लक्ष देण्यात येत आहे. नीझामी राजवटीपेक्षा मराठी राजवट बरी. अशी येथील जनतेची धारणा आहे.

मराठवाडा विभागात औरंगाबाद, उस्मानाबाद, बीड परभणी, नांदेड आणि नव्याने निर्माण केलेल्या जालना, लातुर आणि हिंगोली अशा आठ जिह्यांचा समावेश होतो. १९४८ पर्यंत मराठवाडा निझामाच्या राजवटीखाली होता. त्यानंतर हा प्रांत संयुक्त महाष्ट्राच्या स्थापनेनंतर महाराष्ट्रात सामील झाला.

महाराष्ट्राच्या एकूण भूप्रदेशापैकी २० टक्के भूभाग आणि १८ टक्के लोकसंख्या मराठवाडा विभागात येते. औरंगाबाद हे मराठवाडा विभागाचे मुख्यालय आहे. मराठवाडयाची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेती प्रधान असून लागवडीखालील क्षेत्र बऱ्याचअंशी कोरडवाहू आहे. पावसाच्या पाण्यावर शेती अवलंबून असल्याने मराठवाडयांतील काही प्रदेश कायम दुष्काळाच्या छायेखाली असतो. औद्योगिकरणाचे प्रमाणदेखील कमी आहे.

मराठवाडा विभागाची वैशिष्टये खालीलप्रमाणे -

**१) भौगोलिक वैशिष्टये :**

मराठवाडयातील जमिन अत्यंत सुपीक आणि काळीभोर आहे. तसेच विपुल जलसंपत्तीची देणगी मराठवाडयांस लाभली आहे. परंतु शासनाद्वारे जलसिंचन प्रकल्प या भागात उभारले गेले नाही. त्यामुळे कृषी व्यवसाय पूर्णत पावसाच्या पाण्यावर अवलंबून असतो. पर्जन्यमानाची अस्थिरता आणि अनिश्चितता असल्याने बराचसा भाग अवर्षणग्रस्त असतो.

नाशिक जिह्यात उगम पावणारी गोदावरी नदी औरंगाबाद, जालना, नांदेड या जिल्हयातून वाहते मांजरा ही गोदावरीची उपनदी बीड जिह्यात तर पूर्णा नदी परभणी जिह्यात उगम पावते. लातूर उस्मानाबाद जिह्यात कोणत्याही प्रकारचे जलस्त्रोत उपलब्ध नाही. यामुळे या भागातील शेती कोरडवाहू प्रकारची आहे. या भागावर कायम दुष्काळाची छाया पसरलेली असते. परिणामी लोकसंख्येचे स्थलांतर राज्याच्या इतर भागात होत असते.

१९५६ नंतर गोदावरी, पूर्णा नद्यांवर अनुक्रमे जायकवाडी आणि एलदरी धंरणे बांधण्यात आल्यामुळे औरंगाबाद, जालना, परभणी आणि नांदेड जिह्यातील काही भाग जलसिंचनाखाली आला आहे. उपलब्ध जलसंपत्तीचा योग्य वापर केल्यास या भागात शेतीविकासाला प्रचंड वाव मिळू शकले. महाराष्ट्र शासनाचा जलसंवर्धन कार्यक्रम मराठवाडयाचा कायापालट ठरू शकेल.

### २) आर्थिक विकास

निझामी राजवटीत या भागाच्या आर्थिक विकासाकडे पूर्णत दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे मराठवाडा प्रांताचा विकास होऊ शकलेला नाही. त्याचप्रमाणे मराठवाडयांतील बरीच गावे असल्याने सर्वसाधारणपणे मराठवाडयांचा कृषीविकास होऊ शकलेला नाही. परंतु मराठवाडयांला महाराष्ट्राचे धान्याचे कोठार असे म्हटले जाते. या भागात ज्वारी, कापूस, कडधान्यांची मोठया प्रमाणात लागवड केली जाते. तसेच तेलबिया आणि ऊसाची लागवडही मोठया प्रमाणात केली जाते. जायकवाडी आणि एलदरी प्रकल्पाव्यतिरिक्त मराठवाडयांत ३० मध्यम आणि ११५ लघुपाटबंधारे प्रकल्प उभारण्यात आले आहे. १९६३ च्या बर्वे आयोगाने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की, मरठावाडयात ७० मध्यम आणि ७०० लघुपाटबंधारे प्रकल्पांची क्षमता आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील पाटबंधारे खाते मराठवाडयांच्या नेत्यांकडे बराच काळ होते. परंतु प्रादेशिक नेतृत्वाच्या अंतर्गत भांडणांमुळे त्या भागाचा जलसिंचन क्षेत्रात विकास झाला नाही.

### ३) औद्योगिक विकास

मराठवाडयांची अर्थव्यवस्था कृषीप्रधान असल्याने या भागात औद्योगिकरणाचे प्रमाण अत्यल्प आहे. औरंगाबाद, लातूर, नांदेड, या शहरातच औद्योगीकरण घडत आले आहे. इतर जिल्हे मात्र औद्योगिक दृष्टया मागास आहे. नवनवीन कारखाने आज या भागात सुरू होत आहे.

पर्यटनाच्या दृष्टीने विचार करता औरंगाबाद शहराला महत्त्व प्राप्त झाले आहे. पैठण येथे जायकवाडी धरण नाथसागर प्रकल्प उभारण्यात आला आहे. तसेच वेरुळ अजिंठा येथे प्राचीन बुद्धकालीन लेण्या आहेत. त्यामुळे जगभरातील पर्यटक औरंगाबाद शहराला भेट देतात. परिणामी येथे हॉटेल व्यवसायाचा विकास घडून आला आहे.

### ४) वाहतूक आणि दळणवळण

कोकण, प्रांताप्रमाणेच मराठवाडाही वाहतुक दळणवळणाच्या दृष्टीने मागासलेला आहे. रेल्वेमार्ग कमी असले तरी रस्त्यांचे जाळे या भागात मोठया प्रमाणात पसरलेले आहे. मराठवाडयात आज घडीला ४१९२ कि.मी. लांबीचे पक्के डांबरी रस्ते असून महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या आणि खासगी बससेवा उपलब्ध आहे. नांदेड व औरंगाबाद येथे वायू वाहतूक सेवा उपलब्ध आहे.

### ५) शिक्षण

स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाडा शैक्षणिकदृष्टया मागासलेला होता. मराठवाडा विभागात औरंगाबाद येथे फक्त एकच इंडरमीजियट विद्यालय होते. आजघडीला मराठवाडयात एक विद्यापीठ आणि १५० च्या वर विद्यालये आहे. तसेच तंत्रशिक्षणाची सोयदेखील उपलब्ध आहे. १९७३ मध्ये परभणी येथे कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. १९६० मध्ये मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.

त्याचेच नामांतर नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे करण्यात आले. याशिवाय नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आंबेडकरांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापना करून मिलिंद महाविद्यालय सुरु केले असे असले तरीही साक्षरतेच्या दृष्टीने मराठवाडा अविकसित आहे. आजही मराठवाडयात शैक्षणिक मागासलेपण बघण्यास मिळते.

**६) सामाजिक रचनाः**

पश्चिम महाराष्ट्र व कोकण प्रांताप्रमाणेच मराठवाडयात मराठा कुणबी जातिसमूहाचे संख्याबळ जास्त आहे. त्यांची लोकसंख्या ३७टक्के आहे. इतर मागासवर्गीयांचे प्रमाण ३२टक्के आहे. अनुसूचीत जातींचे प्रमाणे लक्षणीय असून अनुसूचित जातींपैकी अनेक जणांनी बौद्ध धर्माचा स्विकार केला आहे. तसेच नवबौद्ध गट समाजातील महत्वाचा घटक ठरला आहे. त्याचप्रमाणे मुस्लिम धर्मियांचे प्रमाण ११टक्के आहे.

**७) राजकीय सहभाग**

महाराष्ट्राच्या राजकारणात मराठवाडयाला नगण्य स्थान आहे. राजकीयदृष्टया मराठवाडा काँग्रेसशी निष्ठावंत आहे. असे सर्वसाधारण म्हणता येईल. सेना-भाजप युतीनेही अनेक ठिकाणी कॉग्रेसच्या विधानसभेतील जागा जिंकल्या आहेत. मराठवाडयातील अग्रगण्य नेते म्हणुन शंकरराव चव्हाण यांचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद त्यांनी दोनदा भूषवले. केद्रात ही त्यांनी महत्त्वपूर्ण पदे भूषवले आहेत. चव्हाणांनी १९८५ मध्ये राजीनामा दिल्यानंतर शिवाजीराव निलंगेकर हे मराठवाडयातील नेते मुख्यमंत्री झाले. परंतु पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांच्या तोडीस तोड असा नेता मराठवाडयात निर्माण झालेला नाही. राजकीय आकांक्षांच्या बाबतीत मराठवाडा पूर्णत वेगळा आहे. मराठवाडयाला स्वतंत्र राज्याची अभिलाषा नाही.

१९९५ मध्ये मराठवाडा वैधानिक विकास मंडळाची स्थापना झाल्याने मराठवाडयाच्या विकासाला चालना मिळेल. अशी आशा आहे. मागास प्रदेशांचा मुख्य आक्षेप त्या प्रदेशाच्या विकासाकडे सरकारचे झालेले दुर्लक्ष असा असतो. असा दावा विरोधक करतात तर सत्ताधारी पक्ष आपल्या धोरणाची समर्थन करतात.

### २.२.३ विदर्भ प्रांत

१९५६ पूर्वी विदर्भ प्रांत हा मध्यप्रदेश सेंट्रल प्रॉव्हित्सेन ऍन्ड बेरार - सी.पी. बेरार) आणि विदर्भ प्रांताचा भाग होता. या प्रांताची राजधानी नागपूर शहर होती. ज्या मराठी भाषिक विभागाला आपण विदर्भ म्हणतो. तो विभाग ऐतिहासिकदृष्टया वऱ्हाड आणी नागपूर या दोन क्षेत्रात विभागलेला होता. १८६० पर्यंत वऱ्हाडचे अमरावती अकोला, यवतमाळ, बुलढाणा हे चार जिल्हे निझामाच्या राजवटीखाली होते. १८६० मध्ये इंग्रजांनी ते भाडे तत्त्वावर घेतले. १९०३ मध्ये सी.पी.ऍन्ड बेसरमध्ये त्यांचा समावेश केला. तर १८४८ पर्यंत नागपूर क्षेत्र पेशव्याचे सुभेदार भोसल्यांकडच्या नियंत्रणाखाली होता. लॉर्ड डलहौसीने दत्तक विधिविधानाच्या नावाखाली १८४८ मध्ये हे संस्थान खालसा करून मध्यप्रांतात त्याचा समावेश केला. मध्य प्रांतातील बहुसंख्य भाग हिंदी भाषिक असल्याने, नागपूर क्षेत्राची इतर

मराठी भाषिक भागांहून वेगळी अस्मिता निर्माण झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपूर्वी विदर्भातील नेत्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणी केली. आजही कधीतरी वेगळ्या विदर्भ राज्याची मागणी केली जाते. परंतु विदर्भ प्रांत एकसंध नाही. वऱ्हाड आणि नागपूर क्षेत्राची अस्मिता वेगवेगळी आहे.

आज विदर्भात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली (चंद्रपूरमधून विभाजीत), भंडारा, गोंदिया, यवतमाळ, अकोला, वाशिम, अमरावती, बुलढाणा, या ११ जिह्यांचा समावेश होतो. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने शासनाने नागपूर व अमरावती अशा दोन प्रशासकीय विभागांची निर्मिती केली आहे.

महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी २८ टक्के लोकसंख्या विदर्भात आढळते. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळापैकी ३० टक्के क्षेत्र या विभागाने व्यापले आहे. नागपूर हे विदर्भातील महत्त्वाचे शहर आहे.

विदर्भ विभागाची वैशिष्टये व समस्या खालीलप्रमाणे

## १) भौगोलिक परिस्थितीः

महाराष्ट्राच्या उत्तर पूर्वेला सातपुडा पर्वतरांगेत विदर्भ प्रांत वसलेला आहे. विदर्भातील जमिन अत्यंत काळीभोर व सुपीक असून कापसाच्या लागवडीस उपयुक्त आहे. पूर्णा, वर्धा, प्राणहिता, वैनगंगा, पैनगंगा या महत्त्वाच्या नद्या विदर्भातून वाहतात. थोडक्यात, सुपीक जमिन नियमित पर्जन्यमाम आणि जलसंपत्तीची उपलब्धता असलेल्या विदर्भात भौगोलिक परिस्थिती अनुकुल आहे. या व्यतिरिक्त विदर्भात कोळसा, कच्चे लोखंड, मैंगनीज, बॉक्साईट, चुनखडी इ. खनिजे मोठया प्रमाणात आढळतात.

## २) वाहतूक व दळणवळणाची साधनेः

विदर्भातील वाहतूक व दळणवळणाच्या साधनांची उपलब्धता पश्चिम महाराष्ट्रांच्या तुलनेत खाली आहे. रेल्वे आणि बसद्वारे वाहतुक केली जाते. नागपूर शहरात हवाई वाहतुकीची सोय उपलब्ध असून याच शहरापासून दिल्ली, कोलकाता, चेन्नई, मुंबईला जाणाऱ्या राष्टीय महाराष्ट्रांची बांधणी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे अलिकडच्या काळात चंद्रपूर व गडचिरोली या आदिवासी क्षेत्रात रस्तेबांधणीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

## ३) कृषीव्यवस्थाः

विदर्भातील जमिन सुपीक असल्याने आणि पाण्याची सोय मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याने विदर्भातील काही भाग जलसिंचीत करण्यात आला आहे. विदर्भात प्रामुख्याने कापूस, ज्वारी, तुरडाळ इ. पिके घेतली जातात. नागपूर आणि वर्धा जिह्यात संत्री, केळी तर भंडार जिह्यात ऊस आणि कलिंगडाची लागवड केली जाते. भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली जिह्यात भाताचे पिक घेतले जाते.

कापूस व्यापाराच्या निमित्ताने मारवाडी, गुजराती, पारशी व्यापाऱयांनी आपले व्यवसाय स्थापन केले. त्यात प्रचंड पैसा कमावला. त्यांनी कापूस पिकवणाऱया

शेतकऱ्यांना कर्जाऊ पैसे देऊन कर्जबाजारी केले. त्यांच्या जमिनी हडप केल्या. कोणताच मार्ग उपलब्ध न राहिल्याने शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात आत्महत्या केल्या.

**४) औद्योगिकरण**

संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यापर्यंत विदर्भ औद्योगिकदृष्टया मागासलेला होता. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर विदर्भात औद्योगिक वसाहतींची निर्मिती करण्यात आली. बल्लारपूर येथे कागद कारखाना, भारत सरकारचा वेस्टर्न कोल फिल्डस लि. हा उपक्रम, तसेच भद्रावती येथेचिनिमातीच्या भांडयांचा कारखाना आहे. नागपूर हिंगणघाट, पुलगाव, यवतमाळ येथे कापसाचा व्यापार चालतो. तसेच येथे कापड कारखानेदीखील आहे. गडचिरोलीत सागवान लाकुड उच्च दर्जाचे आहे. भंडाऱ्यात पितळी भांडयांचे उत्पादन घेतले जाते. याशिवाय भंडारा आणि भांडक येथे दारुगोळ्याचे सरकारी कारखाने आहेत. बापरखंडा व नागपूर शहराजवळ कोराडी येथे विद्युत निर्मिती केंद्रे आहेत. चंद्रपूर व भंडाऱ्यात भात सडण्याच्या गिरण्या व विडी वळण्याचे छोटे उद्योग आहेत. गेल्या काही वर्षात विदर्भात औद्योगिकरण मोठया प्रमाणात घडून आले आहे.

**५) शिक्षणव्यवस्थाः**

स्वातंत्र्यपूर्व काळात विदर्भात शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराला सुरुवात झाली असली तरी, विदर्भ शिक्षणाच्या बाबतीत काहीशा प्रमाणात मागे आहे. विदर्भातील आदिवासी क्षेत्रात आजही साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. नागपूर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ तर अमरावती येथे संत गाडगेबाबा विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. याशिवाय डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे. त्याच प्रमाणे तांत्रीक शिक्षण अनेक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची स्थापना केली आहे.

**६) सामाजिक रचना**

पश्चिम महाराष्ट्रापेक्षा विदर्भाची सामाजिक रचना भिन्न आहे. तेली, कोष्टी, कौमटी या जातीची लोकसंख्या विदर्भात लक्षणीय आहे. विदर्भात दलित आणि आदिवासींची संख्या ३४ टक्के आहे.गडचिरोली - चंद्रपूर भागात माडिया, गोंड आदिवासी जमातीची वस्ती आहे. मराठा-कुणबी जातिसमुहाची संख्या कमी असून, विदर्भातील जमिनदार व श्रीमंत देशमुख वर्ग स्वतला उच्च वर्ग समजतो. गरीब शेतकरी कुणबी वर्गाशी सामाजिक संबंध ठेवण्यात देशमुख वर्गाला कमीपणा वाटतो. नागपूर विभागात अमराठी भाषिकांचे प्रमाण कमी आहे.

**७) राजकारण**

मराठेतर व अब्राम्हण अशा कोष्टी, तेली, कोमरी, कलार अशा जातीसमूहांचा प्रभाव विदर्भातील राजकारण समाजकारणावर जाणवतो. विदर्भाच्या राजकारणावर मराठेतर जातींचे वर्चस्व असलेले दिसून येते. पश्चिम महाराष्ट्रातील माळी, कुणबी, कुळवाडी इ.

जातीचे लोक स्वतला मराठा मानतात. या उलट विदर्भातील तेली. कोष्टी स्वतला कधीही मराठा म्हणवून घेत नाही.

मारोतराव कन्नमवार, वसंतराव नाईक, सुधाकरराव नाईक या नेत्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. बऱ्याचदा विदर्भातील नेत्यांना अधिक मंत्रिपदे मिळालेली आहेत. सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेदेखील नागपूर शहरातील आहे.

त्याच प्रमाणे नागपूर हे शहर महाराष्ट्राची उपराजधानी असून, महाराष्ट्र राज्यविधीमंडळाचे हिवाळी अधिवेश नागपूर शहरात भरते. तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (RSS) मुख्यालय नागपूर शहरात असल्याने तेथूनच हिदुत्ववादी राजकारणाची सूत्रे हालविली जातात.

८) **स्वतंत्र विदर्भ राज्याची मागणीः**

संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यापूर्वीपासूनच विदर्भातील काही नेत्यांची स्वतंत्र नागविदर्भ राज्य स्थापन करण्याची मनिषा आहे. राज्य पुर्नरचना आयोगानेही स्वतंत्र विदर्भ राज्य स्थापन करण्याची तयारी दर्शविली होती. परंतु स्वतंत्र विदर्भ अस्तित्वात आला नाही. पश्चिम महाराष्ट्राला अग्रमान देण्याची तयारी विदर्भाने कधीच दाखवली नाही. पश्चिम महाराष्ट्राच्या राजकारण्यांवर स्वतंत्र विदर्भाच्या मागणीची टांगती तलवार ठेवून वेळप्रसंगी दबावाचा वापर करून विदर्भातील नेत्यांनी सत्तेत भागीदारी मिळवली. या सर्वांचा परिणाम म्हणून कधी- कधी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली जाते.

पश्चिम महाराष्ट्र व मुंबई प्रांताच्या तुलनेत विदर्भ प्रांताचा विकास पाहिजे तितक्या प्रमाणात झालेला नाही. त्यामुळे विदर्भ मागास आहे. त्यामुळे विदर्भाच्या स्वतंत्र विकासासाठी काही नेते मंडळी स्वतंत्र विदर्भाची मागणी करतात. त्यासाठी नागविदर्भ समिती स्थापण्यात आली. बापूजी अणे, ब्रिजलाल बियाणी यांनी स्वतंत्र विदर्भाचा पुरस्कार केला. नाशिकराव तिरपुडे यांनीही मधून मधून स्वतंत्र विदर्भाची हाक दिली आहे. त्याचप्रमाणे काही नेत्यांनी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या मागणीला विरोध केला आहे. विदर्भाच्या मागासलेपणाचे आणखी एक कारण म्हणजे राजकीय उदासीनता. विदर्भातील नेत्यांकडे मुख्यमंत्री पदाशिवाय अनेक वर्षे इतरही अनेक महत्त्वाची खाती होती. सरकारी सत्ता विदर्भातील काही जणांच्या हातात असली तरी सामान्य जनता मात्र उपेक्षित राहीली. जनतेचा विकास झाला नाही. तेव्हा स्वतंत्र विदर्भाच्या मागणीचा साक्षेपाने विचारविनिमय व्हायला पाहिजे.

**आपली प्रगती तपासा**

१) कोकण विभागाची वैशिष्टये व समस्या सांगा.

२) मराठवाडा व विदर्भ प्रांताची वैशिष्टये व समस्या कोणती ?

## २.३ दांडेकर समिती अहवाल

भारतीय संघराज्यात सध्या २८ राज्यांचा समावेश आहे. प्रत्येक राज्याचा विकास वेगवेगळ्या स्तरावर झालेला दिसून येतो. या विकासात्मक असमतोलातून प्रातीयवादाच्या समस्येने डोके वर काढले आहे. प्रत्येक राज्याचे विविध विभाग पाडले आहे. या प्रत्येक विभागाचा विकासदेखील कमी अधिक प्रमाणात घडून आला आहे.

महाराष्ट्र राज्याचे प्रमुख चार विभाग पडतात. ते म्हणजेच कोकण, मराठवाडा, विदर्भ व पश्चिम महाराष्ट्र यातील पश्चिम महाराष्ट्राचा अपवाद वगळता इतर विभाग आजही मागासलेले आहे. त्यांचा सर्वांगीण विकास आजही झालेला नाही.

राज्यातील विकासात प्रादेशिक असमतोल किती आहे. त्याचे नेमके मोजमाप कसे करावे ? व तो दूर करण्याचे उपाय कोणते हे जाणून घेण्यासाठी शासनाने १९८३ मध्ये काही निवडक अर्थतज्ञांची एक समिती नेमली या समितीचे अध्यक्ष सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. वि. म. दांडेकर हे होते. त्यांच्या नावावरुन या समितीला दांडेकर समिती असे म्हटले जाते. त्यानंतर शासनाने विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि इतर प्रांतांमध्ये विकासात्मक समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी चार उपसमिता नेमल्या. या समित्यांचे प्रमुख कार्य म्हणजे आपापल्या प्रांतातील विकासाचा अभ्यास करुन त्यासंबंधीचा अहवाल दांडेकर समितीला सादर करणे. या अहवालांमध्ये आधारित दांडेकर समितीने प्रादेशिक असमतोल संबंधी उपाययोजना शासनाला सुचवल्या.

दांडेकर समितीने खालील बाबी गृहीत धरुन त्या आधारे आपले कार्य सुरू केले.

१) विकासाच्या असमतोलाचे घटक निश्चित करणे.

२) त्या घटकांच्या आधारे १९६० ते १९८२-८३ मध्ये जिल्हयांचा विकासाचा क्रम लावणे.

३) १९६० पासून शासनाने जिल्हा विकासासाठी किती खर्च केला आहे हे तपासून त्यानुसार जिल्ह्याच्या विकासात्मक खर्चाचा क्रम लावणे.

४) शासनाची विकाससंबंधीची ध्येयधोरणे ठरवून त्यांच्या मर्यादा स्पष्ट करणे.

५) प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

वरील बाबींचा अभ्यास केल्यानंतर समितीने एकूण २८ विकासात्मक घटकांची निश्चिती केली. त्यात रस्ते, जलसिंचन ग्रामीण विद्युतीकरण, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, आरोग्याच्या सोयी, पाणीपुरवठा, पशुसंवर्धन अशा घटकांचा समावेश होतो. या समितीने केवळ सांख्यकीत्मक

माहिती गोळा केली नाही तर प्रत्ये जिल्ह्याला भेट देऊन जिल्ह्याच्या विकासाची पाहणी केली. एका वर्षाच्या काळात सभा घेतल्या. एप्रिल १९८४ मध्ये समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला.

दांडेकर समितीच्या अहवालाची मुख्य वैशिष्टये खालीलप्रमाणे

**१) नागपूर करार**

१९५३ च्या नागपूर करारात प्रादेशिक असमतोला संबंधी विचारविनिमय करण्यात आला होता. त्यामध्ये विदर्भ व मराठवाडा या प्रांताच्या विकासासाठी उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या. परंतु याबाबत कोणत्याही प्रकारचे पाऊल उचलले गेले नाही. समितीच्या मतानुसार, विदर्भ, मराठवाडा हे प्रांत अविकसित राहिले.

**२) जिल्हा विकासाचा घटक**

नागपूर करारात असे म्हटले होते की, दरवर्षी मागासलेल्या प्रांताचा अहवाल राज्यविधिमंडळापुढे सादर केला जाईल. परंतु या विकासाचा वार्षिक अहवाल विधानसभेत सादर केला गेला नाही. नागपूर करारानुसार प्रदेश हा विकासाच्या मुख्य घटक मानला गेला तर तत्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी विदर्भ किंवा मराठवाडा या प्रदेशांच्या विकासाचा आग्रह न धरता जिल्हा हा घटक मानावा, असे म्हणून नाईक यांनी १९६९ मध्ये नागपूर करार गुंडाळून ठेवला. या घटनेवर कोणत्याही नेत्याने आवाज उठवला नाही.

**३) विकसित आणि अवकसित जिल्हेः**

राज्यातील एखाद्या जिह्याचा विकास कितपत झाला आहे? हे कोणत्या आधारावर ठरवावे? हा मोठा प्रश्न समितीसमोर होता. म्हणून जिल्ह्याच्या विकासासाठी समितीने २८ घटक निर्माण केले. उदा. रस्ते, वाहतूक व दळणवळणाची साधने, शिक्षणाची सुविधा इ. या घटकांच्या आधारावर समितीने असे मत व्यक्त केले की, मुंबई जिल्हा हा इतर जिह्यांपेक्षा विकसित जिल्हा आहे. विदर्भातील जिल्हे मराठवाडयांतील जिल्ह्यापेक्षा थोडेबहुत विकसित आहे.

**४) विकासात्मक खर्चः**

विकसनशील जिल्ह्यांचा अधिक विकास व्हावा आणि जे जिल्हे अविकसित आहेत त्यांच्यात किमान सुधारणा व्हावी. यासाठी दांडेकर समितीने शासनाच्या विकासात्मक खर्चाचा अहवाल विधिमंडळापुढे सादर केले. त्यानुसा १९८४ मध्ये ३,१८७ कोटी रुपये खर्च जिल्ह्याच्या विकासासाठी खर्च करण्याची गरज आहे असे नमूद केले होते.

### २.३.१ दांडेकर समितीच्या उपाययोजनाः

१. शासनातर्फे जो एकूण खर्च केला जातो, त्यापैकी किमान ४०टक्के खर्च जिल्ह्यांच्या विकासासाठी केला जावा.

२. शासनाने जिल्हा पातळीवर विविध विकासात्मक योजना राबवल्या पाहिजे. ज्यात प्रत्येक जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने खर्च द्यावा.

३. जिल्हयात विकासात्मक प्रकल्प राबविले जात असतील तर त्यातील १५ टक्के खर्च शासनाने उचलला पाहिजे.

४. दरवर्षी शासनातर्फे जे अंदाजपत्रक तयार केले जाते. त्यामध्ये प्रत्येक विभागासाठी लागणारा खर्च नमूद करावा.

५. शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा नियोजन आणि विकास समिती स्थापन करावी. या समितीचे मुख्य कार्य म्हणजे जिल्ह्याचा होणारा विकासात्मक खर्च ठरविणे व त्याबाबत सूचना शासनाला देणे.

६. जिल्हा नियोजन आणि विकास समितीद्वारे दरवर्षी एक कृती योजना (Action Plan) तयार केला जावा. त्यात जिल्ह्याच्या होणाऱ्या वार्षिक विकासाचा आढावा घेतला जावा.

७. जिल्हयाच्या विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी शासनाने प्रयत्न करावे त्यानंतर त्याची फेरतपासणी करावी.

८. थोडक्यात आर्थिक आवक कमी आणि अपेक्षा फार जास्त अशी परिस्थिती महाराष्ट्राची आहे. त्यामुळे सर्व विभागांचा विकास ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे होता तेवढा तो झाला नाही. प्रत्येक विभागाच्या विकासासाठी पैशाची आवश्यकता होती असे असले तरी पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कोकण, मराठवाडा, विदर्भ हे प्रांत मागासलेलेच होत राहिले. कोणत्या विभागाचा अनुशेष किती ? हे ठरविण्यासाठी दांडेकर समिती नेमली गेली. तिच्या शिफारशीप्रमाणे अनुशेष भरून काढण्याची तरतूद महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात होऊ लागली. असे असूनही विदर्भ, मराठवाडा आणि कोकण या विभागांचा विकासाचा अनुशेष तातडीने भरुन काढणे आणिअल्पविकसित विभागाच्या विकासाकरिता उदार दृष्टीकोन स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.

**आपली प्रगती तपासा**

1) प्रादेशिक असमतोल दूर करण्यासंदर्भात दांडेकर समितीने कोणत्या उपाययोजना सुचवल्या आहेत ?

______________________________

______________________________

______________________________

______________________________

## २.४ वैधानिक विकास मंडळे

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये नतर मराठवाडा आणि विदर्भ हे विभाग विलीन झाले. प्रामुख्याने महाराष्ट्राचे चार विभाग पडतात. जे म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, कोकण, विदर्भ, मराठवाडा, या चारही विभागांची ऐतिहासिक जडणघडण, साधनसामग्री, हवामान, आर्थिक विकासाचा स्तर, मूलभुत सुविधा आणि राजकीय सहभाग आदि सर्वच बाबतीत भिन्नता

आढळून येते. पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, जलसंपत्ती, विद्युतकरण, रेल्वेमार्गाचे जाळे इ. चा समावेश होतो. या विभिन्न पार्श्वभूमिमूळे निर्मिती पासूनच महाराष्ट्राला प्रादेशिक विषमतेची समस्या भेडसावत आहे. ही विषमता दूर व्हावी व आपला विकास व्हावा, अशी मागणी मागास विभागांकडून सतत होत होती. म्हणूनच त्यांचा आर्थिक औद्योगिक विकास व्हावा, यासाठी सरकारने विभागीय विकास मंडळांची स्थापना केली आहे.

### २.४.१ सांविधानिक तरतूद

भारतीय राज्यटनेच्या कलम ३७१ मध्ये असे स्पष्ट करण्यात आला आहे की, राज्याच्या विकासखर्चासाठी पैशाची योग्य वाटणी करणे आणि त्या क्षेत्राबाबत तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली सेवांमध्ये नोकरीची पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी अलग अलग विकास मंडळाची स्थापना राष्ट्रपती करून शकतात. अशा विकास मंडळाची विशेष जबाबदारी राज्यपालांवर सोपविली जाईल.

अशाप्रकारे कलम ३७१ मधील उपकलमानुसार भारतातील इतर काही राज्यासंबंधी विशेष तरतुदी केल्या आहेत. महाराष्ट्राला देखील हे कलम लागू आहे.

### २.४.२ वैधानिध विकास मंडळांची निर्मिती

दि. १५ ऑग्सट १९९० रोजी पंतप्रधान व्हि.पी.सिंग यांनी मराठवाडा आणि कोकण या मागास भागांसाठी वैधाविक विकास मंडळे स्थापण्यात येत असल्याचे स्वातंत्र्यदिनी जाहीर केले. पंतप्रधान म्हणाले की, आर्थिक विकासातील विषमता दूर करण्यासाठी केंद्रसरकार बांधील आहे.

दि. १७ फेब्रुवारी १९९४ रोजी मराठवाडा, विदर्भ आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला या निर्णयामुळे महाराष्ट्रात वैधानिक मंडळे स्थापण्याचा मार्ग मोकळा झाला.

दि. ९ मार्च १९९४ रोजी तीन वैधानिक विकास मंडळाची अधिसूचना राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा यांनी राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांना पाठविली. ही अधिसूचना १ मे १९९४ पासून अंमलात येणार असल्यचे सांगण्यात आले.

त्यानंतर राज्यपाल पी.सी. अलेक्झांडर यांनी विकास मंडळाच्या निर्मितीचे आदेश काढले. त्यानुसार विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रासाठी प्रत्येकी एका स्वतंत्र विकास मंडळाची स्थापना केली गेली.

विदर्भ विकास मंडळाच्या अधिकाराखाली नागपूर आणि अमरावती महसूल विभागाचे क्षेत्र येते तर उर्वरित महाराष्ट्राच्या विकास मंडळाच्या अधिकाराखाली कोकण, पुणे, नाशिक विभागाचे क्षेत्र येते. मराठवाडयांच्या आठ जिह्यांसाठी मराठवाडा वैधानिक विकास मंडळ अस्तित्वात आहे.

### २.४.३ वैधानिक विकास मंडळाची रचनाः

प्रत्येक वैधानिक विकास मंडळात एक अध्यक्ष आणि इतर सहा सदस्यांचा समावेश होतो. त्या सर्वांची नेमणूक राज्यपाल करतात.

१. सर्वसाधारणपणे प्रत्येक विकास मंडळाच्या अधिकार क्षेत्रातील एक विधानसभा सदस्य त्या मंडळाचा सदस्य असतो.
२. एक सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांतून निवडला जातो.
३. नियोजन प्रक्रियेशी संबंधित शासकीय वित्त व लेखा व्यवस्थेतील विशेष ज्ञान असलेल्या एका सदस्याची नेमणूक केली जाते.
४. त्याचप्रमाणे पाटबंधारे सार्वजनिक आरोग्य बांधकाम उद्योग, कृषी, शिक्षण सेवा योजना या क्षेत्रातील विशेष ज्ञान असलेल्या व्यक्तींमधून दोन तज्ञ व्यक्तींची निवड केली जाते.
५. त्या त्या विभागाचे महसूल आयुक्त त्या मंडळाचे सदस्य सचिव असतात.

अशा रीतीने प्रत्येक विकास मंडळावर अध्यक्षासह एकूण सात सदस्य असतात. त्यांचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. वैधानिक विकास मंडळाच्या अध्यक्षाला कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा दिला गेला आहे.

### २.४.४ वैधानिक विकास मंडळाची कार्ये:

१. संपूर्ण राज्यातील विभागाच्या विकासाच्या पातळ्यांच्या तुलनेत योग्य निर्देशांकांच्या आधारे मंडळाच्या क्षेत्रातील विविध विकास क्षेत्रांची विकासाची सापेक्ष पातळी ठरविणे.
२. विभागांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी तसेच त्या त्या विभागातील विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी करण्यात आलेल्या विविध विकासाच्या परिणामांचे मूल्यमापन करणे.
३. वार्षिक तसेच पंचवार्षिक योजनांच्या कक्षेतील विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकासाच्या खर्चाच्या पातळ्या सुचवणे.
४. मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करुन ते राज्यविधिमंडळात सादर करण्यासाठी वित्तीय वर्षाच्या शेवटी राज्यपालांना सादर करणे.
५. विकासाच्या विभिन्न योजना राबविणे. शासनाच्या अनेक योजना आणि धोरणांची अंमलबजावणी करणारी यंत्रणा म्हणून ही विकास मंडळे कार्य करतात.
६. तसेच वित्तीय तांत्रिक आणि शासकीय योजनांविषयी योग्य ते मार्गदर्शन ही मंडळे करतात.
७. आपल्या विभागाच्या सर्वागीण विकासाची जबाबदारी प्रत्येक मंडळावर असते.

### २.४.५ मंडळाचे निधीवाटप आणि सेवायोजनांची व्यवस्था:

राज्याची एकूण गरज विचारात घेऊन वैधानिक विकास मंडळाच्या क्षेत्रावरील विकास खर्चासाठी समन्वयाने निधीचे वाटप करण्याची जबाबदारी राज्यपालांवर सोपविण्यात आली आहे. राज्याच्या अंदाजपत्रकात विकास मंडळांचा निधी निर्देशीत करण्यात येईल आणि निश्चित केलेल्या निधीतून संबंधित विकासकार्ये राज्यशासनाकडून पूर्ण करण्यात येईल. अशी तरतूद करण्यात आली आहे.

तसेच तंत्रशिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देणे व त्याच्या आधारे महाराष्ट्र शासनात नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था व्हावी याची जबाबदारी देखील राज्यपालांवर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी राज्यपाल

राज्यसरकारला वेळोवेळी योग्य ते निर्देश देतील. अशी तरतूद वैधानिक विकास मंडळाच्या कायद्यात करण्यात आली आहे.

### २.४.६ वैधानिक विकास मंडळांची उपयुक्तताः

भारताच्या नियोजन आयोगाने वैधानिक विकास मंडळाबद्दल असे म्हटले आहे की, "प्रादेशिक विषमतेत आणखी सामाजिक सांस्कृतिक वादांची भर पडून अनेकदा सामाजिक राजकीय वाद, ताणतणाव उफाळून आले आहे. त्यातून एकसंध राज्य दुभंगण्याचे प्रकारही घडले आहे. या प्रकारची पुनरावृत्ती टाळण्यासाठी महाराष्ट्रातील वैधानिक विकास मंडळांचा प्रयोग देशाच्या अन्य भागातही सुरू करायला पाहिजे." वास्तविक पाहता सर्व विभागीय विकास मंडळांनीआपल्या विभागाच्या औद्योगिक प्रगतीसाठी आपापल्या परीने प्रयत्न केले आहे. नियोजन आयोगाने देखील या विकास मंडळांना राज्याच्या नियोजन आणि निर्णय प्रक्रियेत निर्णायक भूमिका देण्याची शिफारस केली आहे. वैधानिक विकास मंडळांनीदेखील आपापली कार्ये सुसंबद्ध रीतीने पार पाडली आहेत. विकासाच्या असमतोलामुळे निर्माण झालेले सामाजिक राजकीय ताण बऱयाच अंशी कमी झाले आहे. पण अजूनही त्यांचा परिणाम मात्र नगण्य म्हणावा लागेल. मराठवाडा आणि विदर्भ प्रदेश आजही काही प्रमाणात मागासलेलाच आहे. म्हणूनच कधी कधी स्वतंत्र्य विदर्भ राज्याची मागणी जोर पकडते. पश्चिम महाराष्ट्राचा अपवाद वगळता आजही महाराष्ट्रातील काही भाग मागास आहे. रस्ते, दळणवळण, वाहतूक इ. मूलभुत सुविधा आजही कमी प्रमाणातच या भागात उपलब्ध झाल्या आहेत.

वैधानिक विकास मंडळांमुळे राज्याचे पर्यायाने शासनाचे अधिकार कमी होतील, अशी भीती व्यक्त केली जाते. परंतु ती निरर्थक आहे. प्रत्यक्षात मंडळांची निर्मिती झाल्यानंतरही पश्चिम महाराष्ट्राकडे जास्त निधी वळविला गेला. परिणामी मागास भागांना निधी कमी प्रमाणात मिळाला. खरे पाहता त्यांना त्यांच्या विकासासाठी जास्त निधीची गरज आहे. वैधानिक विकास मंडळांनी नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार काम करावे आणि महाराष्ट्र राज्य सरकारने देखील मंडळाच्या शिफारशींना योग्य न्याय दिला पाहिजे.

अनुशेष शोधून काढून अहवाल तयार करणे. त्या वर शासनाने विचारविनिमय करणे. राज्यविधी मंडळाने विकासाचा अनुशेष दूर करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची वाट पाहत बसण्याची भूमिका मंडळांनी बदलली पाहिजे. असे मत नियोजन आयोगाने व्यक्त केले आहे. तसेच वैधानिक विकास मंडळांना अधिक अधिकार देण्याची शिफारस नियोजन आयोगाने केली आहे.

**आपली प्रगति तपासा**

१. वैधानिक विकास मंडळ म्हणजे काय ? ते सांगून वैधानिक विकास मंडळाची रचना उद्दिष्टे कार्य स्पष्ट करा.

## २.५ सारांश

प्रादेशिकवाद राष्ट्राय एकता आणि अखंडतेला धोका असून प्रदेशहिताला महत्त्व देण्याऐवजी राष्ट्रहिताला महत्त्व दिली पाहिजे.

प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी दांडेकर समितीने सुचविलेल्या शिफारशी महत्त्वपूर्ण आहेत.

त्याचप्रमाणे विदर्भ मराठवाडयाच्या विकासासाठी स्थापन करण्यात आलेल्या वैधानिक विकास मंडळांनी या प्रदेशातील मागासलेपणा दूर करण्यासाठी हातभार लावला जात असल्यामुळे हे प्रांत आज विकासाच्या मार्गावर आहेत.

## २.६ विद्यापीठीय प्रश्न

१. उप-प्रादेशिकवाद म्हणजे काय? ते सांगून मराठवाडा आणि विदर्भ या प्रांतातील समस्यांची चर्चा करा.

२. दांडेकर समिती

३. प्रादेशिक असमतोल दूर करण्यात वैधानिक विकास मंडळाची भूमिका स्पष्ट करा.

## २.७ संदर्भग्रंथ

१. सिरसिकर वं.म. (२००८) आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण पुणे कान्टिनेन्टल

२. जैन, अशोक (१९९८), महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण, मुंबई सेठ

३. बंग के. आर (२०१३), महाराष्ट्र शासन आणि राजकारण औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स

❄❄❄❄❄❄❄

# ३

# महाराष्ट्रातील राजकीय संस्था

**घटक रचना**

उद्दिष्टे

प्रस्तावना

३.१ राज्य विधिमंडळ: रचना आणि कार्य

३.१.१ विधानसभा

३.१.१.१ विधानसभेची रचना

३.१.१.२ विधानसभेचे अधिकार व कार्य

३.१.२ विधान परिषद

३.१.२.१ विधान परिषदेची रचना

३.१.२.२ विधान परिषदेचे अधिकार व कार्य

३.२ मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ: भूमिका

३.२.१ मुख्यमंत्र्यांची भूमिका (अधिकार व कार्य)

३.२.२ मंत्रिमंडळाची भूमिका (अधिकार व कार्य)

३.३ उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालये

३.३.१ उच्च न्यायालय

३.३.१.१ उच्च न्यायालयाची रचना

३.३.१.२ उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र

३.३.२ दुय्यम न्यायालये

३.३.२.१ जिल्हा व सत्र न्यायालय

३.३.२.२ कनिष्ठ/तालुका न्यायालय

## उद्दिष्टे

१) राज्य विधिमंडळाची रचना समजावून देणे.

२) राज्य विधिमंडळाच्या अधिकार व कार्याची ओळख करून देणे.

३) राज्याच्या कार्यकारी मंडळातील मुख्यमंत्र्यांची भूमिका स्पष्ट करणे.

४) राज्याच्या कार्यकारी मंडळातील मंत्रिमडळाची भूमिका समजावून देणे.

५) उच्च न्यायालयाची रचना स्पष्ट करणे.

६) उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र विद्यार्थ्यांना समजावून देणे.

७) दुय्यम न्यायालयाची रचना व अधिकारक्षेत्रावर प्रकाश टाकणे.

## प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण समजावून घेत असताना राज्याच्या राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांची भूमिका समजावून घेणे नितांत आवश्यक ठरते. कारण हे तीन घटक राज्याच्या राजकारणाची दिशा निश्चित करीत असतात. राज्यविधिमंडळाकडून अर्थात विधानसभा व विधान परिषदेकडून राज्यासाठी आवश्यक असणारे कायदे निर्माण केले जातात. काही राज्यातील राज्यविधिमंडळे ही एकगृही, तर काही राज्यातील राज्यविधिमंडळे द्विगृही स्वरूपाची आहेत. राज्यविधिमंडळाने केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे कार्य राज्याच्या कार्यकारी मंडळाला करावे लागते. यामध्ये विशेषतः वास्तविक कार्यकारी प्रमुख म्हणून मुख्यमंत्र्यांची भूमिका त्याचबरोबर मुख्यमंत्र्यांच्या सहकारी भूमिकेत त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या मंत्रिमंडळाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाचे सुयोग्य नेतृत्व राज्याच्या विकासाला योग्य दिशा देण्याचे कार्य करीत असते. राज्याच्या कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळामध्ये योग्य संतुलन आणि नियंत्रण राखण्याचे कार्य न्यायमंडळाकडून होत असते. अर्थात संसदीय लोकशाही शासनव्यवस्थेमध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्यामध्ये अधिकार व कार्य यांच्याबाबतीत सत्ता संतुलन आणि नियंत्रण असणे आवश्यक असते. नागरिकांचे मूलभूत हक्क आणि भारतीय संविधानाचे संरक्षण करण्यात उच्च न्यायालयाची भूमिका राज्यपातळीवर महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्तरावर अर्थात जिल्हा व तालुका स्तरावर कार्य करणारी अनुक्रमे जिल्हा व सत्र न्यायालये तसेच कनिष्ठ न्यायालयांची भूमिकादेखील न्यायदानाच्या कार्यात आधुनिक महाराष्ट्रामध्ये महत्त्वपूर्ण ठरलेली आहे. प्रस्तुत प्रकरणांमध्ये महाराष्ट्रातील राजकीय संस्थांची ओळख करून घेत असताना राज्यविधिमंडळाची रचना आणि कार्य, राज्याच्या शासनयंत्रणेत मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाची भूमिका तसेच राज्याच्या स्तरावर न्यायदानामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालयांची भूमिका यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

## ३.१ राज्य विधिमंडळ: रचना आणि कार्य

भारताने संघराज्य शासनपद्धतीचा स्विकार केलेला असल्यामुळे संपूर्ण देशासाठी एक मध्यवर्ती कायदेमंडळ अर्थात संसद व प्रत्येक घटकराज्यासाठी स्वतंत्र राज्यविधिमंडळ अशी व्यवस्था स्विकारण्यात आलेली आहे. त्यामुळे भारतीय संघराज्यात केंद्रीय स्तरावरील कायदेमंडळ आणि घटकराज्य स्तरावरील कायदेमंडळ असे कायदेमंडळाचे दोन स्तर दिसून येतात. या दोन्ही स्तरांमध्ये कायदेविषयक अधिकारांची विभागणी संविधानानुसार करण्यात आलेली आहे. भारताने केंद्रीय स्तरावर द्विगृही कायदेमंडळ पद्धती स्विकारलेली आहे, मात्र घटकराज्याच्या स्तरावर सरसकट द्विगृही कायदेमंडळ पद्धतीचा स्विकार करण्यात आलेला नाही. त्यामुळे काही घटकराज्याचे विधिमंडळ एकगृही तर काही घटकराज्यांचे विधिमंडळ द्विगृही असल्याचे दिसून येते. घटकराज्याच्या विधीमंडळाचे द्वितीय सभागृह निर्माण करणे किंवा बरखास्त करण्याचा अधिकार संबंधित राज्य आणि संसदेला देण्यात आलेला आहे. भारतीय संविधानाच्या कलम १६८ ते २१२ मध्ये घटकराज्याच्या विधिमंडळासंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे. कलम १६८ नुसार भारतातील प्रत्येक घटकराज्याचे स्वतंत्र

विधिमंडळ असेल आणि ते राज्यपाल, विधानसभा आणि असल्यास विधानपरिषद यांनी मिळून बनलेले असेल. घटकराज्याच्या विधीमंडळाचे विधानसभा हे प्रथम व कनिष्ठ, तर विधानपरिषद हे द्वितीय व वरिष्ठ सभागृह आहे.

### ३.१.१ विधानसभा :

भारतीय संविधानाच्या कलम १७० नुसार प्रत्येक घटकराज्यात विधानसभा या सभागृहाची निर्मिती करण्यात आलेली आहे. विधानसभा हे घटकराज्याच्या विधीमंडळाचे कनिष्ठ, परंतु अधिकाराच्या दृष्टीने श्रेष्ठ असणारे प्रथम सभागृह आहे. जनतेचे प्रतिनिधित्व करणारे सभागृह म्हणून राज्यविधिमंडळामध्ये विधानसभेला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

#### ३.१.१.१ विधानसभेची रचना:-

विधानसभा हे राज्यविधिमंडळातील जनतेचे प्रतिनिधित्व करणारे व अस्थायी स्वरूपाचे सभागृह आहे. भारतीय संविधानानुसार पुढील मुद्द्यांच्या आधारे विधानसभेची रचना आहे;

- **विधानसभेची सदस्यसंख्या:-**

  विधानसभेची सदस्यसंख्या ही त्या घटकराज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात ठरविण्यात येते, त्यामुळे भारतातील प्रत्येक घटकराज्याच्या विधानसभेची सदस्यसंख्या एकसमान नाही. भारतीय संविधानाच्या कलम १७० नुसार विधानसभेची सदस्यसंख्या किमान ६० व कमाल ५०० ठरविण्यात आलेली आहे. परंतु विधानसभेच्या सदस्यसंख्येला अरुणाचल प्रदेश, गोवा, मिझोरम, पांडेचरी, सिक्कीम ही राज्य अपवाद आहेत. कारण या लहान घटकराज्यांच्या विधानसभा सदस्यसंख्येची अट शिथिल करण्यात आलेली आहे. त्यामुळे अरुणाचल प्रदेश, गोवा व मिझोराम या राज्याच्या विधानसभेचे सदस्यसंख्या ४०, सिक्कीम ३२, तर पांडेचेरी या घटकराज्याच्या विधानसभेची सदस्यसंख्या ३० आहे. साधारणपणे किमान ७५,०००, तर कमाल ३,५०,००० लोकसंख्येसाठी एका विधानसभा मतदारसंघाची निर्मिती केली जाते. प्रत्येक राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवल्या जातात. त्याचप्रमाणे अँग्लो-इंडियन जमातीस विधानसभेत योग्य प्रतिनिधित्व मिळाले नसल्यास राज्यपाल अँग्लो-इंडियन जमातीमधून एका प्रतिनिधीची नियुक्ती विधानसभेत करू शकत होते. परंतु २०२ मध्ये भारतीय संसदेने केलेल्या १०४ व्या घटनादुरुस्तीनुसार राज्य विधानसभेतील अ‍ॅग्लो-इंडियन यांना देण्यात आलेले विशेष प्रतिनिधित्व समाप्त करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेची सदस्यसंख्या २८८ आहे.

- **विधानसभेची निवडणूक पद्धत:-**

  भारतीय संविधान आणि लोकप्रतिनिधीत्व कायदा १९५१ नुसार घटक राज्याच्या विधानसभेची निवडणूक पद्धत निश्चित करण्यात आलेली आहे. विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदारसंघ निश्चित करून प्रौढ मताधिकाराच्या गुप्त व प्रत्यक्ष मतदान

पद्धतीने निवडणूक होते. 'एक मतदारसंघ-एक प्रतिनिधी' या तत्त्वानुसार मतदारसंघात झालेल्या मतदानातून सर्वाधिक मते मिळविणारा उमेदवार विजयी म्हणून घोषित केला जातो. वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाद्वारे आपला प्रतिनिधी निवडण्याचा घटनात्मक अधिकार देण्यात आलेला आहे.

- **विधानसभा सदस्यत्वासाठीची पात्रता:-**

भारतीय संविधानाच्या कलम १७३ नुसार विधानसभेचा सदस्य होण्यासाठी पुढील पात्रता धारण करणे आवश्यक आहे;

१) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

२) वयाची पंचवीस वर्ष पूर्ण झालेली असावीत.

३) संसदेने वेळोवेळी कायद्यानुसार ठरवून दिलेल्या अटी त्याने पूर्ण केलेल्या असाव्यात.

४) उमेदवाराचे नाव संबंधित घटकराज्याच्या मतदार यादीत असावे.

५) अनुसूचित जाती किंवा जमातीसाठी राखीव असणाऱ्या मतदारसंघातून निवडणूक लढविणारा व्यक्ती त्या-त्या प्रवर्गाचा असणे आवश्यक आहे.

- **विधानसभा सदस्यत्वासाठीची अपात्रता:-**

भारतीय संविधानाच्या कलम १९१ नुसार विधानसभेच्या सदस्यत्वासाठीच्या अपात्रता पुढीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत;

१) न्यायालयाने वेडी, दिवाळखोर घोषित केलेली व्यक्ती.

२) न्यायालयाने अपराधी घोषित करून दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झालेली व्यक्ती.

३) निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन करणारी व्यक्ती.

४) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचे खोटे व बनावट जातीचे दाखले दिलेली व्यक्ती.

५) निवडणूक आयोगाला वेळेवर निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केलेली व्यक्ती.

६) केंद्र किंवा राज्य शासनाच्या अखत्यारितील लाभाचे पद धारण करणारी व्यक्ती.

७) दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्विकारणारी व्यक्ती.

८) सभापतींच्या परवानगीशिवाय साठ दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर असणारी व्यक्ती.

९) एकाच वेळी कोणत्याही दोन सभागृहाचा सदस्य असणारी व्यक्ती.

१०) भारतीय नागरिक नसणारी व्यक्ती.

११) १९८५ च्या पक्षांतर विरोधी कायद्यानुसार पक्षांतर केलेली व्यक्ती.

- **विधानसभा सदस्यांचा शपथविधी:-**

भारतीय संविधानाच्या कलम १८८ नुसार विधानसभेचे नवनिर्वाचित सदस्य संबंधित राज्याच्या राज्यपालांकडून पद व गोपनीयतेची शपथ घेतात. पद व गोपनीयतेच्या घेतलेल्या शपथेला विधानसभेचे सदस्य बांधील असतात.

- **विधानसभेचा कार्यकाल:-**

भारतीय संविधानाच्या कलम १७२ नुसार विधानसभेचा कार्यकाल सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा असतो. पाच वर्ष पूर्ण होण्यापूर्वी म्हणजेच विधानसभेचे मुदतपूर्व विसर्जन करण्याचा अधिकार संबंधित राज्यांच्या राज्यपालांना आहे, परंतु भारतीय संविधानाच्या कलम १७४ नुसार राज्यपाल विधानसभेचे मुदतपूर्व विसर्जन करताना मुख्यमंत्र्यांचा सल्ला विचारात घेतात. आणीबाणीच्या काळात विधानसभेचा कार्यकाल संसद एक वर्षाने वाढवू शकते, परंतु आणीबाणी उठविल्यानंतर सहा महिन्यांच्या आत विधानसभेच्या निवडणुका घेणे आवश्यक असते. ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार १९७६ मध्ये विधानसभेचा कार्यकाल सहा वर्षांचा करण्यात आलेला होता, परंतु १९७८ मध्ये झालेल्या ४४ व्या घटनादुरुस्तीनुसार पुन्हा विधानसभेचा कार्यकाल पाच वर्षाचा करण्यात आला. विधानसभेप्रमाणेच विधानसभेच्या सदस्यांचा कार्यकालदेखील सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा असतो, तसेच सदस्य स्वइच्छेने तत्पूर्वी राजीनामा देऊ शकतात.

- **विधानसभा सदस्यांचे वेतन, भत्ते, सोयीसुविधा व निवृत्तीवेतन :-**

विधानसभा सदस्यांचे वेतन, भत्ते व इतर प्रकारच्या सोयीसुविधा ठरविण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने ठरविल्यानुसार सध्या विधानसभेच्या प्रत्येक सदस्याला दरमहा मूळ वेतन १,८२,२००/- रुपये, महागाई भत्ता ३९,९७४/- रुपये, दूरध्वनी सुविधा भत्ता ८०००/- रुपये, स्टेशनरी व टपाल सुविधा भत्ता १०,०००/- रुपये, संगणक चालकाची सेवा १०,०००/- रुपये अशाप्रकारे एकूण वेतन २,४१,१७४/- रुपये दिले जाते. याशिवाय विधानसभेच्या अधिवेशन काळात दैनिक भत्ता म्हणून प्रतिदिन २०००/- रुपये दिले जातात. याशिवाय प्रत्येक विधानसभेच्या सदस्यांना एक स्वीय सहाय्यकाची सेवा घेण्यासाठी दरमहा २५,०००/- रुपये दिले जातात. याशिवाय इतरही अनेक सुविधा विधानसभा सदस्यांना राज्याच्या तिजोरीमध्ये मोफत पुरविल्या जातात. विधानसभा सदस्य म्हणून निवृत्त झाल्यानंतर दरमहा ५०,०००/- रुपये निवृत्ती वेतन आणि पाच वर्षापेक्षा अधिक काळ विधानसभा सदस्य म्हणून कार्य केल्यानंतर पाच वर्षापुढील प्रत्येक एका वर्षासाठी २०००/- रुपये अतिरिक्त निवृत्ती वेतन दरमहा दिले जाते. याशिवाय विधानसभा सदस्याच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीला दरमहा ४०,०००/- रुपये कुटुंब निवृत्ती वेतन दिले जाते.

- **मतदारसंघ विकास निधी:-**

विधानसभेच्या सदस्यांना आपल्या मतदारसंघातील पायाभूत समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आणि या माध्यमातून मतदारसंघाचा विकास करण्यासाठी जो विशिष्ट निधी प्रति वर्षाला दिला जातो, त्यास 'मतदारसंघ विकास निधी' किंवा 'आमदार निधी' असे म्हटले जाते. या विकास निधीचा वापर विधानसभेच्या सदस्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार करावा लागतो. महाराष्ट्र विधिमंडळाने ठरविल्यानुसार सध्या विधानसभेच्या प्रत्येक सदस्याला दरवर्षी पाच कोटी रुपये मतदारसंघ विकास निधी दिला जातो.

- **विधानसभेचे अधिवेशन:-**

सामान्यपणे विधानसभेचे वर्षातून किमान दोन अधिवेशने झाली पाहिजेत आणि या दोन अधिवेशनांमध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्तीचे अंतर असू नये, असे घटनात्मक बंधन घालण्यात आलेले आहे. विधानसभेचे अधिवेशन बोलावण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. तसेच विधानसभेच्या पहिल्या अधिवेशनाची सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने होत असते. आवश्यकता वाटल्यास राज्यपाल विधानसभेचे अतिरिक्त अधिवेशन बोलावू शकतात. महाराष्ट्र विधानसभेचे वर्षातून किमान तीन अधिवेशने होतात. हिवाळी अधिवेशन महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर येथे, तर उर्वरित दोन अधिवेशने महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे विधानभवनात होतात.

- **विधानसभेची गणसंख्या:-**

विधानसभेची गणसंख्या म्हणजे विधानसभेच्या अधिवेशनाचे कामकाज सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी किमान सदस्यांची संख्या होय. विधानसभेचे कामकाज सुरू करण्यासाठी विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या १/१० किंवा १० यापैकी जी संख्या मोठी असेल, ती गणसंख्या मानली जाते. गणपूर्तीअभावी विधानसभेचे कामकाज तहकूब करण्याचा अधिकार सभापतींना आहे. महाराष्ट्राच्या विधानसभेची गणसंख्या २९ आहे.

- **विधानसभेचे पदाधिकारी:-**

भारतीय संविधानाच्या कलम १७८ ते १८१ मध्ये विधानसभेचे पदाधिकारी अर्थात सभापती व उपसभापती यांची निवड, वेतन व कार्य याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. विधानसभेचे नवनिर्वाचित सदस्य आपल्यमधूनच बहुमताने एका सदस्याची निवड सभापती म्हणून, तर एका सदस्याची निवड उपसभापती म्हणून करतात. सभापती आणि उपसभापती यांचा कार्यकाल साधारणपणे पाच वर्षांचा असतो. तत्पूर्वी ते स्वच्छेने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात किंवा विधानसभेने सभापती किंवा उपसभापतींवर अविश्वास ठराव बहुमताने मंजूर केल्यास त्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागतो, परंतु अविश्वास ठरावासंबंधी तशी सूचना १४ दिवस अगोदर

सभागृहाला द्यावी लागते. सभापतींच्या गैरहजेरीत उपसभापती सभागृहाचे कामकाज पाहतात. सभापती आणि उपसभापती दोघांच्याही गैरहजेरीत सभागृहाचे कामकाज चालवण्यासाठी तालिका अध्यक्षांची नियुक्ती केली जाते. विधानसभेचे सभापती सत्ताधारी राजकीय पक्षाचे, तर उपसभापती हे विरोधी राजकीय पक्षाचे असतात, अशी परंपरा महाराष्ट्रामध्ये रूढ आहे. सभापती हे बहुमत प्राप्त सत्ताधारी राजकीय पक्षाचे सदस्य असले तरी सभापती म्हणून निवड झाल्यानंतर त्यांना पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहावे लागते. कारण सभापती हे पद अत्यंत प्रतिष्ठेचे आणि सन्मानाचे मानले जाते. सभापतींना प्राप्त असणाऱ्या महत्त्वपूर्ण अधिकारामुळे या पदाचे महत्त्व संसदीय प्रणालीमध्ये वाढलेले आहे.

### ३.१.१.२ विधानसभेचे अधिकार व कार्य:-

घटकराज्याच्या विधिमंडळाची कार्यप्रणाली संसदीय कार्यप्रणालीप्रमाणे असते. घटकराज्याच्या विधिमंडळातील विधानसभा या जनतेचं प्रतिनिधित्व करणाऱ्या सभागृहाला व्यापक अधिकार प्राप्त आहेत, त्यानुसार पुढील कार्य विधानसभेला करावी लागतात;

#### १) कायदेविषयक अधिकार व कार्य:-

विधानसभा हे राज्यविधिमंडळाचे कायदा करणारे सर्वोच्च तसेच प्रभावशाली सभागृह आहे. राज्यसूचीमधील ६१ विषयांवर तसेच समवर्तीसूचीतील ५२ विषयांपैकी ज्या-ज्या विषयांवर केंद्रशासनाने कायदा केलेला नसेल, अशा विषयांवर नवीन कायदा करणे, जुन्या कायद्यामध्ये दुरुस्ती करणे किंवा अनावश्यक असलेला कायदा रद्द करण्याचा कायदेविषयक अधिकार विधानसभेला प्राप्त आहे. मात्र समवर्ती सूचीतील एखाद्या विषयावर संसदेने कायदा केलेला असल्यास, त्या कायद्याला विरोध करणारा कायदा विधानसभा करू शकत नाही. कोणत्याही विधेयकाची सुरुवात विधानसभेतून करता येते. परंतु धन विधेयक किंवा अर्थ विधेयक हे प्रथमतः विधानसभेत मांडले जाते. विधानसभेने मंजूर केलेले विधेयक जेव्हा विधान परिषदेकडे पाठवले जाते, तेव्हा विधान परिषद ते विधेयक आहे त्या स्थितीत मंजूर करू शकते, त्यामध्ये दुरुस्त्या सुचवू शकते किंवा ते विधेयक फेटाळून लावू शकते. विधानसभेने पाठवलेले विधेयक तीन महिन्यापर्यंत आहे त्या स्थितीत ठेवण्याचा अधिकार विधान परिषदेला असतो. परंतु तीन महिन्यानंतर विधान परिषदेला हे विधेयक मंजूर करून, दुरुस्त्या करून किंवा नामंजूर करून विधानसभेकडे पाठवावे लागते. विधानसभा विधान परिषदेने सुचवलेल्या दुरुस्त्या स्विकारून किंवा नाकारून आहे त्या स्थितीत पुन्हा ते विधेयक विधान परिषदेकडे पाठवते. यावेळी मात्र विधान परिषदेला ते विधेयक मंजूर करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी मिळतो. याचाच अर्थ विधान परिषद विधानसभेने मंजूर केलेले विधेयक पूर्णपणे नाकारू शकत नाही, त्यामध्ये फक्त दुरुस्त्या सुचवू शकते, परंतु त्या दुरुस्तीचा स्विकार करण्याचे बंधन विधानसभेवर नसते. थोडक्यात सर्वसाधारण विधेयकाला मंजूर करण्यासाठी विधान परिषद फक्त चार महिन्यांचा विलंब करू शकते. एखाद्या विधेयकाबाबत विधानसभा आणि विधान परिषद यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाल्यास संसदेप्रमाणे संयुक्त अधिवेशन बोलावण्याची तरतूद संविधानात केलेली नाही. यावरून कायदा निर्मितीबाबत

विधानसभेचा निर्णय हा अंतिम मानला जात असल्यामुळे कायदेविषयक अधिकारांच्या बाबतील विधानसभा हे सभागृह सर्वश्रेष्ठ मानले जाते.

**२) आर्थिक अधिकार व कार्य:-**

घटकराज्याच्या आर्थिक प्रशासनावर विधानसभेचे पूर्णपणे नियंत्रण असते. धनविधेयक सर्वप्रथम विधानसभेमध्ये मांडले जाते. त्याचप्रमाणे कोणते विधेयक हे धन विधेयक आहे, हे ठरविण्याचा अधिकारदेखील विधानसभेच्या सभापतींना आहे. धन विधेयकाला विधानसभेची मंजुरी मिळाल्यानंतर विधान परिषदेकडे पाठवले जाते. विधान परिषद धन विधेयकामध्ये दुरुस्त्या सुचवू शकते, परंतु त्या दुरुस्त्या स्विकारणे अथवा नाकारणे हे सर्वस्वी विधानसभेवर अवलंबून असते. विधान परिषदेने धनविधेयक १४ दिवसांच्या आत विधानसभेकडे परत न पाठवल्यास आहे त्या स्थितीत विधान परिषदेला धनविधेयक मान्य आहे, असे समजून ते विधेयक राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठवले जाते. राज्याचे अंदाजपत्रक राज्यपालांच्या परवानगीने चर्चा करण्यासाठी दोन्ही सभागृहापुढे मांडले जाते, परंतु सखोल चर्चा झाल्यानंतर अंदाजपत्रकाला मंजुरी देण्याचा अधिकार हा विधानसभेलाच आहे. नवीन कर लावणे, जुने कर रद्द करणे, कर कमी करणे किंवा कर रचनेत बदल करण्याचा अधिकार हा विधानसभेला असतो. यावरून स्पष्ट होते की, आर्थिक अधिकारांच्या बाबतीत विधानसभा श्रेष्ठ आहे आणि त्यामुळे सर्व आर्थिक अधिकार विधानसभेच्या हाती एकवटलेले आहेत.

**३) कार्यकारी विषयक अधिकार व कार्य:-**

विधानसभा घटकराज्याच्या कार्यकारी मंडळावर अर्थात मंत्रिमंडळावर पूर्णपणे नियंत्रण ठेवत असते. भारतीय संविधानाच्या कलम १६४ नुसार राज्याचे कार्यकारी मंडळ हे सामूहिकरीत्या विधानसभेला जबाबदार असते, कारण जोपर्यंत विधानसभेचा मंत्रिमंडळावर विश्वास आहे, तोपर्यंत ते अधिकार पदावर राहू शकते. ज्या दिवशी मंत्रिमंडळ विधानसभेचा विश्वास गमावेल त्या दिवशी त्यांना पदाचा राजीनामा द्यावा लागतो. विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान विविध खात्याच्या मंत्र्यांना प्रश्न व उपप्रश्न विचारणे, लक्षवेधी सूचना मांडणे, स्थगन प्रस्ताव मांडून महत्त्वाच्या सार्वजनिक विषयावर चर्चा घडवून आणणे, गैरव्यवहार व भ्रष्टाचारासंदर्भात आवाज उठवणे, सरकारवर टीका करणे, सरकारने मांडलेले विधेयक फेटाळणे, काम रोको प्रस्ताव मांडणे, सभात्याग करणे, कामकाजावर बहिष्कार घालणे, अल्पकालीन चर्चेत सहभाग घेणे, सरकारच्या किंवा मंत्रिमंडळाच्या कामासंबंधी अथवा मांडलेल्या विधेयकासंबंधी नाराजी व्यक्त करणे ई. विविध माध्यमांचा वापर करून विधानसभा कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवत असते.

**४) घटनादुरुस्तीचा अधिकार व कार्य :-**

भारतीय संविधानाच्या ३६८ व्या कलमानुसार घटनादुरुस्ती करण्याच्या तीन पद्धती दिलेल्या आहेत. यामधील तिसऱ्या प्रकारानुसार जेव्हा राज्यघटनेमध्ये दुरुस्ती केली जाते, तेव्हा संसदेच्या मंजुरीनंतर ते घटनादुरुस्ती विधेयक किमान अर्ध्या पेक्षा अधिक घटकराज्यांच्या विधिमंडळाच्या मंजुरीसाठी पाठवले जाते. अशावेळी विधानसभेसमोर आलेल्या घटनादुरुस्ती विधेयकाला मंजुरी देणे किंवा नाकारणे याचा

अधिकार पूर्णपणे विधानसभेला असतो. परंतु विधान परिषदेला घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार देण्यात आलेला नाही.

**५) निवडणुकीसंबंधीचा अधिकार व कार्य :-**

राज्य विधिमंडळाच्या विधानसभा सदस्यांना राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असतो. त्याचप्रमाणे घटकराज्यातील राज्यसभेचे प्रतिनिधी निवडण्याचा तसेच राज्यात विधान परिषद हे द्वितीय व वरिष्ठ सभागृह असल्यास त्या सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या १/३ सदस्यांची निवड करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. त्याचप्रमाणे विधानसभेचे सभापती आणि उपसभापती यांची निवड करण्याचा आणि सभापती व उपसभापती यांच्यावर अविश्वास प्रस्ताव दाखल करून पदच्युत करण्याचा अधिकार विधानसभेला आहे.

**६) इतर अधिकार व कार्य :-**

विधानसभा हे जनप्रतिनिधित्व करणारे सभागृह आहे, त्यामुळे जनतेच्या समस्या व प्रश्नांना वाचा फोडणे, जनतेच्या तक्रारी दूर करणे, सार्वजनिक हिताचे प्रश्न सभागृहात मांडणे ही कार्य हे सभागृह करते. राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणावर चर्चा करणे, अभिनंदनाचा ठराव मांडणे हे कार्यदेखील विधानसभेमध्ये केले जाते. याशिवाय सभागृहाच्या नियमांचा भंग करणाऱ्या, सभापतीविषयी अनादर व्यक्त करणाऱ्या, सभागृहाच्या कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या, सभागृहात गोंधळ माजविणाऱ्या सदस्याचे सभासदत्व स्थगित किंवा रद्द करण्याचा अधिकार विधानसभेला आहे.

अशाप्रकारे राज्यविधिमंडळाच्या विधानसभा या सभागृहाला महत्त्वपूर्ण अधिकार प्राप्त असल्यामुळे विविध प्रकारची महत्त्वाची कार्य विधानसभेकडून केली जातात, म्हणून विधानसभा हे राज्य विधिमंडळाचे एक शक्तिशाली आणि प्रभावी सभागृह बनलेले आहे.

### ३.१.२ विधान परिषद:-

भारतीय संघराज्यात काही घटकराज्यांतील विधिमंडळे एकगृही, तर काही घटकराज्यांची विधिमंडळे द्विगृही आहेत. ज्या घटकराज्यांची विधिमंडळे द्विगृही आहेत, अशा घटकराज्यांमध्ये विधानपरिषद हे द्वितीय आणि वरिष्ठ सभागृह आहे. भारतीय संविधानाच्या कलम १६९ नुसार संबंधित राज्यात विधानपरिषद निर्माण करण्याचा किंवा अस्तित्वात असलेली विधानपरिषद नष्ट करण्याचा अधिकार विधानसभेला आहे. याचाच अर्थ घटकराज्यातील विधिमंडळ द्विगृही असावे किंवा नसावे, याचा निर्णय त्या राज्यातील विधानसभा घेत असते. परंतु विधान परिषद सभागृह निर्मितीच्या बाबतीत संसदेची भूमिकादेखील महत्त्वपूर्ण असते. कारण ज्या राज्यांमध्ये विधानपरिषद सभागृह नव्याने निर्माण करावयाचे आहे किंवा अस्तित्वात असलेले विधानपरिषद हे सभागृह नष्ट करावयाचे आहे, त्या राज्यातील विधानसभेने एकूण सदस्यसंख्येच्या बहुमताने आणि उपस्थित राहणाऱ्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ बहुमताने तसा ठराव पास करणे आवश्यक असते. विधानसभेने केलेल्या ठरावानुसार संबंधित राज्यात विधान परिषद हे सभागृह निर्माण करण्याचा किंवा समाप्त करण्याचा कायदा संसद करते आणि अशाप्रकारे संसदेच्या

मान्यतेनंतर विधान परिषद सभागृह निर्माण करता येते किंवा विसर्जित करता येते, अशी नोंद भारतीय संविधानाच्या कलम १६९ नुसार आहे. भारतात सध्या महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक, बिहार, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या घटकराज्यातील विधीमंडळ द्विगृही असल्यामुळे या राज्यात विधान परिषद हे सभागृह अस्तित्वात आहे. तसेच भारतातील पंजाब, पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या घटकराज्यांच्या विधानसभेने मंजूर केलेल्या ठरावानुसार संसदेने विधान परिषद सभागृह विसर्जित केल्याची उदाहरणे आहेत. जम्मू आणि काश्मिर या घटकराज्याच्या विधिमंडळामध्येदेखील विधानपरिषद हे सभागृह होते, परंतु या राज्याचा घटकराज्याचा दर्जा काढून घेण्यात येऊन या घटकराज्याला आता केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्यात आलेला आहे.

### ३.१.२.१ विधान परिषदेची रचना:-

विधानपरिषद हे राज्य विधिमंडळातील द्वितीय व वरिष्ठ सभागृह आहे. विधान परिषद हे स्थायी सभागृह असल्यामुळे या सभागृहाचे कधीही विसर्जन होत नाही. भारतीय संविधानाच्या कलम १७१ नुसार विधान परिषदेची रचना स्पष्ट होते. भारतीय संविधानानुसार पुढील मुद्द्यांच्या आधारे विधान परिषदेची रचना स्पष्ट होते;

- **विधान परिषदेची सदस्यसंख्या:-**

  भारतीय संविधानातील तरतुदीनुसार विधान परिषदेची सदस्यसंख्या ही त्या घटकराज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या १/३ पेक्षा जास्त नसावी व कमीत कमी ४० सदस्य असावेत, असे ठरविण्यात आलेले आहे. महाराष्ट्र विधान परिषदेत ७८, उत्तर प्रदेश विधान परिषदेत ९९, बिहार विधान परिषदेत ९०, आंध्रप्रदेश विधानपरिषदेत ५८ तर तेलंगणा राज्याच्या विधानपरिषदेत ४० सदस्य आहेत. कर्नाटकच्या विधानपरिषदेत ७५ सदस्य आहेत. विधानपरिषद हे वरिष्ठ सभागृह असल्यामुळे विधान परिषदेमध्ये विविध हितसंबंध व कार्यक्षेत्र यांना प्रतिनिधित्व दिले जाते, त्या अनुषंगाने पुढील क्षेत्रातील प्रतिनिधींचा समावेश विधानपरिषदेत करण्याची तरतूद केलेली आहे;

  १) विधान परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येपैकी १/३ सदस्य हे स्थानिक स्वराज्य संस्थेकडून निवडले जातील.

  २) विधान परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येपैकी १/३ सदस्य हे विधानसभा सदस्यांकडून निवडले जातील.

  ३) विधान परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येपैकी १/१२ सदस्य पदवीधर मतदार संघातून निवडले जातील. मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा विद्याशाखेची पदवी प्राप्त होऊन तीन वर्ष पूर्ण झाल्यानंतर पदवीधर मतदार मतदान करण्यासाठी पात्र ठरतात.

  ४) विधान परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येपैकी १/१२ सदस्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संस्थेमध्ये किमान तीन वर्ष शिक्षक म्हणून अध्यापन करणाऱ्या मतदारांच्या शिक्षक मतदार संघातून निवडले जातात.

५) विधानसभेच्या उर्वरित १/६ सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा, सहकार इत्यादी क्षेत्रातील अनुभवी, तज्ञ व्यक्तीमधून ही नियुक्ती राज्यपालांकडून केली जाते.

- **विधान परिषदेची निवडणूक पद्धत:-**

विधान परिषदेमध्ये राज्यपालांकडून नियुक्त होणारे १/६ सदस्य वगळता उर्वरित सदस्यांची निवड करण्यासाठी संसदेच्या कायद्यानुसार क्षेत्रीय मतदारसंघाची निर्मिती केली जाते. विधान परिषदेची निवडणूक ही प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या (Proportional Representation) तत्त्वानुसार एकल संक्रमणीय मतदान (Single Transferrable Vote) पद्धतीने होते.

- **विधान परिषद सदस्यत्वासाठीची पात्रता:-**

भारतीय संविधानाच्या कलम १७३ नुसार विधान परिषद सदस्यांसाठी पुढील पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे;

१) उमेदवार भारताचा नागरिक असावा.

२) उमेदवाराचे वय ३० वर्षे पूर्ण झालेली असावे.

३) संसदेने कायद्यानुसार वेळोवेळी केलेल्या अटी ती व्यक्ती पूर्ण करणारी असावी.

४) उमेदवार सरकारी नोकर किंवा कोणत्याही लाभाच्या पदावर नसावी.

- **विधान परिषद सदस्यत्वासाठीची अपात्रता:-**

भारतीय संविधानानुसार विधान परिषदच्या सदस्यत्वासाठीच्या अपात्रता पुढीलप्रमाणे निश्चित केलेले आहेत;

१) न्यायालयाने वेडी, दिवाळखोर घोषित केलेली व्यक्ती.

२) न्यायालयाने अपराधी घोषित करून दोन वर्षांपेक्षा अधिक शिक्षा झालेली व्यक्ती.

३) निवडणूक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन करणारी व्यक्ती.

४) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीचे खोटे व बनावट जातीचे दाखले दिलेली व्यक्ती.

५) निवडणूक आयोगाला वेळेवर निवडणूक खर्चाचा हिशोब सादर न केलेली व्यक्ती.

६) केंद्र किंवा राज्य शासनाच्या अखत्यारितील लाभाचे पद धारण करणारी व्यक्ती.

७) दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्विकारणारी व्यक्ती.

८) सभापतींच्या परवानगीशिवाय साठ दिवसांपेक्षा जास्त दिवस गैरहजर असणारी व्यक्ती.

९) एकाच वेळी कोणत्याही दोन सभागृहाचा सदस्य असणारी व्यक्ती.

१०) भारतीय नागरिक नसणारी व्यक्ती.

११) १९८५ च्या पक्षांतर विरोधी कायद्यानुसार पक्षांतर केलेली व्यक्ती.

- **विधान परिषद सदस्यांचा शपथविधी:-**

भारतीय संविधानानुसार विधानपरिषदेचे नवनिर्वाचित सदस्य संबंधित राज्याच्या राज्यपालांकडून पद व गोपनीयतेची शपथ घेतात. पद व गोपनीयतेच्या घेतलेल्या शपथेला विधानपरिषदचे सदस्य बांधील असतात.

- **विधान परिषदेचा कार्यकाल:-**

विधानपरिषद हे स्थायी सभागृह असून त्याचे कधीही विसर्जन होत नाही. दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात व तेवढेच सदस्य नव्याने निवडले जातात. राज्याच्या विधानसभेने २/३ बहुमताने विधानपरिषद हे सभागृह विसर्जित करण्यासंदर्भातील ठराव मंजूर करून संसदेकडे पाठविल्यास संसद कायदा करून विधान परिषद बरखास्त करू शकते. विधान परिषद सदस्यांचा कार्यकाल प्रत्येकी सहा वर्षांचा असतो, परंतु तत्पूर्वी विधानपरिषदेचे सदस्य स्वइच्छेने राजीनामा देऊ शकतात.

- **विधान परिषद सदस्यांचे वेतन, भत्ते, सोयीसुविधा व निवृत्तीवेतन :-**

विधान परिषद सदस्यांचे वेतन, भत्ते व इतर प्रकारच्या सोयीसुविधा ठरविण्याचा अधिकार राज्याच्या विधिमंडळाला आहे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने ठरविल्यानुसार सध्या विधान परिषदच्या प्रत्येक सदस्याला दरमहा मूळ वेतन १,८२,२००/- रुपये, महागाई भत्ता ३९,९७४/- रुपये, दूरध्वनी सुविधा भत्ता ८०००/- रुपये, स्टेशनरी व टपाल सुविधा भत्ता १०,०००/- रुपये, संगणक चालकाची सेवा १०,०००/- रुपये अशाप्रकारे एकूण वेतन २,४१,१७४/- रुपये दिले जाते. याशिवाय विधानपरिषदच्या अधिवेशन काळात दैनिक भत्ता म्हणून प्रतिदिन २०००/- रुपये दिले जातात. याशिवाय प्रत्येक विधान परिषदच्या सदस्यांना एक स्वीय सहाय्यकाची सेवा घेण्यासाठी दरमहा २५,०००/- रुपये दिले जातात. याशिवाय इतरही अनेक सुविधा विधान परिषद सदस्यांना राज्याच्या तिजोरीमध्ये मोफत पुरविल्या जातात. विधान परिषद सदस्य म्हणून निवृत्त झाल्यानंतर दरमहा ५०,०००/- रुपये निवृत्ती वेतन आणि ६ वर्षापेक्षा अधिक काळ विधान परिषद सदस्य म्हणून कार्य केल्यानंतर पाच वर्षापुढील प्रत्येक एका वर्षासाठी दरमहा २०००/- रुपये अतिरिक्त निवृत्ती वेतन दिले जाते. याशिवाय विधान परिषद सदस्याच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीला दरमहा ४०,०००/- रुपये कुटुंब निवृत्ती वेतन दिले जाते.

- **मतदारसंघ विकास निधी:-**

विधान परिषदच्या सदस्यांना आपल्या मतदार संघातील पायाभूत समस्यांची सोडवणूक करण्यासाठी आणि या माध्यमातून मतदारसंघाचा विकास करण्यासाठी

जो विशिष्ट निधी प्रति वर्षाला दिला जातो, त्यास 'मतदारसंघ विकास निधी' किंवा 'आमदार निधी' असे म्हटले जाते. या विकास निधीचा वापर विधान परिषदच्या सदस्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या सल्ल्यानुसार करावा लागतो. महाराष्ट्र विधिमंडळाने ठरविल्यानुसार सध्या विधान परिषदच्या प्रत्येक सदस्याला दरवर्षी पाच कोटी रुपये मतदारसंघ विकास निधी दिला जातो.

- **विधान परिषदेचे अधिवेशन:-**

  सामान्यपणे विधान परिषदेचे वर्षातून किमान दोन अधिवेशने झाली पाहिजेत आणि या दोन अधिवेशनांमध्ये सहा महिन्यांपेक्षा जास्तीचे अंतर असू नये, असे घटनात्मक बंधन घालण्यात आलेले आहे. विधान परिषदेचे अधिवेशन बोलावण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. आवश्यकता वाटल्यास राज्यपाल विधान परिषदेचे अतिरिक्त अधिवेशन बोलावू शकतात. महाराष्ट्र विधान परिषदेचे वर्षातून किमान तीन अधिवेशने होतात. घटकराज्यातील विधानसभेचे विसर्जन झालेले असल्यास राज्यपाल फक्त विधान परिषदेचे अधिवेशन बोलावू शकतात.

- **विधान परिषदेची गणसंख्या:-**

  विधान परिषदेची गणसंख्या म्हणजे विधान परिषदेच्या अधिवेशनाचे कामकाज सुरू करण्यासाठी आवश्यक असणारी किमान सदस्यांची संख्या होय. विधान परिषदेचे कामकाज सुरू करण्यासाठी विधान परिषदेच्या एकूण सदस्यसंख्येच्या १/१० किंवा १० यापैकी जी संख्या मोठी असेल, ती गणसंख्या मानली जाते. गणपूर्तीअभावी विधान परिषदेचे कामकाज तहकूब करण्याचा अधिकार सभापतींना आहे.

- **विधान परिषदेचे पदाधिकारी:-**

  भारतीय संविधानाच्या कलम १८२ ते १८६ मध्ये विधान परिषदेचे पदाधिकारी अर्थात सभापती आणि उपसभापती यांची निवड, कार्य आणि वेतन इत्यादीबाबत तरतूद करण्यात आलेली आहे. विधान परिषदेचे सदस्य आपल्या मधूनच एका सदस्याची अध्यक्ष म्हणून, तर एका सदस्याची उपाध्यक्ष म्हणून बहुमताने निवड करतात. सभापती आणि उपसभापती यांचे विधान परिषदेचे सदस्यत्व असेपर्यंत ते पदावर राहतात. आपल्या पदाचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी सभापती तसेच उपसभापती स्वइच्छेने राजीनामा देऊ शकतात. घटनाबाह्य वर्तन, अकार्यक्षमता किंवा पक्षपात अशा कारणावरून विधान परिषदेने बहुमताने अविश्वास प्रस्ताव मंजूर केल्यास सभापती तसेच उपसभापती यांना पदावरून दूर केले जाऊ शकते, परंतु तत्पूर्वी सभागृहाला १४ दिवस अगोदर तशी सूचना द्यावी लागते. विधान परिषदेचे सभापती हे पद प्रतिष्ठा व सन्मानाचे मानले जाते. या पदाला महत्त्वाचे अधिकार प्राप्त आहेत.

### ३.१.२.२ विधान परिषदेचे अधिकार व कार्य :-

विधानपरिषद हे राज्य विधिमंडळाचे द्वितीय आणि वरिष्ठ सभागृह असून या सभागृहाला भारतीय संविधानाच्या कलम १९४ नुसार अधिकार प्राप्त आहेत. त्या अधिकारानुसार विधान परिषदेकडून पुढीलप्रमाणे कार्य केली जातात;

## १) कायदेविषयक अधिकार व कार्य :-

विधानसभेप्रमाणेच राज्यविधिमंडळाच्या विधान परिषद या सभागृहाला कायदेविषयक अधिकार देण्यात आलेले आहेत. राज्यसूचीमधील ६१ विषयांवर तसेच समवर्ती सूचीतील ५२ विषयावर नवीन कायदा करणे, जुन्या कायद्यात दुरुस्ती करणे आणि कालबाह्य झालेला कायदा रद्द करण्याचा अधिकार विधान परिषदेला आहे. कोणत्याही सामान्य विधेयकाची सुरुवात विधान परिषदेतून करता येते. विधानसभेने मंजूर केलेले सामान्य विधेयक विधान परिषदेकडे मंजुरीसाठी पाठवले जाते. अशा विधेयकाला विधान परिषद मंजुरी देऊ शकते, त्यामध्ये दुरुस्त्या सुचवते किंवा त्या विधेयकाला नाकारू शकते. दुरुस्त्यासह किंवा दुरुस्त्याविना विधान परिषदेला तीन महिन्यांच्या आत ते विधेयक विधानसभेकडे पाठवावे लागते. विधान परिषदेने सुचवलेल्या दुरुस्त्या किंवा नाकारलेले विधेयक विधानसभेने दुसऱ्या वेळी मंजूर करून विधान परिषदेकडे मंजुरीसाठी पाठविल्यास एका महिन्याच्या आत विधानपरिषदेला ते विधेयक मंजूर करावे लागते, अन्यथा ते विधेयक विधान परिषदेला मंजूर आहे, असे समजून राज्यपालांकडे संमतीसाठी पाठवले जाते. थोडक्यात एखाद्या विधेयकाच्या मंजुरीसाठी विधानपरिषद जास्तीत-जास्त चार महिन्यांचा विलंब लावू शकते. यावरून स्पष्ट होते की, कायदेविषयक बाबतीत विधान परिषदेला विधानसभेच्या तुलनेत कमी अधिकार आहेत.

## २) कार्यकारीविषयक अधिकार व कार्य :-

घटकराज्याचे मंत्रिमंडळ भारतीय संविधानानुसार विधानसभेला जबाबदार असते. परंतु विधान परिषदेला जबाबदार नसल्यामुळे विधान परिषद मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त करू शकत नाही. मंत्रीमंडळावर हुकुमी नियंत्रणाचे अविश्वास प्रस्तावासारखे साधन वापरण्याचा अधिकार विधान परिषदेला नसला, तरीदेखील विधानपरिषद मंत्रिमंडळावर विविध संसदीय मार्गांचा वापर करून नियंत्रण ठेवत असते. मंत्र्यांना प्रश्न विचारणे, उपप्रश्न विचारणे, स्थगन प्रस्ताव मांडणे, सरकारने मांडलेले विधेयक फेटाळणे, सरकारवर टीका करणे, लक्षवेधी सूचना मांडणे, सभात्याग करणे, कामकाजावर बहिष्कार घालणे इत्यादी मार्गांचा वापर करून विधान परिषदेमार्फत सरकारवर नियंत्रण ठेवले जाते. विधान परिषदेच्या कार्यकारी अधिकारांवरून स्पष्ट होते की, विधानसभेच्या तुलनेत विधान परिषदेला सरकारवर नियंत्रण ठेवण्याच्या बाबतीत मर्यादित स्वरूपाचे अधिकार दिलेले आहेत.

## ३) आर्थिक अधिकार व कार्य :-

भारतीय संविधानाच्या कलम १९८ नुसार धन विधेयक सर्वप्रथम विधानसभेत मांडली जातात. विधानसभेने मंजूर केलेले विधेयक जेव्हा मंजुरीसाठी विधान परिषदेकडे पाठवले जाते, तेव्हा विधान परिषदेला १४ दिवसांचा अवधी धन विधेयक मंजूर करण्यासाठी दिला जातो. या १४ दिवसापर्यंत विधान परिषदेने कोणताही निर्णय न घेतल्यास ते विधेयक आहे त्या स्वरूपात विधान परिषदेला मंजूर आहे, असे समजले जाते. धन विधेयकाबाबत दुरुस्त्या करण्याचा किंवा सुधारणा सुचविण्याचा अधिकार विधान परिषदेला असतो, मात्र विधान परिषदेने सुचवलेल्या दुरुस्त्या

स्विकारणे किंवा नाकारणे हे पूर्णपणे विधानसभेवर अवलंबून असते. म्हणजेच धन विधेयकाबाबत केवळ शिफारसी करण्यापलीकडे कोणताही अधिकार विधान परिषदेला नसल्यामुळे विधानसभेच्या तुलनेत आर्थिक बाबतीत विधानपरिषद हे सभागृह दुर्बल आहे, हे स्पष्ट होते. अधिवेशन काळात आर्थिक बाबतीतील शासनाच्या धोरणावर व कार्यपद्धतीवर टीका करणे, प्रश्न विचारणे, चर्चेत सहभागी होणे अशाप्रकारचे नाममात्र आर्थिक अधिकार विधान परिषदेला आहेत.

- **सारांश :-**

भारतीय संघराज्यमध्ये संपूर्ण देशासाठी केंद्रीय स्तरावर एक कायदेमंडळ अर्थात संसद आहे. याच धर्तीवर प्रत्येक घटकराज्य पातळीवर राज्यविधिमंडळाची निर्मिती करण्यात आलेली आहे. घटकराज्याच्या विधिमंडळाची विधानसभा आणि विधान परिषद ही दोन सभागृहे आहेत. परंतु भारतातील काही घटकराज्याची विधिमंडळे एकगृही, तर काही घटकराज्यांची विधिमंडळे द्विगृही आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक, बिहार, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा या सहा घटकराज्यांची विधिमंडळे द्विगृही असून उर्वरित घटकराज्यांची विधिमंडळे एकगृही आहेत. विधानसभा हे घटकराज्य विधिमंडळाचे प्रथम आणि कनिष्ठ सभागृह, तर विधानपरिषद हे द्वितीय व वरिष्ठ सभागृह आहे. घटकराज्याची विधिमंडळे संसदीय कार्यप्रणालीप्रमाणे कार्य करतात.

- **आपली प्रगती तपासा.**

१) विधानसभेची रचना स्पष्ट करा.

२) विधानसभेचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

३) विधान परिषदेची रचना स्पष्ट करा.

४) विधान परिषदेचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

५) विधानसभा व विधान परिषदेच्या अधिकार व कार्य यांची तुलना सविस्तर लिहा.

## ३.२ मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ: भूमिका :

भारताने संघराज्य शासनपद्धतीचा स्विकार केलेला असल्यामुळे भारतात दुहेरी शासनव्यवस्था आहे. संपूर्ण देशासाठी एक केंद्र सरकार व देशातील प्रत्येक घटकराज्यासाठी स्वतंत्र राज्य सरकार अशी शासनव्यवस्था स्विकारण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या कलम १५२ ते १६७ मध्ये घटकराज्याच्या कार्यकारी मंडळाविषयीची तरतूद केलेली आहे. घटकराज्याच्या कार्यकारी मंडळाची रचना केंद्रीय कार्यकारी मंडळाच्या रचनेप्रमाणे असून घटकराज्याच्या कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो.

भारतीय संविधानाच्या कलम १६३ नुसार राज्यपालांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे भारतीय संविधानाच्या कलम १६४ नुसार

मुख्यमंत्र्यांची नेमणूक करण्याचा अधिकार संबंधित राज्याच्या राज्यपालांना असतो. परंतु असे असले तरी राज्यपालांचा हा अधिकार मात्र औपचारिक स्वरूपाचा असतो. कारण राज्याच्या विधानसभेमध्ये स्पष्ट बहुमत प्राप्त असणाऱ्या राजकीय पक्षाच्या सर्वमान्य नेत्याची नियुक्ती राज्यपाल मुख्यमंत्री म्हणून  करीत असतात. परंतु अपवादात्मक परिस्थितीमध्ये राज्याच्या विधानसभेत कोणत्याही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत प्राप्त नसल्यास राज्यपाल आपल्या स्वविवेकाधिन अधिकाराचा वापर करून मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करू शकतात. भारतीय संविधानाच्या कलम १६४ नुसार राज्यपालांकडून मुख्यमंत्र्यांची नेमणूक केली जाते आणि त्यांना पद व गोपनीयतेची शपथ देण्यात येते. मुख्यमंत्री म्हणून पदावर आरूढ होणारी व्यक्ती विधिमंडळाचा सदस्य असणे आवश्यक असते, परंतु शपथ घेताना मुख्यमंत्री जर विधिमंडळाचा सदस्य नसतील, तर शपथ घेतल्यापासून पुढील सहा महिन्यांच्या आत राज्यविधीमंडळाचे सदस्य होणे आवश्यक असते. उदा. श्री वसंतदादा पाटील आणि श्री उद्धव ठाकरे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेताना विधीमंडळाचे सदस्य नव्हते, परंतु पुढील सहा महिन्यांच्या आत त्यांनी राज्यविधिमंडळाचे सदस्यत्व प्राप्त केलेले होते. अलीकडील काळात पक्षातील दुफळी किंवा अन्य कारणामुळे राज्यातील मुख्यमंत्री म्हणून नेता निवडीचा निर्णय केंद्रातील वरिष्ठ नेत्यांवर सोपविल्याची अनेक उदाहरणे आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री नियुक्तीच्या संदर्भातील राजकीय संस्कृती बदलताना दिसते आहे.

मुख्यमंत्र्यांचा कार्यकाल सर्वसाधारणपणे पाच वर्षांचा असतो. तत्पूर्वी ते स्वच्छेने पदाचा राजीनामा देऊ शकतात, परंतु मुख्यमंत्र्यांच्या कार्यकाळासंदर्भात जोपर्यंत विधानसभेचा मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळावर विश्वास आहे, तोपर्यंत ते अधिकार पदावर राहतात, ही भारतीय संविधानातील तरतूद अत्यंत महत्त्वाची आहे. थोडक्यात मुख्यमंत्री यांचा कार्यकाल निश्चित नसून तो विधानसभेच्या विश्वासावर अवलंबून असतो. मुख्यमंत्री हे राज्याचे वास्तविक कार्यकारी प्रमुख असतात, कारण राज्याचा कारभार जरी राज्यपालांच्या नावाने चालविला जात असला, तरीदेखील शासनसंस्थेची खरी कार्यकारी सत्ता मुख्यमंत्र्यांच्या हाती एकवटलेली असते. त्यामुळे केंद्र सरकारमध्ये जे स्थान पंतप्रधान या पदाला असते, तेच स्थान राज्यसरकारमध्ये मुख्यमंत्री या पदाला प्राप्त झालेले आहे.

### ३.२.१ मुख्यमंत्र्यांची भूमिका (अधिकार व कार्य):-

भारतीय संसदीय लोकशाहीमध्ये घटकराज्य शासनव्यवस्थेत राज्यपाल हे नामधारी शाशनप्रमुख, तर मुख्यमंत्री हे वास्तविक शासनप्रमुख असतात. कारण राज्याचा कारभार जरी राज्यपालांच्या नावाने चावलाला जात असला, तरी राज्यपालांना मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच सर्व अधिकारांचा वापर करावा लागतो. त्यामुळे मुख्यमंत्री हेच राज्याचे वास्तविक कार्यकारी प्रमुख ठरतात. म्हणून राज्याचे वास्तविक कार्यकारी प्रमुख या नात्याने राज्याच्या शासनव्यवस्थेत पुढील अधिकार व कार्याच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांची भूमिका महत्त्वाची असते;

#### १) मंत्रिमंडळाची निर्मिती करणे :-

मंत्रिमंडळाची निर्मिती करण्यामध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण असते. कारण मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसारच राज्यपाल मंत्र्यांची नेमणूक करतात. मंत्रिमंडळाची निर्मिती करणे ही एक तारेवरची कसरत असून ही कसरत करत

असताना मुख्यमंत्र्यांना अनेक बाबींचा विचार करावा लागतो. घटकराज्यातील सर्व प्रादेशिक विभागांना तसेच घटकांना मंत्रिमंडळात स्थान कसे मिळेल अशापद्धतीने मंत्र्यांची निवड मुख्यमंत्री करीत असतात. राज्यातील प्रादेशिक विभाग, पक्षातील ज्येष्ठ, अनुभवी, ज्ञानी नेते, कुशल प्रशासक, पक्षनिष्ठा, अल्पसंख्यांक, महिला, मागासलेल्या जाती, पक्षातील विविध गट इत्यादी घटकांचा विचार करून मुख्यमंत्री मंत्रिमंडळातील मंत्र्यांची नियुक्ती करीत असतात. मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त होणार नाही, याची काळजीदेखील मुख्यमंत्र्यांना मंत्रिमंडळाची निर्मिती करताना घ्यावी लागते. थोडक्यात विविध घटकांचा विचार करून मुख्यमंत्री मंत्र्यांची निवड यादी राज्यपालांना देतात आणि राज्यपालांकडून त्या यादीला मंजुरी दिली जाते.

**२) मंत्र्यांना खातेवाटप करणे:-**

मंत्रिमंडळातील मंत्र्यांची यादी निश्चित केल्यानंतर मंत्र्यांना खातेवाटप करण्याची अवघड जबाबदारी मुख्यमंत्र्यांना पार पाडावी लागते. कोणत्या मंत्र्यांकडे कोणते व कोणत्या दर्जाचे खाते द्यायचे यासंबंधी मुख्यमंत्री निर्णय घेतात. मंत्रिमंडळातील खातेवाटप करताना त्या मंत्र्याचे पक्षातील स्थान, त्यांची योग्यता, वैयक्तिक आवड आणि त्यांचे ज्ञान इत्यादी घटकांचा विचार मुख्यमंत्री करीत असतात. थोडक्यात मंत्रिमंडळातील खात्यात फेरबदल करणे,  अकार्यक्षम मंत्र्यांना समज देणे किंवा वेळप्रसंगी अकार्यक्षम मंत्र्याची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याचा अधिकार मुख्यमंत्र्यांना असतो.

**३) मंत्रिमंडळाचा प्रमुख किंवा नेता:-**

मुख्यमंत्री हे मंत्रिमंडळाचे प्रमुख असल्यामुळे मंत्रिमंडळाची बैठक केव्हा बोलवावी, बैठकीत कोणते विषय चर्चेला घ्यावेत यासंबंधीचे निर्णय मुख्यमंत्री घेतात. मंत्रिमंडळाची बैठक बोलावणे, मंत्रिमंडळाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्विकारणे, मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंत्र्यांना मार्गदर्शन करणे इ. मध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका अनन्यसाधारण असते.

**४) मंत्रिमंडळावर नियंत्रण ठेवणे:-**

मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी मुख्यमंत्री पार पाडीत असतात. मंत्र्यांकडे खातेवाटप केल्यानंतर संबंधित मंत्री त्या खात्याची जबाबदारी सक्षमपणे पार पाडतो का ? याचा आढावा मुख्यमंत्री घेत असतात. जर एखादा मंत्री त्या खात्याला पूर्णपणे न्याय देऊ शकत नसेल, तर अशावेळी मुख्यमंत्री त्या मंत्र्यांकडून हे खाते काढून घेऊ शकतात किंवा एखादा मंत्री राज्यशासनाच्या धोरणाप्रमाणे वर्तन करत नसेल, तर अशा मंत्र्यांना मंत्रिमंडळातून वगळण्याची मुख्यमंत्री राज्यपालांकडे शिफारस करू शकतात.

**५) मंत्रीमंडळाच्या कार्यात समन्वय निर्माण करणे:-**

मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणून मंत्रिमंडळाच्या कार्यात समन्वय निर्माण करण्याची मुख्य जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते. एका विभागाचे धोरण मंत्रिमंडळातील दुसऱ्या विभागावर प्रभाव पाडणारे असते, त्यामुळे वेगवेगळ्या विभागात समन्वय प्रस्थापित करण्याचे कार्य मुख्यमंत्र्यांना करावे लागते. मंत्रिमंडळातील दोन खात्यात किंवा मंत्र्यांमध्ये संघर्ष निर्माण झाल्यास मुख्यमंत्र्यांना त्यामध्ये मध्यस्थी करावी लागते. राज्य सरकारच्या प्रशासकीय कार्यात सुसूत्रता आणि एकजिनसीपणा निर्माण करण्यासाठी मंत्रिमंडळात समन्वय निर्माण करण्याची महत्त्वाची भूमिका मुख्यमंत्री पार पाडीत असतात. मंत्रिमंडळातील मंत्र्यांमध्ये धोरणाच्या बाबतीत वैयक्तिक मतभेद असतात. अशा मतभेदांमुळे मंत्रिमंडळातील एकवाक्यता समाप्त होऊन शासन अडचणीत येऊ शकते, म्हणून असे होऊ नये यासाठी मुख्यमंत्री मंत्रिमंडळात समन्वय निर्माण करत असताना सर्व मंत्र्यांना सूचना तसेच आदेश देत असतात.

**६) राज्यपाल, मंत्रिमंडळ व विधिमंडळ यांच्यातील दुवा:-**

मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांची माहिती मुख्यमंत्री राज्यपाल यांना देत असतात, त्याचप्रमाणे राज्यपालांच्या सूचना, सल्ला किंवा आदेश मंत्रिमंडळापर्यंत पोहोचविण्याचे कार्य मुख्यमंत्री राज्यपाल व मंत्रिमंडळ यांच्यातील मध्यस्थ म्हणून करीत असतात. तसेच मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांना विधानसभेची मंजुरी मिळवून घेण्याचे कार्य मुख्यमंत्र्यांना करावे लागते. संबंधित निर्णय किंवा विधेयकाच्या संदर्भात विधिमंडळात विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देणे, एखादा मंत्री विचारलेल्या प्रश्नाला समाधानकारकपणे उत्तर देऊ शकत नसल्यास चर्चेत हस्तक्षेप करणे, मंत्रिमंडळाचा प्रमुख म्हणून पूरक माहिती देणे इत्यादी कार्य विधिमंडळ व मंत्रिमंडळ यांच्यातील मध्यस्थ म्हणून मुख्यमंत्री करीत असतात.

**७) महत्त्वाच्या नेमणुका करणे:-**

राज्यातील विविध उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्याचा अधिकार राज्यपालांना असला, तरीही अशा उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या नेमणुका करताना राज्यपाल मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने किंवा शिफारशीने या नियुक्त्या करतात. अशा नियुक्त्यामध्ये विविध आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, विद्यापीठांचे कुलगुरु, विधानपरिषदेतील १२ सदस्य, विधानसभेत अँग्लो-इंडियन जमातीमधून नियुक्त करावयाचा एक सदस्य नियुक्त करण्याचा अधिकार राज्यपालाना होता. परंतु २०२० मध्ये १०४ व्या घटनादुरुस्ती नुसार राज्य विधानसभेतील ॲग्लो-इंडियनचे हे विशेष प्रतिनिधित्व समाप्त करण्यात आलेले आहे. राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्याचा महाधिवक्ता इत्यादींचा समावेश होतो.

**८) केंद्र सरकारशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करणे:-**

घटकराज्यात ज्या राजकीय पक्षाचे मुख्यमंत्री असतील, त्याच राजकीय पक्षाचे सरकार केंद्रामध्ये असल्यास केंद्र सरकारशी संबंधित राज्य सरकारचे संबंध चांगले असतात, परंतु केंद्र स्तरावर विरोधी पक्षाचे सरकार असेल, तर अशावेळी

घटकराज्यात वेळोवेळी केंद्र सरकारचा हस्तक्षेप, विधानसभा बरखास्त करण्याची टांगती तलवार, राष्ट्रपती राजवट लागू करण्याची शक्यता असते, म्हणून अशाप्रसंगी केंद्र शासनाशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करताना मुख्यमंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागते. म्हणून अशाप्रसंगी मुख्यमंत्र्यांची भूमिका पणाला लागते. उदा. विद्यमान स्थितीत केंद्र सरकार आणि पश्चिम बंगाल राज्य सरकार, केंद्र सरकार आणि महाराष्ट्र राज्य सरकार, केंद्र सरकार आणि राजस्थान राज्य सरकार, केंद्र सरकार आणि केरळ राज्य सरकार यांच्यामध्ये विजातीय सत्ताधारी राजकीय पक्षामुळे वितुष्ट निर्माण झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणून अशावेळी केंद्र शासनाशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करताना मुख्यमंत्र्यांना तारेवरची कसरत करावी लागते.

**९) मंत्र्यांना मार्गदर्शन करणे:-**

मुख्यमंत्री हे मंत्रिमंडळाचे प्रमुख असतात. मंत्रिमंडळाचे प्रमुख या नात्याने मंत्रिमंडळातील मंत्र्यांना मार्गदर्शन करणे, सूचना देणे तसेच आवश्यक तेथे मंत्र्यांना सहकार्य करण्यात मुख्यमंत्र्यांना महत्त्वाची भूमिका बजावावी लागते. प्रत्येक मंत्र्याने आपल्या खात्याचा कारभार कशाप्रकारे करावा, यासंबंधीच्या सूचना व मार्गदर्शन मुख्यमंत्री करीत असतात.

**१०) शासनाचे धोरण ठरवणे व त्याची अंमलबजावणी करणे:-**

घटकराज्याचा वास्तविक कार्यकारी प्रमुख म्हणून राज्यशासनाचे ध्येयधोरण निश्चित करण्यामध्ये मुख्यमंत्र्यांची महत्त्वाची भूमिका असते. राज्यातील नागरिकांचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सर्वांगीण विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने सर्वसमावेशक असणारे धोरण मंत्रीमंडळाच्या मदतीने निर्माण करण्यामध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका अनन्यसाधारण असते. राज्यातील विविध प्रादेशिक विभागाचे प्रादेशिक मागासलेपण दूर करणारे धोरण मुख्यमंत्र्यांना ठरवावे लागते.

**११) विधानसभेचा नेता:-**

विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षाचा नेता म्हणून मुख्यमंत्र्यांकडे पाहिले जाते. त्यामुळे विधानसभेचे अधिवेशन कधी घ्यायचे, अधिवेशनाचा कालावधी किती ठेवायचा या संदर्भामध्ये विधानसभेचे सभापती आणि संसदीय कामकाज मंत्री यांच्या सल्ल्याने निर्णय घेऊन त्याला राज्यपालांची संमती घेण्याचे कार्य मुख्यमंत्री करीत असतात. विधानसभेचा नेता म्हणून मंत्रिमंडळाने ठरवलेल्या धोरणाला कायद्याचे स्वरूप प्राप्त करून देण्यामध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. त्याचप्रमाणे विधानसभेचा नेता म्हणून विधानसभेत शासकीय धोरणाचा पाठपुरावा करण्यातही मुख्यमंत्री महत्त्वाची भूमिका पार पाडतात. विधानसभा विसर्जित करण्याच्या संदर्भात राज्यपालांना सल्ला देण्याचे कार्य उचित प्रसंगी मुख्यमंत्री करीत असतात. शासनाच्या ध्येयधोरणासंदर्भात विधानसभेत महत्त्वपूर्ण घोषणा करण्याचे कार्य मुख्यमंत्री करतात. विधानसभेचा नेता या नात्याने विधानसभेत मंत्रीमंडळाचे नेतृत्व करण्याचे कार्य मुख्यमंत्री करीत असतात.

**१२) जनता व राज्याचा नेता:-**

मुख्यमंत्री हे जनतेने निवडून दिलेल्या विधानसभेतील बहुमत प्राप्त पक्षाचा नेता असतात. म्हणजेच मुख्यमंत्री हे खऱ्या अर्थाने जनतेचे नेते असतात. त्यामुळे जनतेच्या इच्छा-आकांक्षा, प्रश्न लक्षात घेऊन जनहित साध्य करण्याचे कार्य मुख्यमंत्र्यांना करावे लागते. सत्ताधारी पक्षाने निवडणूक लढविताना जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात मुख्यमंत्र्यांची भूमिका महत्त्वाची ठरते. राज्याचा नेता या नात्याने राष्ट्रीय स्तरावरील विविध सभा, संमेलने व परिषदांमध्ये राज्याचे प्रतिनिधित्व करणे, राज्याचा प्रतिनिधी म्हणून विविध देशांना भेटी देणे, विविध राष्ट्राशी वेगवेगळ्या विषयांवर करार करणे इत्यादीमध्ये मुख्यमंत्र्यांची भूमिका निर्णायक असते.

**१३) सत्ताधारी पक्षाचा नेता:-**

मुख्यमंत्री हे सत्ताधारी पक्षाचे नेते असतात. निवडणुकीमधील यशापयश आणि राजकीय पक्षाची लोकप्रियता मुख्यमंत्र्यांनी स्विकारलेल्या धोरणावर अवलंबून असते. सत्ताधारी राजकीय पक्षाच्या धोरणाला अनुसरून राज्यकारभार करण्याची जबाबदारी मुख्यमंत्र्यांची असते. मुख्यमंत्री सत्ताधारी राजकीय पक्षाच्या विचारसरणीला आणि ध्येय धोरणाला बांधील असल्यामुळे राज्य शासनाच्या निर्णयात त्याचे प्रतिबिंब उमटताना दिसते.

**१४) राज्यपालांना माहिती देणे:-**

राज्यपाल हे राज्याचे घटनात्मक प्रमुख असतात. म्हणून राज्याच्या राज्यकारभाराविषयी मागितलेली माहिती राज्यपालांना देण्याचे कार्य मुख्यमंत्री करीत असतात. राज्यपालांनी मागितलेली माहिती वेळेत राज्यपालांकडे पोहोचविणे हे मुख्यमंत्र्यांचे कर्तव्य असते.

**१५) राज्यशासनावरील विश्वास कायम ठेवणे:-**

मुख्यमंत्री व मंत्रिमंडळावर विधानसभेचा विश्वास असेपर्यंत ते अधिकार पदावर असतात, म्हणून हा विश्वास अधिकाधिक काळ कायम कसा राहील, यासाठी मुख्यमंत्री प्रयत्नरत असतात. यासाठी स्वपक्षीय सभासदांच्या विधानसभेतील उपस्थितीवर नियंत्रण ठेवण्याचे कार्य मुख्यमंत्री करतात. विधानसभेच्या विश्वासाबरोबरच जनतेचादेखील सरकारवरील विश्वास कायम ठेवण्याची प्रमुख जबाबदारी मुख्यमंत्र्यांना पार पाडावी लागते.

अशाप्रकारे राज्याच्या कार्यकारी मंडळात मुख्यमंत्री यांना प्राप्त असणाऱ्या अधिकार व कार्यामुळे अत्यंत महत्वाची भूमिका ते पार पाडीत असतात. म्हणूनच मुख्यमंत्र्यांचे स्थान राज्याच्या कार्यकारी मंडळामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. मुख्यमंत्री हे कार्यकारी मंडळातील वास्तविक शासनप्रमुख असतात. म्हणूनच त्यांचा उल्लेख 'मंत्रिमंडळ रूपी कमानीची आधारशिला' किंवा 'मंत्रिमंडळ रूपी ग्रहमालेतील सूर्य' अथवा 'तारांगणातील चंद्र' म्हणून केली जाते.

### ३.२.२ मंत्रिमंडळाची भूमिका (अधिकार व कार्य):-

भारतीय संविधानाच्या कलम १६३ मध्ये राज्यपालांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली एक मंत्रिमंडळ असेल, अशी तरतूद केलेली आहे. कलम १६४ नुसार मुख्यमंत्र्यांची राज्यपालांकडून नेमणूक झाल्यानंतर मुख्यमंत्री यांच्या सल्ल्याने मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांची राज्यपाल नेमणूक करतात. मंत्रिमंडळातील नियुक्त झालेल्या मंत्र्यांना राज्यपालांकडून पद व गोपनीयतेची शपथ दिली जाते. मंत्रिमंडळातील खातेवाटप करणे आणि मंत्रिमंडळात कोणाला समाविष्ट करायचे याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री अंतिमतः घेतात. मंत्रिमंडळाचा सदस्य हा विधिमंडळाचा सदस्य असणे आवश्यक असते, परंतु शपथ घेतेवेळी जर एखादा मंत्री विधिमंडळाचा सदस्य नसेल, तर शपथ घेतल्यापासून पुढील सहा महिन्यांच्या आत विधिमंडळाचा सदस्य होणे आवश्यक असते, अन्यथा मंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागतो. मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या संख्येबाबत २००३ मध्ये झालेल्या ९१ व्या घटनादुरुस्तीनुसार मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या ही विधानसभेच्या एकूण सदस्यसंख्येच्या १५ टक्के पेक्षा अधिक नसावी, अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या वाढत्या आकाराला आळा बसलेला आहे. राज्य मंत्रीमंडळामध्ये मंत्र्यांचा समावेश करताना प्रादेशिकता आणि समाजातील विविध घटकांचा विचार करतात.

मंत्रिमंडळाचा किंवा मंत्री यांचा कार्यकाल हा सर्वसाधारणपणे विधानसभेचा कार्यकाळाएवढाच म्हणजेच पाच वर्षांचा असतो. परंतु जोपर्यंत मंत्रिमंडळावर विधानसभेचा विश्वास आहे, तोपर्यंत मंत्रीमंडळ अधिकार पदावर असते. विधानसभेचा विश्वास गमावताच मंत्रिमंडळाचा कार्यकाल समाप्त होतो. थोडक्यात मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ हे सामूहिकरित्या विधानसभेला जबाबदार असते. मंत्रिमंडळामध्ये कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री आणि उपमंत्री हे तीन प्रकारचे मंत्री असतात. मंत्रीमंडळाचे कार्य सामुहिक जबाबदारी, गोपनीयता, एकजिनसीपणा आणि मुख्यमंत्र्यांचे एकमुखी नेतृत्व या तत्त्वानुसार चालते. मंत्रिमंडळ हे मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करीत असते. राज्याच्या कार्यकारी मंडळात मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली वास्तविक शासनप्रमुख म्हणून मंत्रिमंडळ महत्त्वाची भूमिका बजावत असते. म्हणून मंत्रिमंडळाला काही महत्त्वाचे अधिकार प्राप्त झालेले आहेत, त्या अधिकारानुसार मंत्रिमंडळ पुढीलप्रमाणे आपली भूमिका बजावत असते;

#### १) शासनाचे ध्येयधोरण ठरवणे:-

शासनाचे ध्येयधोरण निश्चित करणे, ही मंत्रिमंडळाची सामूहिक जबाबदारी असते. राज्य सरकारचे धोरण निश्चित करणारी मंत्रिमंडळ ही सर्वोच्च संस्था असते. राज्यातील बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक परिस्थितीचा विचार करुन मंत्रिमंडळ शासकीय ध्येयधोरणाची आखणी करते. निवडणुकीच्या वेळी सत्ताधारी झालेल्या राजकीय पक्षाने जनतेला दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी सत्ताधारी पक्षाच्या मंत्रिमंडळाला आश्वासनाचे रुपांतर शासकीय धोरणात करावे लागते. मंत्रिमंडळातील प्रत्येक खात्याचा मंत्री आपल्या खात्यासंबंधीचे धोरण तयार करून ते मंत्रिमंडळाच्या बैठकीत सादर करतो. त्यानंतर विधिमंडळाकडून त्या खात्याच्या धोरणाला मान्यता मिळवून घेण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते.

थोडक्यात राज्याच्या विविध विभागाचे मूलभूत धोरण निर्माण करण्याचे कार्य मंत्रिमंडळाकडून केले जाते.

**२) ध्येयधोरणांची अंमलबजावणी करणे:-**

केवळ धोरणनिश्चितीपुरतेच मंत्रिमंडळाचे कार्य मर्यादित नसून निश्चित केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यात मंत्रिमंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. मंत्रिमंडळातील प्रत्येक खात्याच्या धोरणाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर प्रत्यक्षपणे या धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात होते. मंत्रिमंडळाने दिलेल्या निर्देशानुसार प्रत्येक मंत्र्याला धोरणाची अंमलबजावणी करावी लागते. विविध सनदी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मदतीने धोरणांची प्रत्यक्षात अंमलबजावणी केली जाते. अशा सनदी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे तसेच त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य मंत्रिमंडळ करीत असते. ध्येयधोरणाच्या अंमलबजावणीवरच मंत्रिमंडळाचे यशापयश अवलंबून असते.

**३) कायदेविषयक अधिकार व कार्य:-**

मंत्रिमंडळाने निश्चित केलेल्या ध्येयधोरणांचा कायदेशीर दर्जा प्राप्त करून देण्यासाठी मंत्रिमंडळ विधेयक तयार करून त्या विधेयकाला राज्यविधिमंडळाची मान्यता मिळवित असते. त्यामुळे मंत्रिमंडळाला बरीचशी कायदेविषयक कार्य करावी लागतात. संसदीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळ आणि कार्यकारी मंडळ यांच्यात सुयोग्य समन्वय असतो. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन बोलावणे, अधिवेशन तहकूब करणे, विधानसभेचे मुदतपूर्व विसर्जन करणे हे कार्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यपाल करीत असतात. त्याचप्रमाणे विधिमंडळात मांडली जाणारी बहुसंख्य विधेयके ही मंत्र्यांकडून मांडली जातात. संसदीय शासनपद्धतीत मंत्र्यांचा जास्तीत-जास्त काळ हा विधिमंडळात खर्च होत असतो.

**४) आर्थिक अधिकार व कार्य:-**

घटकराज्याची संपूर्ण आर्थिक सत्ता ही मंत्रिमंडळाच्या हाती एकवटलेली असते. कारण राज्यपालांना प्राप्त असणाऱ्या आर्थिक अधिकारांचा वापर प्रत्यक्षपणे मंत्रिमंडळ करीत असते. राज्यपालांच्या सूचनेनुसार अर्थमंत्री अंदाजपत्रक तयार करीत असतात. मंत्रिमंडळाच्या बैठकीत अंदाजपत्रकावर चर्चा झाल्यानंतर विधिमंडळाच्या मान्यतेसाठी अंदाजपत्रक विधिमंडळात मांडले जाते. विधिमंडळाच्या मान्यतेनंतरच मंत्रिमंडळाला प्रशासकीय खर्च करता येतो. नवीन कराची आकारणी करणे, कर रद्द करणे, कर्ज घेणे इत्यादी बाबतचे अंतिम निर्णय मंत्रिमंडळात घेतले जातात. सर्व अर्थविधेयक ही मंत्रिमंडळाच्या सदस्यांकडूनच मांडली जातात. थोडक्यात राज्याच्या अर्थकारणाला योग्य दिशा आणि दृष्टिकोन देण्याचे कार्य मंत्रिमंडळ आपल्या भूमिकेतून करीत असते.

**५) नेमणूकविषयक अधिकार व कार्य:-**

राज्यातील विविध उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या नेमणुकीचा अधिकार राज्यपालांना असला तरीदेखील या नेमणुका करताना राज्यपाल मंत्रिमंडळाच्या सल्याने किंवा शिफारशीनेच करीत असतात. राज्य निवडणूक आयुक्त, राज्य माहिती आयुक्त, राज्य मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य, राज्याचा महाधिवक्ता, विविध विद्यापीठाचे कुलगुरू, उच्चपदस्थ सरकारी अधिकारी इत्यादीची नियुक्ती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने किंवा शिफारशीने राज्यपाल करीत असतात.

**६) प्रशासनावर नियंत्रण ठेवणे:-**

मंत्रिमंडळ हे राज्याच्या वास्तविक कार्यकारी मंडळाचा एक महत्त्वाचा घटक आहे. मंत्रिमंडळाच्या विविध विभागात मंत्र्यांच्या अधिनस्त वरिष्ठ सनदी अधिकारी आणि सरकारी कर्मचारी कार्यरत असतात. प्रशासनातील हे सर्व अधिकारी मंत्र्यांच्या आदेशानुसार कार्य करीत असतात. मंत्रालयाच्या प्रशासनावर संतुलितपने नियंत्रण ठेवण्यात महत्त्वाची भूमिका मंत्रिमंडळाकडून पार पाडली जाते.

**७) विविध विभागात समन्वय निर्माण करणे:-**

मंत्रिमंडळात विविध विभाग असतात. मंत्रिमंडळातील विविध विभागांमध्ये समन्वय साधण्याची आवश्यकता असते. कारण समन्वयाशिवाय शासनाचे कोणतेही कार्य प्रभावीपणे होऊ शकत नाही, म्हणून विविध खात्यांच्या धोरणात समन्वय साधण्याचे कार्य मंत्रीमंडळाकडून केले जाते. याशिवाय मंत्रिमंडळाच्या कार्याचे विकेंद्रीकरण केल्यामुळे एका खात्याचे कार्य दुसऱ्या खात्याला घातक ठरू नये, याची दक्षता घेऊन दोन खात्यांच्या कार्यात समन्वय प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रिमंडळाकडून केले जाते. मंत्रिमंडळातील विविध खात्यांमध्ये समन्वय निर्माण झाल्यामुळे प्रशासनाचा वेळ आणि पैसा वाचतो. त्याचबरोबर कार्याची पुनरावृत्ती होत नाही. कार्यातील चुका लक्षात येतात आणि निर्माण झालेल्या मतभेदांचे वेळीच निराकरण करता येते. थोडक्यात मंत्रिमंडळामध्ये विविध विभागांच्या परस्पर सल्ला व मार्गदर्शनाने प्रशासकीय कामकाज चालत असते. त्यासाठी मंत्रिमंडळातील विविध खात्यात व विभागात समन्वय असणे आवश्यक असते आणि असा समन्वय मंत्रिमंडळाकडून निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली जाते.

**८) मार्गदर्शनपर कार्य:-**

शासनाच्या विविध विभागांना मार्गदर्शन करणे, राज्यपालांनी मागितल्यास सल्ला देणे, राज्यपालांनी मागितलेली माहिती देणे इत्यादी मार्गदर्शनपर कार्य मंत्रिमंडळाकडून केले जाते.

**९) राज्यात कायदा व सुव्यवस्था राखणे:-**

राज्यात कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची प्रमुख जबाबदारी मंत्रिमंडळाची असते. त्यासाठी मंत्रीमंडळामार्फत विविध उपाययोजना केल्या जातात. राज्यात

जातीय, धार्मिक, भाषिक, वांशिक संघर्ष निर्माण झाल्यास असे संघर्ष मिटवून राज्यात शांतता प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रिमंडळाकडून केले जाते.

अशाप्रकारे मंत्रिमंडळाला प्राप्त असणाऱ्या वरील अधिकारामार्फत मंत्रिमंडळाकडून विविध कार्य केली जातात आणि त्याद्वारे राज्याच्या शासनव्यवस्थेत अत्यंत महत्त्वाची भूमिका मंत्रिमंडळाकडून बजावली जाते.

- **सारांश:-**

राज्याच्या शासनव्यवस्थेत कायदेविषयक, कार्यकारी व आर्थिक स्वरूपाची व्यापक सत्ता मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या हाती केंद्रित झालेली आहे. कारण मुख्यमंत्री व त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणारे मंत्रिमंडळ हेच राज्याच्या कार्यकारी मंडळातील वास्तविक शासनप्रमुख असतात. राज्यपालांच्या नावाने संपूर्ण राज्याचा राज्यकारभार चालवला जात असला, तरी वास्तवात राज्यपालांच्या अधिकारांचा वापर प्रत्यक्षपणे मुख्यमंत्री आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणारे मंत्रीमंडळ करीत असते. वास्तविक कार्यकारी प्रमुख म्हणून मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ जनतेच्या इच्छा-आकांक्षा विचारात घेऊन त्यांच्या समस्या व प्रश्नांना वाचा फोडून जनतेचे नेतृत्व करीत असते. संसदीय परंपरेनुसार राज्याच्या कार्यकारी मंडळात मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे.

- **आपली प्रगती तपासा.**

१) मुख्यमंत्र्यांचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

२) राज्याच्या शासनव्यवस्थेतील मुख्यमंत्र्यांची भूमिका स्पष्ट करा.

३) मंत्रीमंडळाचे अधिकार व कार्य सविस्तर लिहा.

४) राज्याच्या शासनव्यवस्थेतील मंत्रिमंडळाची भूमिका स्पष्ट करा.

५) राज्याच्या कार्यकारी मंडळातील मुख्यमंत्री व मंत्रिमंडळ हे वास्तविक शासनप्रमुख आहेत, सविस्तर स्पष्ट करा.

## ३.३ उच्च न्यायालय आणि दुय्यम न्यायालये:-

### ३.३.१ उच्च न्यायालय:-

भारताने संघराज्य शासनव्यवस्थेचा स्विकार केलेला असल्यामुळे भारताने एकेरी न्यायव्यवस्था स्विकारलेली आहे. म्हणून भारतीय न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी सर्वोच्च न्यायालय आहे. त्याखालोखाल घटकराज्य पातळीवर कार्य करणारी उच्च न्यायालये कार्यरत आहेत. भारतीय संविधानाच्या सहाव्या भागात प्रकरण पाचमध्ये कलम २१४ ते २३१ मध्ये उच्च न्यायालयासंबंधीच्या तरतुदी केलेल्या आहेत. कलम २१४ नुसार घटकराज्य पातळीवर उच्च न्यायालयाची स्थापना केली जाते. भारतीय संसदेने १९५६ मध्ये केलेल्या घटनादुरुस्तीनुसार दोन किंवा दोनपेक्षा अधिक घटकराज्यासाठी

तसेच दोन किंवा दोनपेक्षा अधिक केंद्रशासित प्रदेशासाठी एक सामूहिक उच्च न्यायालय स्थापन करण्याचा अधिकार कायद्याद्वारे संसदेला देण्यात आलेला आहे. उदा. महाराष्ट्र व गोवा या दोन घटकराज्यासाठी तसेच दिव-दमन, दादरा व नगरहवेली या केंद्रशासित प्रदेशासाठी मुंबई उच्च न्यायालय निर्माण करण्यात आलेले आहे. उच्च न्यायालयातील कामाचा व्याप, राज्याचे क्षेत्रफळ आणि लोकसंख्या इत्यादी घटक विचारात घेऊन उच्च न्यायालयाची खंडपीठे निर्माण करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे. मुंबई उच्च न्यायालयाची औरंगाबाद, नागपूर आणि पणजी येथे खंडपीठ निर्माण केलेली आहेत. भारतात सध्या २५ उच्च न्यायालये कार्यरत आहेत. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या कमी-जास्त करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे.

### ३.३.१.१ उच्च न्यायालयाची रचना:-

भारतीय संविधानाच्या सहाव्या भागात प्रकरण पाचमध्ये कलम २१४ ते २३१ मध्ये घटकराज्य स्तरावरील उच्च न्यायालयासंबंधीच्या तरतुदी केलेल्या आहेत. या तरतुदीवरून भारतातील उच्च न्यायालयाची रचना पुढीलप्रमाणे स्पष्ट होते;

- **न्यायाधीशांची पात्रता:-**

भारतीय संविधानाच्या कलम २१७ नुसार उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदासाठी पुढील पात्रता निश्चित केलेल्या आहेत;

१) ती व्यक्ती भारतीय नागरिक असावी.

२) भारतातील कोणत्याही न्यायालयात किमान दहा वर्ष न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे.

किंवा

भारतातील कोणत्याही उच्च न्यायालयात किमान दहा वर्ष वकिली व्यवसायाचा अनुभव असावा.

किंवा

राष्ट्रपतींच्या मते, ती व्यक्ती निष्णात कायदेपंडित असावी.

- **न्यायाधीशांची नेमणूक:-**

उच्च न्यायालयामध्ये मुख्य न्यायाधीशांची नेमणूक करताना राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि संबंधित घटकराज्याचे राज्यपाल यांचा सल्ला विचारात घेतात. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयातील इतर न्यायाधीशांची नियुक्ती करताना राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, संबंधित राज्याचे राज्यपाल व संबंधित राज्याच्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीश यांचा सल्ला विचारात घेतात. अर्थात उच्च न्यायालयातील या नेमणुका कॉलेजियम पद्धतीनुसार म्हणजेच सर्वोच्च न्यायालयाच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आलेल्या चार न्यायाधीशांनी केलेल्या समितीच्या शिफारसीनुसार राष्ट्रपती करीत असतात.

- **न्यायाधीशांची संख्या:-**

भारतीय संविधानाच्या कलम २१६ मध्ये उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या संख्येविषयी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्येक उच्च न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि राष्ट्रपती ठरवतील तितके इतर न्यायाधीश असतात. साधारणपणे राज्याचे क्षेत्रफळ, लोकसंख्या आणि न्यायालयीन कामाचा व्याप इत्यादी घटकांचा विचार करून राष्ट्रपती इतर न्यायाधीशांची संख्या ठरवतात. त्यामुळे भारतातील विविध उच्च न्यायालयात न्यायाधीशांची संख्या वेगवेगळी आहे. भारतीय संविधानाच्या कलम २२४ नुसार उच्च न्यायालयात भारताचे राष्ट्रपती अतिरिक्त न्यायाधीश किंवा हंगामी न्यायाधीशांची तात्पुरत्या काळासाठी नेमणूक करू शकतात. परंतु अशा अतिरिक्त किंवा हंगामी न्यायाधीशांचा कार्यकाळ दोन वर्षापेक्षा जास्त नसतो. भारतीय संविधानाच्या कलम २२२ नुसार भारताचे राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांशी चर्चा करून एका उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची बदली दुसऱ्या उच्च न्यायालयात करू शकतात.

- **न्यायाधीशांचा शपथविधी:-**

भारतीय संविधानातील कलम २१९ नुसार उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाल्यानंतर न्यायाधीशांना पदभार स्विकारण्यापूर्वी राज्यपालांकडून किंवा राज्यपालांनी नियुक्त केलेल्या व्यक्तीकडून भारतीय संविधानाच्या तिसऱ्या परिशिष्टात सांगितलेली शपथ घ्यावी लागते. प्रामाणिकपणा व कर्तव्याची जाण, तसेच भारतीय संविधान आणि कायदा यांच्या श्रेष्ठत्वावर विश्वास ठेवून राज्यघटनेशी एकनिष्ठ राहण्याची शपथ न्यायाधीश घेत असतात.

- **न्यायाधीशांचा कार्यकाळ:-**

उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्यापासून वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत उच्च न्यायालयातील न्यायाधीश अधिकार पदावर राहू शकतात. मूळ भारतीय संविधानात उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष निश्चित केले होते, परंतु १९६३ मध्ये करण्यात आलेल्या १५ व्या घटनादुरुस्तीनुसार उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या सेवानिवृत्तीचे वय ६२ वर्ष करण्यात आलेले आहे. वयाची ६२ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी उच्च न्यायालयातील न्यायाधीश स्वेच्छेने पदाचा राजीनामा देऊ शकतात.

- **न्यायाधीशांची बडतर्फी:-**

उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना योग्य कारणास्तव पदावरून बडतर्फ करण्याचा अधिकार संसदेला देण्यात आलेला आहे. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी घटनाभंग केला असल्यास किंवा त्यांचे गैरवर्तन, भ्रष्टाचार किंवा अकार्यक्षमता सिद्ध झाल्यास महाभियोगाच्या प्रक्रियेनुसार उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना बडतर्फ करण्याची तरतूद भारतीय संविधानाच्या कलम १२४ मध्ये करण्यात आलेली आहे. महाभियोगाच्या प्रस्तावावर संसदेच्या दोन्ही सभागृहात एकूण सदस्यसंख्येच्या व

सभागृहात उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यांपैकी २/३ बहुमताने न्यायाधिशांवरील आरोप सिद्ध झाल्यास न्यायाधीशांना बडतर्फ करण्यात येते. न्यायाधीशांना बडतर्फ करण्यापूर्वी संसदेत न्यायाधीशांची बाजू ऐकून घेतली जाते, त्यानंतरच बडतर्फीसंदर्भात बहुमताने निर्णय घेण्यात येतो. भारतात आजपर्यंत कोणतेही न्यायाधीश महाभिगायोगाच्या प्रक्रियेनुसार बडतर्फ झालेले नाहीत. १९९१ मध्ये न्यायाधीश व्ही. राधास्वामी यांच्याविरोधात महाभियोगाचा प्रस्ताव आणण्यात आलेला होता, मात्र बहुमत प्राप्त न झाल्यामुळे तो रद्द झाला. तसेच २००९ मध्ये कलकत्ता उच्च न्यायालयाचे न्यायाधीश सौमित्र सेन यांच्या विरोधात, तसेच सिक्कीम उच्च न्यायालयाचे न्यायाधीश पी. डी. दिवाकरण यांच्याविरोधातही महाभियोगाचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. परंतु या प्रस्तावाची प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच सौमित्र सेन आणि पी.डी. दिवाकरण यांनी पदाचे राजीनामे दिल्यामुळे पुढील प्रक्रिया करण्याची वेळ आलीच नाही.

- **न्यायाधिशांवरील मर्यादा:-**

भारतीय संविधानाच्या कलम २२० नुसार सेवानिवृत्त झालेल्या उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना सेवानिवृत्तीनंतर खाजगी वकिली करण्यास बंदी घालण्यात आलेली होती. परंतु १९५६ मध्ये करण्यात आलेल्या ७ व्या घटनादुरुस्तीनुसार न्यायाधीशांवरील ही मर्यादा काहीशी सैल करण्यात आलेली आहे. त्यानुसार ज्या उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केले असेल ते उच्च न्यायालय वगळता देशातील इतर कोणत्याही उच्च न्यायालयात वकिली करण्यास सेवानिवृत्तीनंतर परवानगी देण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त झालेले न्यायाधीश सर्वोच्च न्यायालयात वकिली व्यवसाय किंवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम करू शकतात. याशिवाय शासनाने कोणत्याही चौकशी आयोगाच्या माध्यमातून सोपवलेली विशेष कार्य न्यायाधीशांना करता येतात.

### ३.३.१.२ उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र:-

उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मर्यादित असते. ज्या घटकराज्यासाठी उच्च न्यायालय स्थापन करण्यात आलेले आहे, त्या घटकराज्यापुरते सर्वसाधारणपणे उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र मर्यादित असते. भारतीय संविधानानुसार उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र पूढीलप्रमाणे आहे;

**१) प्रादेशिक अधिकारक्षेत्र :-**

जेव्हा एखादे उच्च न्यायालय ज्या विशिष्ट प्रादेशिक क्षेत्रासाठी विस्तारलेले असते, त्याला त्या उच्च न्यायालयाचे प्रादेशिक अधिकारक्षेत्र असे म्हणतात. उच्च न्यायालयाचे प्रादेशिक अधिकारक्षेत्र हे मर्यादित असते. ज्या घटकराज्यासाठी उच्च न्यायालय स्थापन करण्यात आलेले असते, त्या घटकराज्याच्या कार्यक्षेत्रातीला खटल्यांचा निर्णय देण्याचे मर्यादित कार्य उच्च न्यायालय करते. थोडक्यात ज्या विशिष्ट भौगोलिक व प्रादेशिक क्षेत्रासाठी उच्च न्यायालय निर्माण करण्यात आलेले असते, त्याच राज्यातील खटले उच्च न्यायालयात दाखल करता येतात. परंतु उच्च

न्यायालयाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात बदल करण्याचा किंवा त्या अधिकारक्षेत्राचा विस्तार करण्याचा अधिकार संसदेला आहे. संसद कायदा करून उच्च न्यायालयाचे प्रादेशिक अधिकारक्षेत्र वाढवू शकते.

## २) प्रारंभिक अधिकारक्षेत्र:-

ज्या खटल्यांचा प्रारंभ अर्थात सुरुवात कनिष्ठ न्यायालयात न होता उच्च न्यायालयातच होत असते, त्याला उच्च न्यायालयाचे प्रारंभिक अधिकारक्षेत्र असे म्हणतात. उच्च न्यायालयाच्या प्रारंभिक अधिकारक्षेत्रानुसार पुढील प्रकारच्या खटल्यांची सुरुवात ही उच्च न्यायालयापासून होत असते;

अ) नागरिकांच्या मूलभूत अधिकाराबाबतचे दावे

ब) संसद किंवा राज्यविधिमंडळ सदस्यांच्या निवडणुकीबाबतचे दावे

क) राज्यसूचीतील विषयावर राज्यविधिमंडळाने घटनाबाह्य रीतीने तयार केलेल्या कायद्याबाबतचे दावे

थोडक्यात अशाप्रकारच्या दाव्यांची सुरुवात दुय्यम किंवा कनिष्ठ न्यायालयात होऊ शकत नाही. असे दावे चालविण्याचा अधिकार फक्त उच्च न्यायालयाला असतो. म्हणून उच्च न्यायालयाच्या या अधिकारक्षेत्राला प्रारंभिक अधिकारक्षेत्र असे म्हटले जाते.

## ३) पुनर्निर्णयाचे अधिकारक्षेत्र:-

राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालय किंवा अन्य दुय्यम न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर पुनर्निर्णय देण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला प्राप्त आहे, त्यालाच उच्च न्यायालयाचे पुनर्निर्णयाचे अधिकारक्षेत्र असे म्हणतात. दिवाणी, फौजदारी आणि महसुली या तीन प्रकारचे खटले तसेच आयकर व विक्रीकर यासंबंधीचे खटले पुनर्निर्णयासाठी उच्च न्यायालयात दाखल केले जाऊ शकतात. दुय्यम न्यायालयाने आरोपीला मृत्युदंडाची शिक्षा दिलेली असल्यास असा खटला पुनर्विचारासाठी उच्च न्यायालयात पाठविणे आवश्यक असते. कारण उच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही आरोपीला मृत्यूदंडाची शिक्षा देता येत नाही. संविधानातील अर्थाबद्दल किंवा कायद्याच्या चिकित्सेचा प्रश्न एखाद्या दाव्यात असेल, तर असा दावा उच्च न्यायालयात पुनर्विचारासाठी येतो. त्याचप्रमाणे दुय्यम न्यायालयाने एखादा दिवाणी किंवा फौजदारी खटला पुनर्तपासणीसाठी योग्य आहे, असा शेरा मारल्यास किंवा उच्च न्यायालयाला दुय्यम न्यायालयाने दिलेला एखाद्या खटल्याचा निकाल पुनर्विचारासाठी योग्य वाटत असल्यास उच्च न्यायालय अशा खटल्याचा पुनर्विचार करू शकते. थोडक्यात पुनर्निर्णयाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करून उपलब्ध पुराव्यांच्या आधारे उच्च न्यायालय दुय्यम न्यायालयाने दिलेला निकाल बदलू शकते किंवा तोच निकालदेखील कायम ठेवू शकते. उच्च न्यायालय हे घटकराज्यातील सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे, परंतु पुनर्निर्णयाचे अंतिम न्यायालय नाही,

कारण सर्वोच्च न्यायालय हे भारतीय न्यायव्यवस्थेतील पुनर्निर्णयाचे अंतिम न्यायालय आहे.

**४) अभिलेख न्यायालय:-**

उच्च न्यायालय हे घटकराज्यातील अभिलेख न्यायालय असते. कारण उच्च न्यायालयाने विविध खटल्यांमध्ये दिलेले निर्णय हे प्रमाण दस्तऐवज मानले जातात. राज्यातील कोणत्याही कनिष्ठ न्यायालयात ते ग्राह्य मानले जातात. अशा उच्च न्यायालयाच्या निर्णयांना कायद्याचे स्थान प्राप्त होते. उच्च न्यायालयाने विविध खटल्यात दिलेल्या निर्णयांच्या नोंदी ठेवल्या जातात. या नोंदी भविष्यात संबंधित खटल्यात पुरावा म्हणून वापरल्या जातात. विविध दुय्यम न्यायालयात संबंधित खटल्यात युक्तिवाद करताना उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा आधार घेतला जातो. न्यायालयाची बेअदबी किंवा अवमानाबद्दल संबंधितांना शिक्षा करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला आहे.

**५) दुय्यम न्यायालयावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचा अधिकार:-**

भारतीय संविधानाच्या कलम २२७ नुसार उच्च न्यायालयाला आपल्या अधिकारक्षेत्रातील सर्व कनिष्ठ न्यायालयांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. उच्च न्यायालय पुढील विविध माध्यमातून कनिष्ठ न्यायालयावर देखरेख व नियंत्रण ठेवत असते;

I) दुय्यम न्यायालयाच्या कामकाजाबाबत नियम तयार करणे किंवा नियमात सुधारणा करणे.

II) दुय्यम न्यायालयातील कागदपत्रांची तपासणी करणे.

III) दुय्यम न्यायालयांना कार्यपद्धतीसंबंधी योग्य आदेश देणे.

IV) दुय्यम न्यायालयांनी आपली कागदपत्रे कशी ठेवावीत यासंबंधी मार्गदर्शन करणे.

IV) कनिष्ठ न्यायालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नेमणुका, सेवाशर्ती, रजा व बदल्या यासंबंधीचे नियम तयार करणे.

VI) एखाद्या कनिष्ठ न्यायालयातील खटला काढून आपल्या अधिकारक्षेत्रातील दुसऱ्या कनिष्ठ न्यायालयाकडे तो खटला सोपवणे.

### ३.३.२ दुय्यम न्यायालये:-

भारतीय संघराज्यामध्ये एकेरी स्वरूपाची न्यायव्यवस्था स्विकारण्यात आलेली आहे. या न्यायव्यवस्थेची रचना पिरॅमिडसारखी आहे. भारतीय न्यायव्यवस्थेच्या शिरोभागी सर्वोच्च न्यायालय आहे. त्याखालोखाल राज्यस्तरावरील उच्च न्यायालये आणि न्यायव्यवस्थेच्या

निम्न स्थानी दुय्यम न्यायालये कार्यरत आहेत. दुय्यम न्यायालयामध्ये जिल्हास्तरावर जिल्हा व सत्र न्यायालये, तर तालुका स्तरावर तालुका/कनिष्ठ न्यायालये कार्यरत आहेत. घटकराज्यातील उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली दुय्यम न्यायालय न्यायदानाचे कार्य करीत असतात. थोडक्यात ग्रामीण भागातील जनतेला न्याय सहज उपलब्ध झाला पाहिजे. त्यासाठी उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली कनिष्ठ न्यायालयाची स्थापना करण्यात येऊन ग्रामीण भागातील जनतेला सहज, सुलभ, कमी खर्चात आणि त्वरित न्याय मिळण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. भारतीय संविधानाच्या कलम २३३ ते २३७ मध्ये दुय्यम न्यायालयांविषयीची तरतूद केलेली आहे.

### ३.३.२.१ जिल्हा व सत्र न्यायालय: रचना:-

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक जिल्हा व सत्र न्यायालय असते. उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली जिल्हा व सत्र न्यायालय न्यायदानाचे कार्य करीत असते. जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये दिवाणी आणि फौजदारी या दोन प्रकारच्या खटल्यांबाबत न्यायदान केले जाते. जेव्हा जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश दिवाणी प्रकारचा खटला चालवीत असतात तेव्हा त्यांना 'जिल्हा न्यायाधीश', तर जेव्हा जिल्हा न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश फौजदारी प्रकारचा खटला चालवित असतात, तेव्हा त्यांना 'सत्र न्यायाधीश' असे म्हटले जाते. अशाप्रकारे जिल्हा व सत्र न्यायालयाच्या न्यायाधीशांना दुहेरी स्वरूपाची भूमिका पार पाडावी लागते. जिल्हा न्यायाधीशांना मदत करण्यासाठी इतर दुय्यम व सहाय्यक न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालयात कार्यरत असतात. जिल्हा न्यायाधीश या संकल्पनेमध्ये शहराचा मुलकी कोर्टाचा न्यायाधीश, जिल्हा न्यायाधीश, अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश, संयुक्त जिल्हा न्यायाधीश, सहाय्यक जिल्हा न्यायाधीश, स्मॉल कॉज कोर्टाचा न्यायाधीश, चिफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, अतिरिक्त चिफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, सत्र न्यायाधीश, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, सहाय्यक सत्र न्यायाधीश इत्यादी न्यायाधीशांचा समावेश केला जातो. जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायालयीन कामकाजाचा व्याप लक्षात घेऊन अशाप्रकारच्या विविध न्यायाधीशांची आवश्यकतेनुसार नियुक्ती केली जाते. या संकल्पनेतील कोणत्याही न्यायाधीशांनी स्वतंत्रपणे खटला चालवून निकाल दिलेला असला तरीदेखील हा निकाल जिल्हा व सत्र न्यायालयाचा निकाल मानला जातो.

**जिल्हा व सत्र न्यायालयाची रचना:-**

- **न्यायाधीशांची पात्रता:-**

  जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधीशांच्या पात्रतेविषयी भारतीय संविधानाच्या कलम २३३ मध्ये तरतूद करण्यात आलेली आहे, ती पुढीलप्रमाणे;

  १) ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.

  २) किमान ७ वर्ष वकीलीचा अनुभव असावा.

  ३) ती व्यक्ती केंद्र किंवा राज्य सरकारच्या सेवेमध्ये असू नये.

  ४) त्या व्यक्तीच्या नावाची शिफारस उच्च न्यायालयाकडून झाली असली पाहिजे.

- **न्यायाधीशांची नेमणूक:-**

भारतीय संविधानाच्या कलम २३३ नुसार जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधीशांची नेमणूक राज्यपालांकडून केली जाते. परंतु राज्यपाल न्यायाधीशांची नेमणूक करताना उच्च न्यायालयाचा तसेच महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाचा सल्ला विचारात घेतात. जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधीशांच्या नियुक्तीबाबत वरीलप्रमाणे संविधानात्मक तरतुदि असल्या तरी बहुतेक न्यायाधीशांना कनिष्ठ न्यायालयातून नियमाप्रमाणे बढती देण्यात येऊन नियुक्त केले जाते.

- **न्यायाधीशांची संख्या:-**

जिल्हा व सत्र न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या निश्चित नसते. जिल्हा व सत्र न्यायालयात एक मुख्य न्यायाधीश आणि आवश्यकतेनुसार काही इतर न्यायाधीश असतात. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या कामकाजाच्या व्यापानुसार न्यायाधीशांची संख्या निश्चित करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाच्या सल्ल्यानुसार राज्यपालांना असतो.

- **न्यायाधीशांचा कार्यकाल:-**

जिल्हा व सत्र न्यायालयामध्ये न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्यापासून वयाची ६२ वर्षे पूर्ण होईपर्यंत न्यायाधीश पदावर राहू शकतात. न्यायाधीशांच्या निर्धारित कार्यकाळात एका न्यायालयातून दुसऱ्या न्यायालयात बदली होऊ शकते. निर्धारित कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी न्यायाधीश स्वेच्छेने आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. तसेच गैरवर्तन, घटनाभंग व अकार्यक्षमता इत्यादी कारणावरून न्यायालयीन चौकशी करून राज्यपाल न्यायाधीशांना बडतर्फ करू शकतात, परंतु त्यासाठी राज्यविधिमंडळाच्या एकूण सदस्यसंख्येच्या तसेच उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सदस्यसंख्येच्या २/३ बहुमताने न्यायाधीशांच्या बडतर्फीचा प्रस्ताव मंजूर होणे आवश्यक असते.

- **जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रकार:-**

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी एक जिल्हा व सत्र न्यायालय स्थापन केले जाते. या जिल्हा व सत्र न्यायालयाचे पुढील दोन प्रकार आहेत. जिल्हा न्यायाधीशांच्या नियंत्रणाखाली दिवाणी व फौजदारी न्यायालये न्यायदानाचे कार्य करतात.

१) फौजदारी न्यायालय

२) दिवाणी न्यायालय

**१) फौजदारी न्यायालय:-**

जिल्हा व सत्र न्यायालयाअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यासाठी एक फौजदारी न्यायालय असते. जेव्हा जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश फौजदारी स्वरूपाचे खटले चालवीत असतात, तेव्हा त्यांना 'सत्र न्यायाधीश' (Session's Judge ) असे म्हटले जाते, तर न्यायालयाला 'सत्र न्यायालय' (Session's Court) असे

संबोधले जाते. या न्यायालयात खून व त्यासारखे गंभीर गुन्हे यासंबंधीचे दावे दाखल केले जातात. त्याचप्रमाणे या न्यायालयात तालुकास्तरावरील कनिष्ठ फौजदारी न्यायालयातून पुनर्विचारासाठी दावे दाखल करण्यात येतात. फौजदारी न्यायालय खून किंवा तत्सम गंभीर स्वरूपाच्या खटल्यामध्ये मृत्युदंडाची शिक्षा देऊ शकते. परंतु मृत्यूदंडाची शिक्षा दिल्यानंतर असा दावा उच्च न्यायालयात पुनर्विचारासाठी पाठवणे आवश्यक असते. कारण उच्च न्यायालयाचे मृत्युदंडाच्या संदर्भात शिक्कामोर्तब झाल्याशिवाय कोणत्याही आरोपीस मृत्युदंडाची शिक्षा दिली जाऊ शकत नाही. सत्र न्यायाधीशांच्या नियंत्रणाखाली दिल्या जाणाऱ्या शिक्षेच्या प्रकारानुसार पुढील तीन प्रकारची दुय्यम फौजदारी न्यायालये न्यायदानाचे कार्य करीत असतात;

**अ) जुडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-१:-**

या न्यायालयाअंतर्गत फोजदारी खटल्यात गुन्हा सिद्ध झालेल्या आरोपीस दोन वर्ष सक्तमजुरी व एक हजार रुपयापर्यंत दंडाची शिक्षा दिली जाऊ शकते. अशी शिक्षा देण्याचा अधिकार या न्यायालयातील प्रथम वर्ग मॅजिस्ट्रेट यांना देण्यात आलेला आहे.

**ब) जुडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-२:-**

या प्रकारच्या न्यायालयाअंतर्गत फौजदारी खटल्यात गुन्हा सिद्ध झालेल्या आरोपीला सहा महिने सक्तमजुरी व दोनशे रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा दिली जाऊ शकते. अशी शिक्षा देण्याचा अधिकार द्वितीय वर्ग मॅजिस्ट्रेट यांना देण्यात आलेला आहे.

**क) जुडिशियल मॅजिस्ट्रेट वर्ग-३:-**

या प्रकारच्या न्यायालयाअंतर्गत फौजदारी खटल्यात गुन्हा सिद्ध झालेल्या आरोपीला एक महिना सक्तमजुरी व पन्नास रुपयांपर्यंत दंड दिला जाऊ शकतो. असा दंड करण्याचा अधिकार तृतीय वर्ग मॅजिस्ट्रेट यांना देण्यात आलेला आहे.

वर उल्लेख करण्यात आलेल्या तीन प्रकारच्या मॅजिस्ट्रेट यांना मृत्यूदंडाची शिक्षा देण्याचा अधिकार देण्यात आलेला नाही, कारण मृत्युदंडाची शिक्षा देण्याचा अधिकार हा सत्र न्यायाधीशांना असतो.

**२) दिवाणी न्यायालय:-**

जिल्हा न्यायाधीशांच्या नियंत्रणाखाली पुढील तीन प्रकारची दुय्यम दिवाणी न्यायालये न्यायदानाचे कार्य करीत असतात;

**अ) प्रथमवर्ग दिवाणी न्यायालय:-**

या न्यायालयामध्ये सर्व प्रकारचे दिवाणी दावे चालवले जाऊ शकतात. त्याचप्रमाणे तालुका किंवा कनिष्ठ न्यायालयाने दिवाणी दाव्यांच्या

संदर्भात दिलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्याचा अधिकार या न्यायालयांना आहे.

**ब) द्वितीय वर्ग दिवाणी न्यायालय:-**

या न्यायालयाला पाच हजार रुपये किमतीपर्यंतचे दिवाणी खटल्याबाबत न्यायदान करण्याचा अधिकार आहे.

**क) स्मॉल कॉज न्यायालय:-**

या न्यायालयात दोन हजार रुपये किमतीपर्यंतच्या खटल्याबाबत न्यायदान करण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

- **जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिकारक्षेत्र:-**

जिल्हा व सत्र न्यायालय ही भारतीय न्यायव्यवस्थेचा एक अविभाज्य घटक आहे. जिल्हा पातळीवर न्यायदानाचे कार्य करीत असताना जिल्हा व सत्र न्यायालयाचे पुढील अधिकारक्षेत्र आहे;

**१) प्रारंभिक अधिकारक्षेत्र:-**

जिल्हा व सत्र न्यायालयाचे प्रारंभिक अधिकारक्षेत्र म्हणजे जिल्ह्यातील कोणत्याही कनिष्ठ न्यायालयात दाखल न करता येणारे दावे सर्वप्रथम जिल्हा न्यायालयातच दाखल केले जातात. अशा खटल्यावर निर्णय देण्याचा जिल्हा व सत्र न्यायालयाचा अधिकार होय. पाच हजार रुपये किंवा त्यापेक्षा अधिक किमतीचे दिवाणी दावे जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले जातात. अशा दाव्यावर निर्णय देण्याचा प्रारंभिक अधिकार जिल्हा व सत्र न्यायालयाला असतो. जिल्हा व सत्र न्यायालयाला प्रारंभिक अधिकारक्षेत्र देण्यात आलेले आहे, परंतु हे प्रारंभिक अधिकारक्षेत्र फक्त फौजदारी दाव्यांच्या संदर्भातच आहे. अशाप्रकारचे अधिकारक्षेत्र जिल्हा न्यायालयांना दिवाणी दाव्यांच्या संदर्भात देण्यात आलेले नाही. खून, दरोडा किंवा कोणत्याही गंभीर स्वरूपाच्या फौजदारी गुन्ह्याच्या गंभीर अपराधाबद्दल तसेच ज्या गुन्ह्याबाबत तीन वर्षापेक्षा जास्त शिक्षा देण्याची तरतूद आहे, अशा आशयाचे सर्व फौजदारी दावे जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले जातात. जिल्हा व सत्र न्यायालयाला फौजदारी गुन्ह्यासंदर्भात मृत्युदंड देण्याचा अधिकार देण्यात आलेला असला तरीदेखील जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलेली मृत्युदंडाची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम केल्याशिवाय या शिक्षेची अंमलबजावणी होत नाही.

**२) पुनर्विचाराचे अधिकारक्षेत्र:-**

जिल्हा व सत्र न्यायालयाला पुनर्विचाराचे अधिकारक्षेत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार दिवाणी किंवा फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांमध्ये कनिष्ठ न्यायालयांनी दिलेल्या निर्णयाविरुद्ध जिल्हा व सत्र न्यायालयाकडे दावा

दाखल करता येतो. अशा दाखल झालेल्या दाव्याच्या संदर्भामध्ये जिल्हा व सत्र न्यायालय उपलब्ध पुराव्यानुसार त्या खटल्याचा पुनर्विचार करीत असते.

**३) प्रादेशिक अधिकारक्षेत्र:-**

जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिकारक्षेत्र हे विशिष्ट जिल्ह्यानुसार मर्यादित असते. त्यामुळे जिल्हा व सत्र न्यायालयाला त्याच्या प्रादेशिक क्षेत्रामधून येणाऱ्या कोणत्याही विषयावरील खटला चालविण्याचा व त्यावर निर्णय देण्याचा अधिकार असतो. जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिकारक्षेत्र ठरवण्याचा किंवा त्यामध्ये वाढ किंवा घट करण्याचा अधिकार राज्य सरकारला आहे.

**४) अभिलेख न्यायालय:-**

जिल्हा व सत्र न्यायालय जिल्ह्यातील सर्वश्रेष्ठ न्यायालय असते. या न्यायालयाने दिलेला निर्णय अभिलेखित करून ठेवल जातात. त्या निर्णयाची नोंद ठेवून त्याचे जतनदेखील केले जाते. जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलेला निर्णय जिल्ह्यातील कनिष्ठ न्यायालये पुरावा म्हणून वापरत असतात. म्हणून जिल्हा व सत्र न्यायालय हे अभिलेख न्यायालय असते. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध उच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचा अधिकार असला, तरी जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या वैधतेविषयी प्रश्न उपस्थित करता येत नाही.

**५) कनिष्ठ न्यायालयावर देखरेख व नियंत्रण ठेवणे:-**

भारतीय संविधानाच्या कलम २३५ नुसार जिल्हा व सत्र न्यायालयाला जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीश व कर्मचारी यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ न्यायालये जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नियंत्रणाखाली कार्य करीत असतात. कनिष्ठ न्यायालयांमधील न्यायाधीशांच्या रजाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा व सत्र न्यायालयाला देण्यात आलेला आहे. जिल्हा व सत्र न्यायालयातील कर्मचाऱ्यांची भरती, बदली इत्यादी बाबत जिल्हा व सत्र न्यायालयाची भूमिका महत्त्वाची असते.

### ३.३.२.२ कनिष्ठ/तालुका न्यायालय:-

भारतीय न्यायव्यवस्थेच्या निम्न स्थानी तालुकास्तरावर कनिष्ठ न्यायालय न्यायदानाचे कार्य करतात. कनिष्ठ न्यायालयाचे कार्यक्षेत्र संबंधित तालुक्यापुरते किंवा ठरवून दिलेल्या क्षेत्रापुरते मर्यादित असते. तालुकास्तरावरील कनिष्ठ न्यायालयांमध्ये दिवाणी आणि फौजदारी स्वरूपाचे दावे निकाली काढले जातात. कनिष्ठ न्यायालयांमध्ये एक मुख्य न्यायाधीश आणि आवश्यकतेनुसार इतर न्यायाधीश कार्यरत असतात. कनिष्ठ न्यायालयातील कार्याचा व्याप बघून इतर न्यायाधीशांची संख्या निश्चित केली जाते. कनिष्ठ न्यायालयांमध्ये न्यायाधीशांची नेमणूक महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामार्फत न्यायाधीश पदासाठीची विशेष परीक्षा घेऊन केली जाते. परंतु ही परीक्षा देण्यापूर्वी उमेदवाराने कायद्याची पदव्युत्तर पदवी प्राप्त केलेली

असणे आवश्यक असते. कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधीश नियुक्त झाल्यानंतर वयाची साठ वर्ष पूर्ण होईपर्यंत अधिकार पदावर राहतात. तत्पूर्वी स्वच्छेने ते आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. दिवानी दाव्यांमध्ये पाच लाख रुपये किमतीपर्यंतचे दावे निकाली काढण्याचा अधिकार कनिष्ठ न्यायालयांना आहे. त्याच पद्धतीने दिवाणी किंवा फौजदारी दाव्यांमध्ये तीन वर्षांपर्यंतची शिक्षा कनिष्ठ न्यायालय देऊ शकते. परंतु तीन वर्षांपेक्षा जास्तीची शिक्षा देण्याचा अधिकार कनिष्ठ न्यायालयाला नाही. तालुकास्तरावरील कनिष्ठ न्यायालये जिल्हा व सत्र न्यायालयाच्या नियंत्रणात न्यायदानाचे कार्य करतात.

- **इतर न्यायालये:-**

  भारतीय संसदेने १९७६ मध्ये केलेल्या ४२ व्या घटनादुरुस्तीनुसार प्रशासकीय न्यायालये स्थापन करण्याचा अधिकार भारतीय संसदेला प्राप्त झालेला आहे. या घटनादुरुस्तीनुसार राज्यविधिमंडळदेखील आपल्या कार्यक्षेत्रात न्यायाधिकरणे स्थापन करू शकतात. यानुसारच कामगारांचे हितसंबंध सुव्यवस्थित व सुरक्षित ठेवण्यासाठी, त्यांचे विविध प्रश्न सोडवण्यासाठी 'कामगार व औद्योगिक न्यायालय', भूमी कर व जमीन महसूल या संबंधीच्या खटल्यांचा विचार करण्यासाठी 'राजस्व न्यायालय', स्थानिक पातळीवरील संघर्ष किंवा तंटे कमी वेळेत व खर्चात मिटवण्यासाठी भारताचे माजी सरन्यायाधीश न्या. पी. एन. भगवती यांच्या संकल्पनेतून 'लोकन्यायालया'ची स्थापना करण्यात आलेली आहे. स्थानिक पातळीवरील जनतेमधील तंटे किंवा संघर्ष मिटवण्यासाठी 'लोकन्यायालय' उपयुक्त ठरलेली आहेत. अशाप्रकारे स्थापन करण्यात आलेल्या या विविध इतर न्यायालयासमोर कर आकारणी, परकीय चलन, जमिनीची कमाल मर्यादा, आयात-निर्यात व्यापार, कायदेमंडळाच्या निवडणुका, वस्तूंच्या किमतीचे नियंत्रण, अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन व पुरवठा इत्यादी विषयासंबंधीचे खटले सुनावणीसाठी येतात.

- **सारांश:-**

  भारतीय संघराज्यातील एकेरी न्यायव्यवस्थेनुसार राज्यपातळीवर उच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाच्या खालोखाल दुय्यम न्यायालये यांची भूमिका न्यायदानामध्ये अत्यंत महत्त्वाची ठरलेली आहे. भारतीय संविधान आणि नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यामध्ये उच्च न्यायालयाने महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. जिल्हा स्तरावर कार्यरत असणारी जिल्हा व सत्र न्यायालयांनी तसेच तालुका स्तरावरील कनिष्ठ न्यायालयानेदेखील दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या खटल्यांमध्ये न्यायदान करताना महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. म्हणूनच भारतीय एकात्म न्यायव्यवस्थेचे उच्च न्यायालय, जिल्हा स्तरावरील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच तालुकास्तरावरील कनिष्ठ न्यायालय ही एक अविभाज्य घटक ठरलेली आहेत. जिल्हा स्तरावरील जिल्हा व सत्र न्यायालय तसेच तालुकास्तरावरील कनिष्ठ न्यायालय उच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली व नियंत्रणात न्यायदानाचे कार्य करीत असतात.

  अशा प्रकारे भारतीय न्यायव्यवस्थेत उच्च न्यायालय, जिल्हा व सत्र न्यायालय तसेच कनिष्ठ न्यायालय न्यायाची प्रस्थापना करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

- **आपली प्रगती तपासा.**

१) उच्च न्यायालयाची रचना सविस्तर लिहा.

२) उच्च न्यायालयाचे अधिकारक्षेत्र स्पष्ट करा.

३) जिल्हा व सत्र न्यायालयाची रचना स्पष्ट करा.

४) जिल्हा व सत्र न्यायालयाचे अधिकारक्षेत्र सविस्तर लिहा.

५) दुय्यम न्यायालये यावर निबंध लिहा.

- **अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ:-**

१) पाटील बी. बी., महाराष्ट्र: शासन आणि राजकारण

२) भोळे डॉ. भा.ल., भारतीय राज्यव्यवस्था

३) शिंदे डॉ.ज.रा., भारतीय प्रशासन आणि राजकारण

४) लोटे रा.ज., भारतीय शासन आणि प्रशासन

५) बाचल वि.म., भारतीय राज्यघटना

६) कुलकर्णी बी. वाय., भारताचे शासन आणि राजकारण

७) पाटील विलास, भारतीय संविधान आणि राजकारण

८) देशमुख प्रा. बी.टी., भारतीय संविधान

९) राठी डॉ. शुभांगी दिनेश, भारताचे संविधान

१०) पवार डॉ. प्रमोद, भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण

११) सिंह एस. सी., भारतीय शासन एवं राजनीति

१२) बसू दुर्गादास, भारत का संविधान-एक परिचय

१३) जैन पुखराज, फडिया बी. एल., भारतीय शासन एवं राजनीति

❄❄❄❄❄❄❄

# ४

# महाराष्ट्रातील जात आणि राजकारण

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.४ महाराष्ट्रातील जाती /उपजाती

४.५ प्रबळ जातीचे राजकारण

४.६ दलित राजकारण

४.६.१ दलित राजकारणाची वाटचाल

४.७ ओबीसी राजकारण

## ४.१. उद्दिष्टे

महाराष्ट्रातील जात आणि राजकारण या घटकाच्या अभ्यासातून पुढील बाबी स्पष्ट होतील.

१) महाराष्ट्राच्या राजकारणाचे स्वरूप समजेल.

२) महाराष्ट्रातील जातीय राजकारणाचे स्वरूप समजेल.

३) महाराष्ट्रातील राजकारणातील प्रभावी जातींची भूमिका सांगता येईल.

४) महाराष्ट्रातील दलित राजकारणाचे स्वरूप समजावून सांगता येईल.

५) महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय राजकारणाचे स्वरूप समजावून सांगता येईल.

## ४.२. प्रास्ताविक

१९६० मध्ये जेव्हा महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, तेव्हा लेखक- पत्रकार ग. त्र्यं. माडखोलकर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना प्रश्न विचारला की, नव्याने निर्माण होणार हे राज्य मराठी राज्य असेल की, मराठ्यांचं राज्य असेल? यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळी माडखोलकरांना उत्तर दिले होते, की हे राज्य मराठी माणसाचंच असेल. त्यावेळी विचारलेल्या या प्रश्नाभोवतीच, आजही महाराष्ट्राचे राजकारण फिरत आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्राच्या राजकारणात ब्राह्मणांचा वरचष्मा होता, पण महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर हे चित्र बदलत गेलं. आणि राजकारण बहुजनाभिमुख बनत गेले.राजकारणात प्रभावी घटक असणारी जात, कितीही झटकण्याचा प्रयत्न केला, तरी ती पुन्हा दुप्पट वेगाने

तुम्हाला चिकटतेच. ईश्वरानंतर सर्वव्यापी ठरलेल्या जातीच्या इतिहासाचा धांडोळा घेतला तर, पार बुद्धकाळापर्यंत पायपीट करावी लागते. कारण वर्ण संस्थेच्या समाज बांधणीचे काम बुद्ध काळापर्यंत संपले होते. आपल्या कौशल्यानुसार वर्णाश्रम स्थिर झाला आणि तेच उपजीविकेचे साधन बनल्याने तो पिढी जात व्यवसाय बनल्याने जात हा घटक उदयाला आला. कालवघात जातीची उतरंड निर्माण होत भक्कम बनत गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या जातीच्या उतरंडीला जीना नसलेला मनोरा म्हणत असत. राजकारणात जात हा महत्त्वाचा घटक बनण्याची प्रक्रिया, स्वतंत्र्योत्तर काळात सुरू झाली. सत्ता या घटकाचे आकलन झाल्यानंतर ती टिकवण्यासाठी ज्या काही, अनैतिक मार्गांचा प्रारंभ झाला, त्यातून जात ही बलवान बनत गेली. त्यामुळे आज जातीच्या आधारावर मत बँक (Vote Bank) बनविणे, त्याच आधारावर उमेदवार ठरविताना कोणत्याही राजकीय पक्षाला विधी निषेध वाटत नाही. किंबहुना जात या एकाच आधारावर निवडणुकीचे राजकारण ठरते. पूर्वी जातीपेक्षा धर्म महत्त्वाचा होता. पण आता तो दुय्यम ठरला आहे. ही स्थिती केवळ राजकारणापुरतीच मर्यादित नाही, तर समाजकारण, अर्थकारणही तिने व्यापले आहे.

प्रत्येक जातीने आपली संस्कृती निश्चित केली. जात संपवण्यासाठी प्रयत्नही झाले. दक्षिणेतील द्रविड चळवळ, महाराष्ट्रातील ब्राम्हणोत्तर चळवळ, एक गाव एक पानवठा, आंतरजातीय विवाह चळवळ, उत्तरेतील 'जनेऊ तोडो आंदोलन' अशा चळवळींनी सत्तरच्या दशकापर्यंत सामाजिक घुसळण केली होती. परंतु पुढे मंडल आयोगाच्या शिफारशीनंतर, समाजातील वंचित घटकांना आरक्षण मिळाले. आणि जातीजातींचे ध्रुवीकरण सुरू झाले, व राजकारणाचा पोत बदलत गेला. यामुळे काँग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट या धर्मनिरपेक्ष पक्षांच्या मतपेढीला ओहोटी लागली. आणि या पक्षांचा सत्तेतील टक्का कमी होत गेला. पुढे खुल्या अर्थव्यवस्थेच्या धोरणामुळे सगळी चौकटच खीळखिळी झाली. याचवेळी उजव्या विचारसरणीच्या भाजपा सारख्या पक्षांनी उचल खाल्ली, आणि राम मंदिराचे राजकारण केंद्रबिंदू बनले. या आंदोलनाने धर्म हा महत्वाचा घटक राजकारणात बनला. सर्वधर्मसमभाव ही संकल्पना हळूहळू अडगळीत पडल्याने, छोट्या छोट्या जाती वेगाने संघटित झाल्या. आणि आपल्या जातीच्या हिताचे रक्षण हा त्यांचा प्राधान्यक्रम झाला. संख्याबळाच्या जोरावर उघड उघड राजकीय सौदेबाजी सुरू झाली. यातूनच जातींची संघटन वेगवान बनले, आणि निवडणुकीत जात महत्त्वाची बनली. तिने समाज जीवन उध्वस्त केले यातूनच स्थलांतर आणि शहरीकरणाला मदत झाली. अल्पसंख्य जातींना चेहरा नसणारे शहर सुरक्षित वाटायला लागले. एकेकाळी आंतरजातीय विवाहंचा पुरस्कार करणाऱ्या, पुरोगामी महाराष्ट्रात ऑनर किलिंगच्या घडणाऱ्या घटनाच, जातीच्या प्रबल्याच्या निर्देश आहेत. मराठा आंदोलनाच्या मोर्चानंतर तर जातीय ध्रुवीकरण वेगाने घडले. केवळ आरक्षण, या मुद्द्यावर ब्राह्मणांसह सर्वच जातींनी मोर्चे काढले. जातीच्या आधारावर समाज एकवटणे म्हणजे एक प्रकारचे सामाजिक अध:पतनच म्हणता येईल. या अध:पतनाच्या कडेलोटा पर्यंत फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र आला आहे. वारकरी संप्रदायाच्या सर्वसमावेशक विचारधारेवर परिपोष झालेल्या महाराष्ट्राची, ही अवस्था आहे. आणि हे सगळे केवळ सत्तेसाठी, सत्तेचा हा अट्टाहास आणखी कोणत्या गर्तेत लोटणार हा एक मोठा प्रश्न आहे.

## ४.३ विषय विवेचन:

'महाराष्ट्रातील जात आणि राजकारण' या घटकांतर्गत, महाराष्ट्रातील जातीवर आधारित राजकारणाचा अभ्यास करण्यात येणार असून, त्या अंतर्गत प्रबळ जातीचे राजकारण तसेच दलित राजकारण आणि ओबीसी राजकारण यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

## ४.४ महाराष्ट्रातील जाती-उपजाती:

महाराष्ट्रात असंख्य जाती-उपजाती आहेत त्याचा वर्गीकरणात अभ्यास खालील प्रमाणे आहे.

१) **उच्चवर्णीय**:

ब्राह्मण, गौड, सारस्वत, चांद्रसेनीय, कायस्थ, पाठारे, (सी,.के.पी.) इत्यादी जाती उच्चवर्णीयात समावेश करण्यात येतो.

२) **मध्यस्तरीय**:

मराठा कुणबी जाती समूहाचा, मध्यस्तरीय जातीत समावेश होतो. याव्यतिरिक्त राजपूत, लेवा पाटील जाती समूहाचा समावेश केला जातो.

३) **कनिष्ठ जाती**:

(इ.मा. जा.) इतर मागास जातीची संख्या (२००) हून अधिक आहे. कुणबी मराठा जाती समूहाचा समावेश इ.मा.जा. मध्ये करण्यात आला आहे.

४) **दलित (अ.जा.):**

अनुसूचित जाती आणि नवबौद्धचा यात समावेश आहे. त्यातच पूर्वाश्रमीच्या (महार जाती) दलित सदरीय समावेश करण्यात येतो. योजनात्मकरित्या विमुक्त जाती आणि भटक्या जमाती त्यातच समावेश केल्या आहेत.

५) **अनुसूचित जमाती:**

महाराष्ट्रात ४७ आदिवासी किंवा आदिम जमाती अतिदुर्गम भागात वास्तव करणारे मान्यता प्राप्त अनुसूचित जमाती आहेत.

६) **अल्पसंख्याक:**

अल्पसंख्याक सदरात मुस्लिम, जैन, बौद्ध, पारशी, ख्रिस्ती या धार्मिक अल्पसंख्य गटाचा समावेश आहे.

७) **इतर जाती जमाती**:

या गटात इतर अमराठी गटाचा समावेश आहे. उदा. उत्तर भारतीय, तेलगू, मल्याळी, तामिळी इत्यादीचा समावेश आहे.

## ४.५ प्रबळ जातीचे राजकारण:

महाराष्ट्राच्या राजकारणातील जातीचा सलोखा यामध्ये, परिस्थितीजन्य स्थितीत बराच बदल होत आहे. वेळेस अनुसरून राजकीय सामाजिकरण सलोखा बदललेल्या परिस्थितीत बदलत आहे. व्होरा व पळशीकरांच्या मते, जाती जातीतील संघर्ष यांचे वर्ग संघर्षात परिवर्तन झाले. त्याचे प्रत्यंतर मराठा आणि अन्य आणि कनिष्ठ जाती, त्यामध्ये हिंदू धर्मात समाविष्ट असलेल्या दलित जाती, दलितातील विविध जातीची ओळख राजकीय दृष्ट्या स्पष्ट झाली. श्रेष्ठ जातीचा वर्ग, महाराष्ट्राच्या राजकारणात प्रशासकीय, राजकीय दृष्ट्या बेरजेच्या राजकीय समीकरणांनुसार अधिक रूढ झाला.

१९६० पूर्वी ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर हा वाद होता. त्यात राजकीय पांघरून मराठा समाजाने घातले, व ब्राह्मण रूढ वर्ग महाराष्ट्राच्या प्रशासकीय भूमिकेत, अति विशिष्ट पदावर आरुढ झाला. महाराष्ट्रात राजकीय मक्तेदारी, साखर कारखाने हे मराठ्याच्या हाती राहिली. उद्योजक म्हणून गुजराती, मारवाडी, पारशी समाज पुढे आला. काही तुरळक उद्योग ब्राह्मणाच्या हाती आली. लघुउद्योग व मध्यम उद्योग ब्राह्मण वर्गाच्या हाती आल्यावर, परत राजकीय वाद त्याकाळी उद्भवला आणि त्यामध्ये, इतर जाती (ओ.बी.सी.) नी आपले राजकीय लाभ घेण्यास प्रारंभ केला. त्यातच शिक्षण व्यवस्था हा एक उद्योग बनला. आणि राजकीय नेत्यांनी आपले राजकीय उखळ पांढरे करून घेण्यास प्रारंभ केला. ही शिक्षणाची नांदी तेवढ्यापुरतीच मर्यादित न राहता, यात धार्मिक अल्पसंख्याक, भाषिक अल्पसंख्याक ही सामील झाले व शिक्षण संस्थेची विभागणी तीन स्तरात उद्योगात्मक झाली.

१) बहुसंख्य शिक्षण संस्था. (Maratha)

२) अल्पजातीतील ब्राह्मण(Brahamin) शिक्षण संस्था .

३) धर्मविषयक शिक्षण संस्था(Religious).

अशाप्रकारे या उद्योगाची विभागणी झाली. तरी त्याच्यातील वर्गवाद, वर्णवाद, जातिवाद, धर्मवाद संपुष्टात येण्याऐवजी अधिक उफाळून येत आहे. ही सद्यस्थिती आहे. राजकीय व सामाजिक, प्रशासकीय -राजकीय दृष्ट्या स्तरीकरण अभिसरण प्रक्रिया आहे. विविध कार्यालयात, मराठा जातीच्या समाजाचे प्रभुत्व आहे.

एम. एन. श्रीनिवास यांनी 'कास्टिंग मॉडर्न इंडिया अँड आँदर' या ग्रंथात जातीनिष्ठ भारतीय राजकारणाचे विश्लेषण करताना श्रेष्ठत्व किंवा वर्चस्व असलेल्या जाती समूहाची संकल्पना विशद केली आहे. त्यांच्या मते, स्वातंत्र्योत्तर कालखंडात लोकशाही आणि सार्वत्रिक प्रौढ मताधिकारचा स्वीकार करण्यात आल्याने, जातीसमूहांच्या संख्या सामर्थ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले. संख्या सामर्थ्य आणि राजकारणावरील त्याचा प्रभाव, यातील संबंध विशद करताना एम. एन. श्रीनिवास यांनी **'डॉमिनंट कास्ट'** या संकल्पनेची रचना केली आहे.

श्रीनिवास यांच्या संकल्पनेचा योगेंद्रसिंग यांनी विस्तार करताना, जाती समूहाच्या उतरंडीत धार्मिक व क्रियाशील असलेल्यांना पारंपरिक स्थान, संख्या सामर्थ्य, शैक्षणिक प्रगती, आर्थिक समृद्धी, सुबत्ता या सर्व अथवा काही निकषाच्या आधारे, इतर जाती समूहापेक्षा अधिक प्रभावी असलेला जातीसमूह अशी व्याख्या केलेली आहे. प्रभुत्व असलेल्या जाती

समूहाच्या चालीरीतीचे अनुकरण त्यापेक्षा कनिष्ठ जाती समूहाद्वारे करण्यात येते. अशा अनुकरणाद्वारे जातीसमूह आपला कनिष्ठ सामाजिक दर्जा, कनिष्ठ जाती समूह आणि प्रतिष्ठा समाजात वाढविण्याचा प्रयत्न करतो. या सामाजिक स्तरीकरणाच्या प्रक्रियेला श्रीनिवास सांस्कृतिकरण संबोधतात.महाराष्ट्राच्या संदर्भात मराठा कुणबी जाती समूहाला प्रभावी असे म्हणता येईल. कनिष्ठ मराठे (कुणबी), 'खानदानी मराठे (वतनदार)' मराठ्यांचे अनुकरण, भारतात आणि त्या प्रवृत्तीचा प्रसार कनिष्ठ जाती समूहात झाला आहे. मराठे अभिजनांच्या ताब्यात साखर कारखाने सहकारी तत्त्वावर असल्याने, इतर मागासवर्गीय अभिजनांनी देखील आपले सहकारी साखर कारखाने स्थापन केले आहे.

स्थानिक पातळीवर एखादी जात संख्यात्मक ताकत सांभाळून असते. त्यांच्याकडे जमीन-जुमला असतो. आणि आपल्या आर्थिक शक्तीला साजीशी प्रतिष्ठाही त्या जातीने कमावलेली असते. तिला वर्चस्वशाली जात असं नाव प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एम. एन. श्रीनिवास यांनी दिले. अशा वर्चस्वशाली जातीकडे स्थानिक सत्तेची सूत्रे येणे, स्वाभाविकच होते. पण १९५० नंतरच्या लोकशाही राजकारणात आणखी दोन गोष्टी घडून आल्या. एक म्हणजे अशा स्थानिक वर्चस्वशाली जाती स्थानिक परिसराच्या बाहेरही राजकारणात हात पाय पसरण्यासाठी चाचणी करू लागल्या. त्यांची स्थानिक सत्ता आणि साधनसामग्री हे आधार त्यांना राजकारणासाठी उपयोगी पडू लागली. शिवाय जाती समाजातल्या प्रतिष्ठेचा विरोध असल्यामुळे सत्तेसाठी दावा करणे त्यांना शक्य झाले. दुसरी बाब म्हणजे मर्यादित संख्याबळ असूनही स्वतःकडे नेतृत्व ओढून घेऊ शकणाऱ्या काही, प्रबळ जातींचा या काळात उदय होऊ लागला. महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये संख्याबळ असलेल्या मराठा जातीकडेच साधनसामग्री एकवटल्यामुळे ती प्रबळ जात बनणे सोपे झाले. पण अनेक राज्यांमध्ये एवढं संख्यात्मक बळ नसतानाही, काही जाती राज्याच्या राजकारणात सूत्रधार बनल्या. त्यांच्याकडच्या साधनसामग्रीमुळे हे शक्य झाले.

स्वातंत्र्यपूर्व काळात चळवळीला ताकद मिळवण्यासाठी, कॉंग्रेसने मोठे समूह आपल्या मागे उभे केले होते. यात अर्थातच, आशा वर्चस्वशाली जातींचा समावेश होताच. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या जातींची स्थानिक नेते प्रादेशिक सत्तेवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागले. त्यातून स्थानिक व प्रादेशिक राजकारणाचे स्वरूप बदलू लागले. ज्या राज्यांमध्ये धर्मांतर करण्याच्या मोठ्या चळवळी झाल्या. आहेत तिथे तर स्वाभाविकपणेच वर्चस्वशाली प्रबळ जातींकडे राजकारणाचे सूत्र गेले. मात्र याच काळात उच्च जातींच्या राजकीय सत्तेला फारसा धक्का बसला नाही. स्वातंत्र्योत्तर राजकारणात सत्तेचे मुख्य भागीदार म्हणून उच्च जाती प्रस्थापित झाल्या होत्या. त्यांच्या या स्थानाला मोठे आव्हान पहिल्या दहा वीस वर्षांमध्ये तरी निर्माण होऊ शकलं नाही. शिक्षण, प्रशासन, साधनसामग्री या तिन्हींमध्ये प्रभावी असणाऱ्या ब्राह्मण, कायस्थ, वैद्य, तसेच राजपूत, बनिया, चेट्टीयार इत्यादी जातींनी सत्तेचे सूत्र स्वतःकडे ठेवण्यात यश मिळवले. जेव्हा जेव्हा वर्चस्वाशाली प्रबळ जातींनी सत्तेसाठी दावा केला, तेंव्हा तेंव्हा त्यांना प्रादेशिक पातळीवर रोखण्यात आले. केंद्रीय पातळीवरच्या सत्तेत उच्च जाती खऱ्या सत्ताधारी राहिल्या.शिवाय विविध राजकीय पक्षांच्या संघटनांच नियंत्रणही उच्चजातींकडेच राहील. राष्ट्रीयच नव्हे तर प्रादेशिक नेतृत्वावरही, उच्च जातींचा वरचष्मा राहिला. म्हणजे लोकशाही व्यवस्था आल्यामुळे जात आणि राजकारण यांच्या संबंधांमध्ये फारसा फरक पडला नाही. आपण वर पाहिलं त्याप्रमाणे

राष्ट्रीय विकासाच्या मुद्द्यामुळे जातीला राजकारणात थेट मध्यवर्ती स्थान मिळाल नाही. मग त्या राष्ट्रीय विकासाची जबाबदार स्वतःकडे घेत उच्च जातींनी धुरीणत्व प्राप्त केलं.

अर्थातच या सर्व प्रक्रियेतून जात हा आपल्या राजकीय व्यवहारातला एक घटक बनला. तसंच कनिष्ठ मानलेल्या जातींना सत्तेवरील दाव्यासाठी संघर्ष करून जातीचे राजकारण करण आवश्यक झालं. तरी या काळातील राजकीय स्पर्धा उघडपणे जातीच्या मुद्याभोवती साकारली नाही. ज्या वर्चस्वशाली जाती राजकारणात शिरकाव करू पाहत होत्या, त्यांच्या भौगोलिक व व्यावसायिक स्थाणामुळे 'शहरी विरुद्ध ग्रामीण' किंवा 'शेतीविरुद्ध उद्योग' अशा भाषेत १९६० च्या दशकात सामाजिक संघर्षांनी आकार घेतला. राज्य पुनर्रचनेमुळे प्रादेशिक पातळीवर प्रबळ जातींना जास्त वाव मिळाला. तसंच समुदाय विकास योजना, पंचायत राज्याचा आग्रह इत्यादी कार्यक्रमांमधून उच्च जातींखेरीजच्या राजकीय कार्यकर्त्यांना सत्तेशी जोडून घेण्याचे प्रयत्न झाले. त्यामुळे काँग्रेस पक्षाला उच्च जातींना डच्चू न देताही, आपल्या चौकटीत, इतर जातींच्या महत्त्वकांक्षांना थोडी जागा करून देता आली. परिणामी १९४७ पासून पुढच्या जवळपास दोन दशकापर्यंत जातीचे राजकारण फारस तीव्र झाले नाही. अस्पष्ट स्वरूपात उच्च जातींना थोडे आव्हान उभे राहिले. आणि मध्यम दर्जाच्या शेतकरी जातींना प्रथमच सत्तेची चव चाखायला मिळाली. या विभिन्न हितसंबंधांना सांभाळण्याची काँग्रेसची कसरत १९६७ मध्ये धोक्यात आली. पण जनसंघ कम्युनिस्ट स्वतंत्र यासारख्या काँग्रेसच्या प्रतिस्पर्धी पक्षांना त्या परिस्थितीचा फायदा घेता आला नाही. कारण जातीच्या प्रश्नांचं काय करायचं आणि जातीबद्ध समाजात लोकशाही पद्धतीने सत्तेच वाटप कसं करायचं या प्रश्नाचे उत्तर या पक्षांजवळ नव्हतं.

थोडक्यात महाराष्ट्रातील राजकारणात प्रबळ जातींचा प्रभाव हा स्वातंत्र्यपूर्व काळापासून तर आज तागायत टिकून आहे. राजकीय नेतृत्व, पक्ष, निवडणुका या संख्यात्मक प्रबळ असणाऱ्या प्रबळ जातींच्या अवतीभोवतीच महाराष्ट्राचे राजकारण आजही चालतांना दिसून येते.

## ४.६ दलित राजकारण

महाराष्ट्राच्या राजकारणात दलित राजकारण हा शब्दप्रयोगच रूढ झाला आहे. अनुसूचित जातींना हिंदू व्यवस्थेत अस्पृश्य संबोधले जायचे. महात्मा गांधींनी त्यांच्या करिता 'हरिजन' या शब्दप्रयोगाचा वापर केला होता. ब्रिटिशांनी शोषित जाती असा शब्दप्रयोग केला होता. स्वतंत्र्योत्तर कालखंडात पद दलित जाती /जमातीच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्याकरिता राज्यघटनेत त्यांच्याकरिता राखीव जागांची तरतूद करण्यात आली. अशा प्रकारच्या जाती/ जमाती अ.जा./अ. जमाती सुचित समाविष्ट करण्यात आल्या. या समाविष्ट करण्यात आल्या मात्र या जातीसमूहातील लोक स्वतःला दलित म्हणून घेणे पसंत करतात. महाराष्ट्र शासनाच्या अ.जा.च्या सूचित ५९ जाती समूहाचा समावेश आहे. डॉ. आंबेडकरांनी १९५६ मध्ये आपल्या ७५००० अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. पूर्वाश्रमीचा 'महार' जातीचा आणि धर्मांतर केलेल्या जनसमुदायाचा 'नवबौद्ध' (Neo-Buddism) or (Neo-Buddist) असा उल्लेख करण्यात येतो. महाराष्ट्र शासनाने अ.जा.च्या सुचित समाविष्ट असणाऱ्या जातींना ज्या सवलती व जी आरक्षणे केली आहे, त्या १९६२ मध्ये केल्या आहेत. त्यामुळे दलित जाती समूहात अनुसूचित जात व नवबौद्ध समावेश होत असतो. वर्तमान स्थितीतील

अभ्यासक अनुसूचित जमातीचा ही दलित सदरात समावेश करतात. थोडक्यात प्रशासकीय शासकीय सवलतीचा फायदा त्याला झाला.

### ४.६.१ **दलित राजकारणाची वाटचाल**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर रिपब्लिकन पक्षाच्या विघटनाला थोडे वेगळे स्वरूप आले. यशवंतराव चव्हाण यांच्या बेरजेच्या राजकारणाचा भाग म्हणून दलित नेत्यांना काँग्रेसमध्ये आणण्याचा प्रयत्न सुरू झाला. १९६९ च्या सार्वत्रिक निवडणुकीपूर्वी सर्वप्रथम आर. डी. भंडारे काँग्रेसमध्ये दाखल झाले. व त्यानंतर प्रा. नरेंद्र कांबळे, दादासाहेब रूपवते इत्यादी मंडळी आपापल्या अनुयायांसह काँग्रेसमध्ये आली. दुसऱ्या बाजूने यशवंतराव चव्हाण यांनी रिपब्लिकन पक्षाच्या गायकवाड गटा बरोबर ही युतीची पूर्ण चर्चा सुरू केली. परंतु जागावाटपाच्या प्रश्नावरून मतभेद झाल्यामुळे गायकवाड गटाने समिती बरोबर सहकार्य चालू ठेवले. या निवडणुकीत त्यांना केवळ चार जागा मिळाल्या. यानंतर मात्र गायकवाड गटांनी काँग्रेस विरोधी भूमिका बदलली, आणि जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस बरोबर युती केली. काँग्रेस बरोबर सहकार्य करणाऱ्याच्या प्रश्नावरून १९७० मध्ये रिपब्लिकन पक्षात पुन्हा फूट पडली. विदर्भातील नेते राजाभाऊ खोब्रागडे आणि इतर लहान घटक यांनी आपला स्वतंत्र गट निर्माण केला. अशा प्रकारे रिपब्लिकन पक्षाचे तीन गट पडले व त्यांचे तीन गटात विभाजन झाले. १९७२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत या सर्वांना मिळून एक जागा मिळवता आली.

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या कांबळे गटाने पक्षाशी युती केली. आणि त्यात बी.सी. कांबळे लोकसभेवर निवडून गेले. युतीच्या राजकारणाद्वारे १९८० ते १९९० च्या निवडणुकीत पक्षाचे प्रत्येकी एक उमेदवार विधानसभेवर निवडून आले. निवडणुकीच्या राजकारणात रिपब्लिकन पक्ष उत्तरोत्तर निष्प्रभ होत असल्याची जाणीव दलित नेतृत्वात झाली. शिवसेना भाजपाच्या वाढत्या प्रभावामुळे काँग्रेस पक्षाशी समझौता करावयाचा विचार पक्षात उत्तरोउत्तर प्रभावी होत गेला. मात्र २००९ सालच्या विधानसभा निवडणुकीत डाव्या लोकशाही आघाडीशी या पक्षाने केलेला निर्णय फलदायी ठरला नाही हे सिद्ध झाले.

रिपब्लिकन पक्षातील फाटा फुटी मुळे दलितांचा राजकीय शक्तीपात झाला. त्याचबरोबर सर्वसामान्य दलित जनतेचे त्यांच्या नेत्याबाबत भ्रमनिरास झाला. काँग्रेस बरोबर केलेल्या युतीच्या राजकारणातून काही मूठभर नेत्यांचा वैयक्तिक फायदा झाला. परंतु रिपब्लिकन पक्षाचे व आंबेडकरी चळवळीचे मात्र अतोनात नुकसान झाले. एकमेकांशी भांडणाऱ्या दलित नेत्यांनी दलितांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न न केल्यामुळे, सर्वसामान्य दलितांमध्ये व विशेषतः नवशिक्षित दलित तरुणांमध्ये एका बाजूला नैराश्याची भावना वाढत गेली. तर दुसऱ्या बाजूला आपली स्थिती सुधारण्यासाठी संघर्षाची भावना वाढत गेली. ही कोंडी मोडण्याच्या उद्देशाने १९७२ साली दलित पँथर सारख्या लढाऊ संघटनेचा उदय झाला. या संघटनेचे नेतृत्व राजा ढाले, नामदेव ढसाळ यांच्यासारख्या तरुण साहित्यकांकडे होते. परंतु पुढे ही संघटना देखील दलित चळवळीत कोणता तात्विक आधार घ्यावा या प्रश्नावर झालेल्या मतभेदामुळे फुटली. बौद्ध तत्वज्ञान व विचारांवर आधारित दलित चळवळीचे संघटन असणाऱ्या राजा ढालेंनी 'मास मूव्हमेंट' ही वेगळी संघटना काढली. नामदेव ढसाळ यांनी 'दलित पँथर' या

नावाने काम चालू ठेवले. पुढे ते निष्प्रभ झाले. प्राध्यापक अरुण कांबळे आणि रामदास आठवले यांनी 'भारतीय दलित पँथर' या नावाने कार्य चालू ठेवले.

१९७९ मध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या प्रश्नावरून मराठवाड्यात दंगली झाल्या. त्यावेळी दलितांच्या संरक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा मानून जोगेंद्र कवाडे यांनी 'दलित मुक्ती सेनेची' स्थापना केली. व अत्यंत आक्रमक पद्धतीने सवर्णांच्या विरोधात कार्य सुरू केले. परंतु कालांतराने त्यांनी हाजी मस्तानच्या दलित मुस्लिम सुरक्षा महासंघा बरोबर युती करून दलितांच्या प्रश्नाला वेगळे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला.

थोडक्यात म्हणजे रिपब्लिकन पक्षाच्या फाटा फुटीतून दलित समाजाचे केवळ राजकीय क्षेत्रातच विघटन झाले, असे नाही तर सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील दलितांच्या मध्ये फूट पडली. परिणामतः दलिताची शक्ती क्षीण झाली. व त्याचा फायदा घेऊन हितसंबंधी गटांनी ग्रामीण आणि शहरी क्षेत्रात राखीव जागा व सवलतीच्या प्रश्नावर दलित विरोधी भूमिका घेऊन, त्यांच्याशी संघर्ष सुरू केला. हे सत्य वास्तव आहे. रिपब्लिकन पक्षाच्या फाटा फुटीमुळे सर्व दलितांचे नुकसान होत आहे. या जाणिवेतून अनेक दलित नेत्यांनी वेळोवेळी ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न केले. अगदी प्रारंभी भैय्यासाहेब आंबेडकरांनी पक्षात फूट पडू नये यासाठी प्रयत्न केले. १९५८ आणि १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत दोन्ही गटाची जबरदस्त पीछेहाट झाल्यावर देखील, या गटांना एकत्र आणण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. १९६७ च्या निवडणुकांपूर्वी दादासाहेब रुपवतेंनी असाच प्रयत्न केला. १९७१ मध्ये बी.सी. कांबळे यांनी पुढाकार घेतला हे सर्व प्रयत्न दलित नेत्यांच्या आपापल्या भूमिकांना चिकटून राहण्यामुळे, अयशस्वीच ठरले.

१९७८ साली मुंबईमध्ये झालेल्या सर्व दलित संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दलित पँथरसनी एकत्र येण्याशिवाय पर्याय नव्हता. २६ जानेवारी १९४७ रोजी लाखो अनुयायांच्या उपस्थितीत, दलित नेत्यांनी आपण यापूर्वी केलेल्या चुकांची दुरुस्ती करण्यासाठी एकत्र येत असल्याची घोषणा केली. व ऐक्य प्रयत्नात टिकविण्याच्या शपथा घेतल्या. परंतु या सर्वांना एकत्र अणणारी पँथर संघटना फुटल्यामुळे, हा प्रयत्न देखील फसला. रिडल्सच्या (reduls) च्या प्रश्नावर दलितांच्या संघटित शक्तीचे जे प्रदर्शन झाले. त्यातून पुन्हा एकदा दलितांच्या ऐक्याचे महत्त्व स्पष्ट झाले. वेगवेगळ्या गटांचे नेते ऐक्याची भाषा पुन्हा एकदा बोलू लागले. परंतु प्रत्यक्षात त्या दिशेने फारसा गंभीरपणे पुढाकार घेतला नाही. ९ व्या लोकसभेसाठी रिपब्लिकन पक्षाने वेगवेगळ्या पक्षाबरोबर युती करून निवडणुका लढवल्या. गवई, रामदास आठवले (भा.द.पँ.) भारतीय दलित पँथर्स यांनी काँग्रेसबरोबर तर, प्रकाश आंबेडकरांनी (भा.रि.प.) भारतीय रिपब्लिकन पक्ष काँग्रेस विरुद्ध राष्ट्रीय मोर्चा बरोबर युती केली व निवडणुका लढवल्या या संदर्भात आंबेडकरांची भूमिका ही होती की, तत्कालीन परिस्थितीत काँग्रेस पक्ष हा शत्रू क्रमांक एक असून, भाजपा शिवसेना युतीचा धोका त्यापेक्षा कमी आहे. या भूमिकेमुळे अनेकांची आंबेडकरांवर, भाजपा शिवसेना या जातीयवादी युतीला अप्रत्यक्षपणे सहाय्य केल्याची टीका केली. त्यांच्या मते या भूमिकेमुळेच ही युती राज्यात १४ जागा मिळवू शकली. नवव्या लोकसभा निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या गटाचा झालेला दारून पराभव दलित युवकांना प्रक्षुब्द्ध करण्यात पुरेसा होता. निवडणुका नंतर आपल्या नेत्यावर ऐक्य करण्यासाठी दबाव आणण्याच्या दृष्टीने डॉ. आंबेडकरांच्या ३३ व्या पुण्यतिथीच्या दिवशी सहा डिसेंबर १९८९ सिद्धार्थ नगरातील नऊ दलित युवकांनी आमरण उपोषणाला सुरुवात

केली. २९ डिसेंबर १९८९ रोजी झालेल्या बैठकीत १३ संघटना व गटाचे नेते विसर्जन करून डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेला रिपब्लिकन पक्ष अस्तित्वात आल्याची घोषणा केली. ६ जानेवारी १९६० रोजी या प्रक्रियेवर लाखो दलितांच्या साक्षीने शिक्कामोर्तब करण्यात आले. १९९० ते १९९६ कालखंडात रिपब्लिकन पक्षातील मतभेद उत्तरोत्तर तीव्र होत गेले. महाराष्ट्राच्या राजकारणात दलित शक्ती निष्प्रभ झाली. १९९५ साली महाराष्ट्रात शिवसेना भाजपा युतीबरोबर आल्यानंतर पुन्हा एकदा रिपब्लिकन पक्षातील ऐक्य प्रक्रियेला गती मिळाली. १९९७ साली मुंबईत रमाबाई नगरात (घाटकोपर) झालेल्या दंगलीनंतर, पुन्हा एकदा दलित ऐक्याची प्रक्रिया सुरू झाली. १९९८ साली पक्षांतर्गत मतभेद असताना रिपब्लिकन पक्षाने काँग्रेस सोबत निवडणुकीत समिटीकरण केले. १९५७ नंतर म्हणजेच दीर्घ कालावधीनंतर रिपब्लिकन पक्षाला उल्लेखनीय यश मिळाल्याने पक्षातील मतभेदाच्या अटी कमी होण्यास आणि नेत्यातील ऐक्य टिकण्यास हातभार लागला. हे सामंजस्य २००९ च्या लोकसभा निवडणुकीच्या अपयशानंतर संपुष्टात आले. २००९ साली पुन्हा एकदा दलित ऐक्य प्रस्थापित करण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला.

**आत्मचिंतनाची गरज**

९० च्या दशकात व पुढे हिंदुत्ववादी शक्तीचा प्रभाव वाढत गेला. त्यांनी मागासवर्गीय हिंदू दलितांनाही गिळंकृत केले. १९९५ मध्ये हिंदुत्ववादी राजकीय पक्षांनी बौद्ध विरुद्ध मातंग, चांभार अशी रणनीती करून बौद्ध्यत्तरांना निवडून आणले. आणि दलित पक्ष एकजातीय होत गेले, एकाकी पडत गेले. समाज जोडावे लागतात बेरजेची राजकारण करावे लागते किंवा समविचारी पक्षांबरोबर युती करून यश मिळवून पुढे जावे लागते. २०१९ मध्ये प्रकाश आंबेडकरांना एक चांगली संधी आली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला संसदीय लोकशाहीची राज्यघटना दिली आहे. त्यात एक मत एक मूल्य असे सूत्र असून, त्याच्या जोरावर संसदीय लोकशाहीचा डोलारा उभा आहे. त्यातील निवडणुकांच्या राजकारणातूनही सामाजिक आर्थिक परिवर्तन साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. १९५७ मध्ये एवढे मोठे यश संपादन करणारा 'शेड्युल कास्ट फेडरेशन' किंवा आजच्या रिपब्लिकन, बहुजन वंचित वगैरे पक्षाचे राजकारण का फसले? का यशस्वी झाले नाही? याचा दलित नेते, विचारवंत, कार्यकर्ते आणि जनतेने विचार करायला पाहिजे. गेली ६० वर्ष राजकारणात असलेले काही पक्ष अलीकडे अस्तंगत झाले आहेत. विशेषतः कम्युनिस्ट पक्ष, समाजावादी पक्ष, जनता दल यांचा परिणाम दिसत नाही. शेतकरी कामगार पक्ष काही भागा मध्ये अस्तित्व टिकवून आहे. आणि शेतकरी संघटना, रिपब्लिकन पक्ष केवळ चळवळी पुरते उरले आहेत. मात्र निवडणूक आली की नेते मतांचे राजकारण करतात. आणि आपलं हित साध्य करून घेतात. व समाजाचा त्यांना विसर पडतो पुन्हा निवडणूक आली की त्यांना समाज आठवतो. मध्यंतरी पुर्णतः त्यांना चळवळीचा विसर पडलेला असतो.

## ४.७ इतर मागास जातींचे राजकारण : (ओ.बी. सी)

भारतात लिंगभाव, वर्ग आणि जाती पक्षपाताची आणि शोषणाची तीन प्रमुख केंद्र आहेत. ओबीसी हा निर्माण करता समाज आहे. बारा बलुतेदार आणि अठरा आलुतेदारांचा बनलेला हा समाज आहे. हातात नानावीध कौशल्यांची जादू असणारे हे लोक हिंदू धर्मशास्त्रदृष्ट्या 'शूद्र' गणले जात असले, तरी यातील अनेक जाती स्वतःला उच्च मानत आलेल्या आहेत.

भारतीय जातीय व्यवस्थेचे ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य हे तीन लाभार्थी आहेत शूद्र अति शूद्र आणि सर्व स्त्रिया या व्यवस्थेचे बळी आहेत. ब्रिटिशांनी भारतावर सुमारे २०० वर्ष राज्य केले. हा देश समजून घेण्यासाठी येथील लोकांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक स्थिती जाणून घेणे गरजेचे असल्याने त्यांनी १८७२ साली जातवार जनगणना सुरू केली. त्यांनी मुंबई राज्यातील जाती-जमातींचा जातीनिहाय सखोल अभ्यास करण्यासाठी १८८५ साली आर. ई. इंथोवेन यांच्याकडे काम सोपवले त्यांनी ५०० जाती जमातींचा सखोल अभ्यास करून १९२० च्या दशकात त्याचे तीन खंड प्रकाशित केले. मधल्या काळात अनेक अभ्यास झाले. १८८५ साली स्वतंत्र भारतातील जातीपातींचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्याचा महाप्रकल्प, डॉ. के. एस. सिंग यांच्या नेतृत्वाखाली हाती घेण्यात आला. २००४ साली त्याची ४३ खंड प्रसिद्ध करण्यात आली. या संशोधनात ३००० समाज शास्त्रज्ञ सहभागी झाले होते. आज रोजी भारतात एकूण ४३५ जाती जमाती असल्याची माहिती अभ्यासातून पुढे आली आहे. त्यात प्रामुख्याने चार मोठे समूह आहेत. अनुसूचित जाती, (अजा), अनुसूचित जमाती, (अज), विमुक्त जाती, भटक्या जमाती, (विजाभज) आणि इतर मागासवर्ग (इमाव).

आज देशातील अजा /अजची लोकसंख्या २२.५% आहे. मंडल आयोगाच्या मते, यातील ओबीसींची लोकसंख्या सुमारे ५२% असून. रेणके आयोगाच्या मते विजाभजची लोकसंख्या १०% आहे ते अनेक राज्यात ओबीसी धरले गेलेले आहेत. भारत सरकारच्या राष्ट्रीय नमुना पाहणी संस्थेच्या २००४-०५ आकडेवारीनुसार देशात ओबीसींची लोकसंख्या ४१% आहे. या तफावतीचे कारण असे, आहे की मंडल आयोगाने ३७४३ जातींची मोजदाद ओबीसी म्हणून केलेली असली, तरी सर्वोच्च न्यायालयाने त्यातील फक्त १९६३ जातींनाच ओबीसी म्हणून मान्यता दिलेली आहे. मंडल आयोगाच्या शिफारशींना मान्यता देताना सर्वोच्च न्यायालयाने मंडल यादीतील ३७४३ जातींना इतर मागासवर्गीयांमध्ये सरसकट समाविष्ट न करता राज्यांच्या यादीत आणि मंडलच्या यादीत दोन्हीकडे कॉमन असणाऱ्या जातींनाच तेवढी ओबीसी म्हणून मान्यता दिली आहे. (इंदिरा सहानी निवाडा १६ नोव्हेंबर १९९२) गेल्या काही वर्षात त्या यादीत २०० जातींची भर पडून, आता ही संख्या वाढलेली आहे. तथापि तीही लोकसंख्या नमुना पाहणित आलेली नाही. १९९४ साली मंडल आयोग महाराष्ट्रात लागू झाला तेव्हा महाराष्ट्राच्या ओबीसी यादीत क्रमाने २०१ जाती असल्या तरी त्यातल्या २८ जाती वगळलेल्या होत्या. या शिल्लक १७३ जातींच्या यादीत नंतरच्या काळात नव्याने १७३ जातींची भर पडून, आज ही संख्या दुप्पट म्हणजे ३४६ झालेली आहे. नमुना पाहणीत मात्र आधीच्या १७३ जातीच आलेले आहेत. महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांची स्वतंत्र सूची असून, त्यात असलेल्या जाती जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग या घटकात असलेल्या जाती या सर्वांची एकूण संख्या ४१० वर जाते. यांना सर्वांना मिळून पंचायत राज्याच्या सत्तेत २७% आरक्षण आहे राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये १९%, ११% आणि २% असे एकूण ३२ टक्के आरक्षण कागदावर असले, तरी प्रत्यक्षात व्यवहारात मात्र एकूण ३० टक्के आरक्षण आहे. विमाप्र चे २% आरक्षण ओबीसींच्या १९% मधून दिले जात असल्याने ओबीसीला केंद्रात सत्तावीस टक्के आणि राज्यात १७ टक्के आरक्षण आहे असे म्हणणे उचित होईल.

महाराष्ट्राच्या राजकारणात गेले काही दशकात मोठे बदल झाले. अनेक महत्वाच्या चळवळी, आंदोलने मराठी मातीतच जन्मली. यात शरद जोशींची शेतकरी चळवळ, नर्मदा बचाव

आंदोलन, अण्णा हजारे यांची भ्रष्टाचार निर्मूलन चळवळ, आणि दलित चळवळी आदींचा यात समावेश होतो. हिंदुत्वाचे राजकारणाला वैचारिक बळ देण्याचे काम ही महाराष्ट्रातच झाले.

महाराष्ट्राचा साठ वर्षांचा इतिहास हा अनेक आंदोलने आणि चळवळींची गौरवगाथा आहे. या काळात मोठे सामाजिक आणि राजकीय बदल झाले. पहिल्या टप्प्यामध्ये यशंतराव चव्हाण यांनी काँग्रेससाठी मजबूत सामाजिक पाया निर्माण केला होता. ग्रामीण भागातील पंचायतराज संस्था, सहकारी चळवळ, शेतीची पुनर्रचना आणि मराठा -ओबीसी जातीची आघाडी, हा त्याचा आधार होता. पण १९७७ पासून आधार विस्कटण्यास सुरुवात झाली. त्याबरोबरच काँग्रेस पक्षाचा प्रभावही वसरु लागला. १९८०, १९८५, १९९० आणि १९९५ मधील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अनुक्रमे १८०, १६१, १४१ आणि ८१ जागा मिळाल्या होत्या. येथेच राजकारणामध्ये चार महत्वाचे बदल घडुन आले.शहरी भागाचा आर्थिक विकास होऊन लोकसंख्येमुळे त्याचा मोठा विस्तार झाला. आकड्यात विचार करायचा झाला तर २००१ मध्ये शहरी भागात ३८% तर, २०११ मध्ये ४२ % लोक राहत होते. त्यामुळे सत्तेचा लंबक शहरांकडे झुकू लागला. आर्थिक विकासामुळे परराज्यातील लोकांची लोंढे शहरांवर आदळू लागली. त्यामुळे बिगर मराठी भाषक लोकांच्या संख्येत वाढ झाली. महाराष्ट्रामध्ये १९९० नंतर मंडळ आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या. आणि त्यामुळे इतर मागास जातींमध्ये राजकीय जागृती झाली. हे जात समूह हिरीरीने राजकारणात सहभागी होऊ लागले. त्यांनी भाजप शिवसेनेला पाठिंबा दिल्यामुळे काँग्रेसचा पाया खिळखिळा झाला. महाराष्ट्रा मध्ये मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणात वाढल्याने, शिक्षण संस्थांचा विस्तार झाला. माहिती तंत्रज्ञान उद्योगाने भरारी घेतली. खाजगी क्षेत्रात नोकरीच्या संधी निर्माण झाल्या. उद्योग, बांधकाम, संगणक आणि पूरक उद्योगांची वाढ झाली. ग्रामीण भागाच्या सीमेवर शेती आणि अन्य व्यवसाय करणारी व्यावसायिक यामुळे आज एकूण लोकसंख्येपैकी २५ ते ३० % लोक इतर मागासवर्गामध्ये मोडतात. या वर्गाच्या आकांक्षा आणि अपेक्षा मागील पिढीपेक्षा वेगळ्या आहेत. सोशल मीडिया आणि इतर साधनांद्वारे त्यांनी नवा विचार मांडण्यास सुरुवात केली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) महाराष्ट्रातील जातीय राजकारणाची व्याप्ती स्पष्ट करा

२) महाराष्ट्रातील प्रबळ जातीच्या राजकारणा संदर्भात सविस्तर लिहा

३) दलित राजकारणातील नेतृत्वाच्या यशापयश बद्दल चर्चा करा

**अधिक वाचनासाठी काही उपयुक्त संदर्भ ग्रंथ सूची.**

१) Kothari Rajni, 'State Politics in India'

२) पळशीकर सुहास, व्होरा राजेंद्र, 'महाराष्ट्रातील सत्तांतर'

३) फडके य.दि. महाराष्ट्राच्या राजकारणातील राजकीय प्रक्रिया खंड १ ते ६.

४) ठक्कर, कुलकर्णी, महाराष्ट्राचे राजकारण.

❄❄❄❄❄❄❄